Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com • mahasagarngp@gmail.com

संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर - 440018

महासागर | NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
महासागर (मराठी) आणि NAGPUR POST (English) घरपोच पाठविण्याची सुविधा.
महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6
4 रुपयात

* वर्ष ५४ * अंक २६७ * * नागपूर * | मंगळवार, दिनांक २४ डिसेंबर २०२४ | पुरवणीसह पाने ८ | किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

## चित्रपट निर्माते श्याम बेनेगल यांचे निधन

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २३:



प्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक, पटकथा लेखक आणि निर्माते श्याम बेनेगल यांचे सोमवारी मुंबईत निधन झाले. सायंकाळी 6.38 वाजता त्यांनी वोक्हार्ट रुग्णालयात अखेरचा श्वास घेतला. मंगळवारी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येतील.

सर्वाधिक राष्ट्रीय पुरस्कार जिंकण्याचा विक्रम श्याम बेनेगल यांच्या नावावर आहे. श्याम बेनेगल यांच्या चित्रपटांनी भारतीय चित्रपटसृष्टीला उत्तम अभिनेते दिले, त्यापैकी नसीरुद्दीन शाह, ओम पुरी, अमरीश पुरी, अनंत नाग, शबाना आझमी, स्मिता पाटील आणि सिनेमॅटोग्राफर गोविंद निहलानी हे प्रमुख आहेत.

# सोमनाथ सूर्यवंशी मृत्यूप्रकरणी
# मुख्यमंत्र्यांकडून दिशाभूल..

### कुटुंबियांच्या भेटीनंतर राहुल गांधी यांचा आरोप

■ वृत्तसंस्था, परभणी, दि. २३:
काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी आज परभणी येथे सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबियांची भेट घेतली.

या भेटीनंतर राहुल गांधी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर आरोप केला की सोमनाथ सूर्यवंशी हे दलित असल्याने त्यांची हत्या करण्यात आली आहे, तसेच पोलिस खाते हे गृहविभागाच्या अंतर्गत येत असून याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस जबाबदार असल्याचा आरोप राहुल गांधी यांनी केला आहे.

राहुल गांधी म्हणाले, मी आज सोमवंशी कुटुंबीयांची भेट घेतली, ज्यांना मारहाण झाली त्यांचीही भेट घेतली. मला त्यांनी पोस्टमार्टम रिपोर्ट्स दाखवले, व्हिडिओ दाखवले, त्यावरुन हा शंभर टक्के न्यायालयीन मृत्यू आहे, पोलिसांनीच



त्यांची हत्या केली आहे. मुख्यमंत्र्यांनी विधानसभेच्या सभागृहात पोलिसांना मेसेज देण्यासाठी खोटी माहिती दिल्याचा आरोपही यावेळी राहुल गांधी यांनी केला.

पुढे राहुल गांधी म्हणाले, सोमनाथ सूर्यवंशी हे दलित आहेत, ते संविधानाचे रक्षण करत होते म्हणून त्यांची हत्या करण्यात आली. ज्या लोकांनी हे केले आहे त्यांना शिक्षा व्हावी, अद्यापपर्यंतच्या कारवाईवर मी संतुष्ट नाही. हे कुठलेही राजकारण नसल्याचेही ते म्हणाले.

दुसरीकडे, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनीही मुख्यमंत्री खोटे बोलल्याचा आरोप केला आहे. त्यांनी विधानसभेत त्यांनी दिशाभूल केली. काँग्रेसच्यावतीने मुख्यमंत्री फडणवीस यांच्यावर आम्ही प्रिविलेज मोशन आणू, असे नाना पटोले यांनी म्हटले आहे.

## केवळ राजकीय हेतू..

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. २३:
राहुल गांधी यांनी परभणी येथे दिलेल्या भेटीवर बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राहुल गांधी केवळ राजकीय हेतूने परभणीत आले होते. ही राजकीय भेट होती. लोकांमध्ये जाती जातीत भेद निर्माण करायचे ते गेली अनेक वर्षे काम करत आहेत. त्यामुळे मला असे वाटते की त्यांचे जे विद्वेषाचे काम त्यांनी त्या ठिकाणी जाऊन केले आहे. आमचे सरकार संवेदनशील असल्यामुळेच या संपूर्ण प्रकरणाची न्यायालयीन चौकशी करण्यात येणार आहे. यात सगळे समोर येईल, तसेच कुठल्याही आरोपीला सोडण्यात येणार नसल्याची ग्वाही फडणवीस यांनी दिली आहे.



### भुजबळांसारखे नेते सोबत असावेत

छगन भुजबळ यांच्याविषयी विधान करताना फडणवीस म्हणाले की, आम्ही सगळे त्यांचा सन्मान करतो. मंत्रिमंडळात घेण्यात आले नाही तेव्हा आमच्या मनात त्यांना राष्ट्रीय पातळीवर पाठवण्याचा विचार होता, तसेच भुजबळांसारखे नेते आमच्या सोबत असलेच पाहिजेत, असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

## अग्राग्रलेख
## खरीखरी...
# शेतकरी दीन

आज शेतकरी दिन आहे असे म्हणतात. आज आपल्या देशातील शेतकऱ्यांचे बडे नेते चौधरी चरण सिंग यांची जयंती आहे. चरण सिंग काँग्रेसचे बडे नेते होते. पण काँग्रेस सोडल्यानंतर त्यांनी थेट पंतप्रधानपद गाठले. मग प्रश्न असा आहे की, त्यांच्या सारख्याला काँग्रेसमध्ये वाव का मिळाला नाही. चौधरीजी आयुष्याच्या अखेरपर्यंत शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी भांडत होते. एवढे सर्व असताना आजचा दिवस शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असला पाहिजे. सरकारनेही याचे महत्त्व समजून शेतकऱ्यांना काही ना काहीतरी दिले पाहिजे. पण आता तेही दिवस कुठेच राहिलेले नाहीत. देशाच्या कानाकोपऱ्यातून या किसान दिनाचा जयघोष अतिशय जोरदारपणे व्हावा असे वाटत होते. पण आज दिवसभर तरी शेतकरी उपाशीच राहिलेला आहे. चौधरी चरण सिंग असताना शेतकऱ्यांचे जे प्रश्न होते, ते तसेच कायम आहेत. शेतकऱ्यांना योग्य भाव मिळत नाही. साधे तुरीचे उदाहरण घेऊया. गेल्या दोन-तीन दिवसातच तुरीच्या भावात क्विंटल मागे 1500 रुपयांची घसरण झाली. सोयाबीन आणि कापूस यांची खरेदी व्यापारी अत्यंत कमी दराने करत आहेत?. मग सरकारने दिलेल्या मिनिमम सपोर्ट प्राईज ला म्हणजे किमान भाव हमीला काही अर्थ उरला आहे काय? जर व्यापारी सरकारचा आदेशच पाळत नाहीत. तर हा किमान हमीभाव? म्हणजेच इंग्रजीमध्ये मिनिमम सपोर्ट प्राईजचा आदेश देऊन उपयोग काय? एकूणच या देशाचा शेतकरी ज्या अपेक्षेत आहे. त्याला अपेक्षित जे आहे ते मिळत नाही आणि अनपेक्षितपणे नको तितके खर्च करावे लागते. यामुळे किसान दिनाच्या निमित्ताने एवढेच सांगावेसे वाटते की आपण ठरवलेले किमान मूल्य तरी शेतकऱ्यांच्या पदरात पडले पाहिजे. बाकीचे जाऊ द्या ! दीन शेतकऱ्याला, शेतकरी दिन आपला वाटला पाहिजे. एवढीच आमची माफक अपेक्षा!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## तो आमचा अंतर्गत प्रश्न..



### भुजबळांच्या नाराजीवर दादांचे उत्तर

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २३:
छगन भुजबळ यांनी आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली होती. दोघांमध्ये अर्धा तास चर्चा झाली. यावरून अजित पवार यांना प्रश्न विचारला असता, आमचा तो पक्षांतर्गतला प्रश्न आहे. तो आम्ही आमच्या पद्धतीने सोडवू, असे एका शब्दांत त्यांनी उत्तर दिले.

सागर बंगल्यावर छगन भुजबळ व देवेंद्र फडणवीस यांच्यात जवळपास अर्ध्या तास चर्चा झाली. मुख्यमंत्र्यांनी आपल्याला ओबीसींचे नुकसान होऊ देणार नसल्याची ग्वाही दिली. यासाठी त्यांनी वेळ मागितला आहे, असे भुजबळ यांनी सांगितले.

## मद्यधुंद डंपर चालकाने ९ जणांना चिरडले

### २ चिमुरड्यांसह तिघांचा मृत्यू

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. २३:
पुण्यात भीषण अपघात झाला आहे. रात्री 12.30 च्या सुमारास पुण्यात फुटपाथवर झोपलेल्या 9 जणांना चिरडल्याची घटना घडली. या अपघतात तिघांचा दुर्दैवी मृत्यू झाला. वाघोली परिसरात डंपर चालकाने हा अपघात केला.

डंपर चालक हा मद्यधुंद अवस्थेत होता. रस्त्याच्या कडेला फुटपाथवर झोपलेल्या 9 जणांना चिरडले. यामध्ये विशाल विनोद पवार (वय 22), वैभवी रितेश पवार (वय 1) आणि वैभव रितेश पवार (वय 2) सर्व रा. अमरावती जिल्हा, यांचा जागीच मृत्यू झाला.

अपघातात जानकी दिनेश पवार(21), रिनिशा विनोद पवार (18), रोशन शशादू भोसले (9), नगेश निवृत्ती पवार (27), दर्शन संजय वैराळ (18) आणि आलिशा विनोद पवार (47) हे सहाजण गंभीर जखमी झालेत. आरोपी डंपर चालक गजानन शंकर तोट्रे याला ताब्यात घेतले असून, त्यांच्याविरोधात सदोष मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जखमींना प्राथमिक उपचार आयनॉक्स हॉस्पिटल येथे करून ससून रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची माहिती आहे.






## संक्षिप्त

### दंडात्मक कारवाईचा अधिकारही पालिकेचाच होर्डिंगप्रकरणी हायकोर्टाने ठाणे पालिकेला सुनावले

**मुंबई, दि. २३ : प्रतिनिधी**

बेकायदा होर्डिंग हटविणे हेच केवळ पालिकांचे कर्तव्य नाही तर संबंधितांवर दंडात्मक कारवाई करण्याचे अधिकारही पालिकेला आहेत, याची आम्ही आठवण करून देत आहोत, असा टोला उच्च न्यायालयाने ठाणे महापालिकेला शुक्रवारी लगावला. पालिकेने बेकायदा होर्डिंगविरोधात काय पावले उचलली, यासंदर्भात प्रतिज्ञापत्र सादर करावे, असे निर्देश उच्च न्यायालयाने दिले. या याचिकेवरील पुढील सुनावणी २९ जानेवारी २०२५ रोजी होणार आहे.

**'ती' होर्डिंग हटविली**

घाटकोपर दुर्घटनेनंतर ठाण्यातील काही बेकायदा होर्डिंग हटविण्यासाठी मनसेचे संदीप पाचांगे यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. या याचिकेवर मुख्य न्या. देवेंद्र कुमार उपाध्याय व न्या. अमित बोरकर यांच्या खंडपीठापुढे सुनावणी झाली.

न्यायालयाने नाराजी व्यक्त करताना म्हटले की, पालिकेने सादर केलेल्या तक्त्यावरून असे दिसते की, त्यांनी बेकायदा होर्डिंग हटविली. बेकायदा होर्डिंग निदर्शनास आल्यावर संबंधितांवर दंडात्मक कारवाई करण्याचे अधिकारही त्यांना आहेत.

### पोलिसाला मारहाण करणाऱ्या तिघांवर गुन्हा

**नवी मुंबई, दि. २३ : प्रतिनिधी**

वाहतूक कोंडी सोडवण्याचा प्रयत्न सुरु असतानाच ट्रकसमोर आलेल्या दुचाकीस्वाराला समज दिली असता त्याने व त्याच्या कुटुंबीयांनी वाहतूक पोलिस अधिकाऱ्याला मारहाण केली. मुलुंड-ऐरोली मार्गावर शुक्रवारी ही घटना घडली. या प्रकरणी रबाळे पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आला असून आदर्श तिवारी (२२), आदित्य तिवारी (२०) व अनिता तिवारी (४०) अशी तिघांची नावे आहेत.

रात्री मोठ्या प्रमाणात अवजड वाहने या मार्गाने धावत असताना वाहतूक कोंडी झाली होती. यामुळे चौकातला सिग्नल बंद करून वाहतूक पोलिस स्वतः तिथली वाहतूक नियंत्रित करत होते.

त्यावेळी मुलुंडकडून ऐरोलीकडे येणारी लेन खुली केल्याने अवजड वाहने धावत होती. त्याचवेळी विरुद्ध दिशेच्या मार्गावरून एक दुचाकीस्वाराने रस्ता ओलांडण्याचा प्रयत्न केला.

त्यात थोडक्यात अपघात टळल्याने बंदोबस्तावरील सहायक पोलिस निरीक्षक तुषार गुरव यांनी दुचाकीस्वाराला थांबवून समज देत होते.

याचा राग आल्याने आदर्श तिवारी (२२) याने बंदोबस्तावरील वाहतूक पोलिसांसोबत वाद घालण्यास सुरुवात केली.

घरी फोन करून आई व भावाला त्या ठिकाणी बोलवून घेतले असता त्यांनी गुरवना धक्काबुकी केली.

रबाळे पोलिसांना घटनास्थळी बोलवले असता त्यांनी आदर्श तिवारी, आदित्य तिवारी, व अनिता तिवारी यांना ताब्यात घेतले. त्यांच्यावर शासकीय कर्मचाऱ्याला मारहाण केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

### पत्नीला त्रास देणाऱ्याचे पतीने फोडले डोके

**नवी मुंबई, दि. २३ : प्रतिनिधी**

पत्नीला त्रास देणाऱ्याला मारहाण करत फरशीने डोके फोडल्याची घटना शुक्रवारी वाशी स्थानकाबाहेर घडली आहे. यात मारहाण झालेल्या व्यक्तीची प्रकृती चिंताजनक असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत. मारहाण केल्याप्रकरणी पतीविरोधात वाशी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. परिसार्ट उघड्यावर राहणाऱ्या कुटुंबातील एका महिलेची तिथून जाणाऱ्या व्यक्तीने छेड काढली. हा प्रकार महिलेच्या पतीच्या लक्षात आल्यानंतर त्याने या व्यक्तीला मारहाण करत घटनास्थळी पडलेली लादी डोक्यात मारली. यामध्ये ही व्यक्ती गंभीर जखमी होताच रेल्वे स्थानकाच्या ठिकाणी नेमलेल्या सुरक्षारक्षकांनी दोघांचे भांडण सोडवले. जखमी व्यक्तीला रुग्णालयात दाखल केले असून त्याची प्रकृती चिंताजनक असून, या प्रकरणाचा तपास पोलिस करीत आहेत.

### लेणी बंद असतानाही सोमवारी जलवाहतूक दहा वर्षांपासून पर्यटकांची फसवणूक

**उरण, दि. २३ : प्रतिनिधी**

घारापुरी लेण्यांच्या देखभालीसाठी आठवड्यातील प्रत्येक सोमवारी लेण्या बंद ठेवण्यात येत आहेत. असे असतानाही गेल्या दहा वर्षांपासून देशी-विदेशी पर्यटकांची फसवणूक करून लाँच मालक स्वत:चे खिसे भरत आहेत. लेण्यांचे दर्शन होत नसल्याने पर्यटकांकडून संताप व्यक्त केला जात आहे.पुरातत्त्व विभागाने घारापुरी लेणी देखभालीसाठी सोमवारी दिवसभर बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत. तरीही गेट वे ऑफ इंडिया येथून सोमवारीही लेण्या पाहण्यासाठी शेकडो देशी-विदेशी पर्यटकांना नेले जाते. घारापुरी लेण्यांचे प्रवेशद्वार पर्यटकांसाठी बंद असल्याने लेण्या पाहणे शक्य होत नाही. त्यामुळे याबाबत अनेक तक्रारी करण्यात आल्या आहेत. मुंबई ते घारापुरीदरम्यानच्या नीलकमल या खासगी बोटीला नौदलाच्या स्पीड बोटीने जोरदार धडक दिली. या अपघातातमृत्युमुखी पडलेल्या दुर्दैवी पर्यटकांना शुक्रवारी (२०) जेएनपीएच्या वतीने श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी 'जेएनपीए'चे अध्यक्ष उन्मेष वाघ, सचिव तथा प्रशासन विभागाच्या वरिष्ठ प्रबंधक मनीषा जाधव, कामगार ट्रस्टी दिनेश पाटील, रवींद्र पाटील, विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# अनधिकृत आंबोली पेट्रोल पंपाला ग्रामस्थांचा विरोध

## पंप मालकाची शासनाच्या नियमांची पायमल्ली

**कासा, दि. २३ : प्रतिनिधी**

डहाणू तालुक्यात नव्याने सुरु होत असलेल्या आंबोली पाटील पाडा येथील पेट्रोल पंपाला आदिवासी वस्तीतील ग्रामस्थांकडून मोठ्या प्रमाणात विरोध करण्यात आला आहे. त्यामळे शासनाच्या नियमांची पायमल्ली पेट्रोल पंप मालका कडून होताना दिसत आहे. नवीन पेट्रोल पंप उभारणीसाठी असलेले सर्व शासनाचे कायद्याचे नियम डावलुन पेट्रोल पंप मालकाकडून अनधिकृत पेट्रोल पंप उभारण्याचा प्रयत्न सुरु असल्याचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर आला आहे. शासनाच्या डोळ्यात धूळ फेकत नियम तुडवले जात आहेत. मात्र शासकीय अधिकाऱ्यांकडून कुठलीही कारवाई होत नसल्याचा धक्कादायक प्रकार समोर येत आहे.

डहाणू येथील आंबोली पाटील पाडा हा पेसा कायद्या अंतर्गत गाव येत असुन आदिवासी लोकवस्तीचा पाडा आहे. येथे २० वर्षांपासून जिल्हा परिषदेची शाळा आहे.ह्या शाळेच्या जवळच नवीन पेट्रोल पंप उभारणीचे काम सुरु आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. शाळेपासुन अवघ्या ४० मीटर वर हा पेट्रोल पंप उभारला जात आहे.याठिकाणी आजुबाजुला लोकवस्ती हि आहे. शाळेपासुन ९१.५ मीटर अंतरावर पेट्राल पंप उभारला जाऊ शकतो. हा कायद्याचा नियम आहे.मात्र



नियम फाट्यावर मारत पेट्रोल पंप मालकाकडून मजोरी सुरु आहे. याशिवाय पेट्रोल पंपाला पर्यावरण विभागाकडून ही परवानगी दिलेली नाही.आंबोली ग्रामपंचायतीकडून हि पेट्रोल पंप उभारणीला परवानगी मिळालेली नाही. तसेच अग्निशामक विभाग,आरोग्य विभाग यांची सुध्दा परवानगी पेट्रोल पंपाला मिळालेली नाही. वन विभागाकडून हि पेट्रोल पंप उभारणीला परवानगी दिलेली नसुन अनधिकृतपणे जमिनीचे उत्खनन करुन शासनाचा महसुल रुपये- १,१०,३५,९२६/- एवढी दंडनीय रक्कमेचा महसूल बुडवला आहे.पेट्रोल पंप उभारणीला "पेट्रोलियम व विस्फोटक सुरक्षा" संघटनेने परवानगी दिलेली नाही. तरी सुध्दा पेट्रोल पंप मालकाने अनधिकृतपणे साठा आणलेला आहे.आंबोली येथुन राष्ट्रीय महामार्ग-०८ हा असुन येथे वाहनांची नेहमी वाहतुक सुरु असते.परंतु राष्ट्रीय महामार्गापासुन पेट्रोल पंप ठराविक अंतरावरच असावा लागतो.परंतु कायद्याच्या चौकटी बाजुला सारत पेट्रोल पंप मालकाने काम सुरु आहे. तरी सुध्दा पेट्रोल पंप मालकाचे काम सुरु आहे. पेट्रोल पंप जागेबाबत हि कोर्टात केस चालु असुन त्या जागेवर पेट्रोल पंप उभारणीचे काम अनधिकृतपणे सर्रास सुरु आहे.आंबोली येथे १ किलोमीटर च्या परिसरात अगोदरच ३ पेट्रोल पंप आहेत. ३०० मीटरच्या आत मध्ये,नविन पेट्रोल पंप उभारला जाऊ शकत नाही.हा कायद्याचा नियम आहे. शासनाचे नियम धाब्यावर बसवत पेट्रोल पंपाचे अनधिकृत काम सुरु आहे.अनधिकृत पेट्रोल पंप मालक आरती संजय सिंग यांच्या कडून भारत पेट्रोलियम कंपनीचा पेट्रोल पंप उभारणीचा घाट सुरु असुन ग्रामस्थांकडून याला विरोध केला असुन पेट्रोल पंप उभारणीला बंदी घालावी.यासाठी शासकीय यंत्रणेशी ग्रामस्थांनी पत्र व्यवहार केला आहे. त्यामुळे शासनाकडून ह्या अनधिकृत पेट्रोल पंपावर कारवाई कधी होणार हा ग्रामस्थांना प्रश्न पडला आहे.

# देशभरातील 60 जणांना ऑनलाईन गंडा घालणाऱ्या दोन सायबर भामट्यांना लखनौतून अटक

**ठाणे, दि. २३ : प्रतिनिधी**

क्राईम ब्रान्चचे अधिकारी असून तुमच्या नावाने मनी लॉड्रींग झाल्यामुळे तुमच्याविरुद्ध अटक वारंट निघाल्याची धमकी देत ठाण्यातील वृद्धाला आठ लाख ६५ हजारांचा गंडा घालणाऱ्या रौचक श्रीवास्तव (२९, रा. लखनौ, उत्तरप्रदेश) आणि संदीप यादव (२६, रा. खुटेहना, उत्तरप्रदेश) या उच्चशिक्षित सायबर भामटयांना अटक केल्याची माहिती वागळे इस्टेट विभागाचे सहायक पोलिस आयुक्त हेमंत शिंदे यांनी शुक्रवारी दिली. देशभरातील अशा ६० पेक्षा अधिक लोकांना त्यांनी गंडा घातला आहे. त्यांच्याकडून पाच लाख ६५ हजारांची रोकड, पाच मोबाईल, सहा सिमकार्ड, २० डेबिट कार्ड आणि वेगवेगळ्या बँक खात्यांचे नऊ धनादेश असा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

ठाण्याच्या वागळे इस्टेटमधील रहिवासी सदानंद पाध्ये (८६) यांना २५ नोव्हेंबर ते २६ नोव्हेंबर २०२४ रोजी दरम्यान एका सायबर भामटयाने राकेश सिन्हा या नावाने कॉल केला. क्राईम ब्रॅन्चचे अधिकारी असल्याचे सांगत, तुमच्या नावाने मनी लॉड्रींगचा गुन्हा दाखल झाल्याने अटक वारंट जारी केल्याचीही त्यांना धमकी दिली. प्रकरण मिटवून निर्दोष असल्याचे प्रमाणपत्र देण्यासाठी त्यांना आठ लाख ६५ हजारांची रक्कम त्यांच्या बँक खात्यामध्ये आरटीजीएस करण्यास सांगितली. पाध्ये यांनी वागळे इस्टेट पोलिस ठाण्यात फसवणूकीचा गुन्हा दाखल केला. वरिष्ठ पोलिस निरीक्षक शिवाजी गवारे, निरीक्षक प्रविण माने, प्रविण सावंत आणि उपनिरीक्षक जगताप यांच्या पथकाने तांत्रिक विश्लेषणाद्वारे लखनौच्या अभिषेक शुक्ला यांच्या बँक खात्यात पैसे गेल्याची माहिती मिळविली. तेंव्हा लखनौमधील बी टेक झालेल्या श्रीवास्तव आणि बीएसस्सी झालेल्या यादवने गेमिंगचे हे पैसे त्यांच्या खात्यात येणार असल्याचे शुक्ला यांना भासविल्याची माहिती चौकशीत समोर आली. खात्यावरील हे पैसे परत देण्यासाठी लाखाला एक टक्का रक्कमही देण्याचे ठरले होते. हे पैसे बँकेत येताच श्रीवास्तव आणि यादव यांनी त्यांच्या खात्यातून हे पैसे काढले. पैसे घेणाऱ्या या दोघांची माहिती मिळताच उपनिरीक्षक जगताप यांच्या पथकाने थेट लखनऊ मध्ये जाऊन या दोघांनाही १४ डिसेंबर २०२४ रोजी ताब्यात घेतले. त्यांना २१ डिसेंबरपर्यंत पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश ठाणे न्यायालयाने दिले. त्यांनी आणखी किती जणांची किती रुपयांची फसवणूक केली, याचाही शोध घेण्यात येत आहे.

**देशभरातील ६० जणांची फसवणूक**

आरोपींसह त्यांच्या अन्य साथीदारांनी देशभरातील ६० जणांची करोडो रुपयांची फसवणूक केली. त्यांनी महाराष्ट्रातील कोल्हापूर, सातारा आणि ठाणे तसेच गोवा, तामीळनाडू, आंध्रप्रदेश, हरियाणा आणि केरळ आदी राज्यांमधील ५९ बँक खात्यांमधून पैसे उकळल्याचेही तपासात समोर आले. त्यांनी फसवणूक केलेली रक्कम ही क्रिप्टो करन्सीमध्ये परावर्तित केली. त्यांच्याकडून चार हजार क्रिप्टो करन्सी (यूएसडीटी) सुमारे तीन लाख २० हजारांच्या रकमेचा शोध लागला.

### शहापूर हादरले, ज्वेलर्सच्या सेल्समनवर गोळीबार; गोळीबारात एकाचा मृत्यू

**कसारा, दि. २३ : प्रतिनिधी**

काल शनिवार रात्री शहापूर येथील पंडित नाक्यावरील महालक्ष्मी ज्वेलर्स मधील दिनेशकुमार मोनाराम चौधरी यांच्यावर अज्ञात हल्लेखोरांनी गोळीबार केला. या गोळीबारात दिनेश चौधरी या २५ वर्षीय तरुण गभीर जखमी झाला. पोटात गोळी लागल्याने जखमी दिनेशला शहापूर उपजिल्हा रुग्णालयात प्रथोमोपचार करण्यात आले. पुढील उपचारासाठी दिनेश यांना ज्युपिटर हॉस्पिटलला पाठवण्यात आले. दरम्यान, आज सकाळी दिनेश यांचा उपचारादरम्यान दुर्दैवी मृत्यू झाला .

आज या घटनेच्या निषेधार्थ शहापूर तालुका व्यापारी मंडळातर्फे घटनेचा तीव्र निषेध व्यक्त करत या घटनेतील आरोपींना लवकरात लवकर अटक करावी अशी मागणी करण्यासाठी आज शहापूर बंद ची हाक देण्यात आली. आज च्या बंद ला शहापूर करांना नी उत्तम प्रतिसाद दिला. घटनेचा निषेध म्हणून शहरातून मूक मोर्चा काढण्यात आला. त्यानंतर मुक मोर्चा शहापूर पोलीस ठाण्याव्या आवरात आला तिथे मृत दिनेश यांना श्रद्धाजली वाहण्यात आली.

या मूक मोर्चात मा.आमदार पांडुरंगजी बरोरा साहेब यांनी उपस्थिती राहून व्यापारी मंडळाच्या मूक मोर्चात सहभागी झाले. यावेळी मूकमोर्चात तालुक्यातील सर्व पक्षीय पदाधिकारी ,नेते व असंख्य व्यापारी ,नागरिक सामील झाले होते.

दरम्यान, गोळीबार नक्की कोणत्या हेतूने करण्यात आला. याबाबत शहापुर् पोलीस तपास करीत असून हल्ले खोरांना पकडण्यासाठी विशेष पथक तयार करण्यात आले असून शनिवारी रात्री घटनास्थली डॉग स्कॉड मार्फत तपास करण्यात आला आहे.

### स्वच्छ आंध्र महानगरपालिका अधिकारीवर्गाचा नवी मुंबईतील घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाचा अभ्यास दौरा



**नवी मुंबई, दि. २३ : प्रतिनिधी**

नवी मुंबई महानगरपालिकेचे घनकचरा व्यवस्थापन अद्ययावत असून मलनि:स्सारण व्यवस्थापनातही नवी मुंबईने अत्याधुनिकता राखत स्वत:ची वैशिष्ट्यपूर्णता जपलेली आहे. या अनुषंगाने देशापरदेशातून विविध तज्ज्ञ तसेच अभ्यासक नवी मुंबई महानगरपालिकेच्या विविध प्रकल्पांना भेटी देत असतात.

याच धर्तीवर आज आंध्रप्रदेश राज्यातील स्वच्छ आंध्र महानगरपालिकेच्या उच्च अधिकारीवर्ग अभ्यासगटाने नवी मुंबई महानगरपालिकेस भेट देत घनकचरा व मलनि:स्सारण व्यवस्थापनाची माहिती जाणून घेतली तसेच प्रत्यक्ष पाहणी केली आणि प्रणालीचे कौतुक केले.

नमुंमपा आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी महानगरपालिकेच्या वतीने त्यांचे स्वागत केले तसेच घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाची सादरीकरणाव्दारे सविस्तर माहिती दिली.

या अभ्यासगटातील वरिष्ठ पदाधिकारी श्री. के.पत्ताभिराम, स्वच्छ आंध्र महानगरपालिकेचे व्यवस्थापकीय संचालक श्री. बी..अनिलकुमार रेड्डी, महापालिका आयुक्त श्री.डी.दसरध रामी रेड्डी, उप कार्यकारी अभियंता श्री.के.सतीश कुमार, वॉश सल्लागार श्री. छ.भानुप्रकाश व श्री.एम. नागेश्वरा यांनी घनकचरा व्यवस्थापन प्रणाली, निसर्गोद्यान, कोपरखैरणे येथील मलनि:स्सारण केंद्र व टर्शिअरी ट्रिटमेंट प्लान्ट तसेच वैशिष्ट्यपूर्ण आकांक्षी शौचालय आणि इटीसी केंद्र यांना भेटी देऊन प्रशंसा केली.

याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त श्री.सुनिल पवार, शहर अभियंता श्री.शिरीष आरदवाड, घनकचरा व्यवस्थापन उपआयुक्त डॉ.अजय गडदे व श्री.संतोष वारूळे, अति.शहर अभियंता श्री.अरविंद शिंदे व इतर विभागप्रमुख उपस्थित होते.

# सावधान! दुचाकीस्वारांनो मांजा तुमचा करेल घात

**पुणे, दि. २३ : प्रतिनिधी**

शिवण्यामध्ये दुचाकीवरून जाणाऱ्या एका तरुणाचा चेहरा मांजाने कापल्याची घटना घडली. राजेश धावडे (रा. उत्तमनगर) असे या जखमी तरुणाचे नाव आहे. मांजावर बंदी असतानाही शहरासह उपनगरात विविध ठिकाणी अनधिकृतपणे मांजाची विक्री सुरू असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे दुचाकीस्वारांनी आता सावध राहण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

शाळेला सुट्टी लागल्यामुळे मुले सध्या सर्वत्र पतंग उडवत असल्याचे दिसत आहे. उंच आकाशात जागोजागी पतंग दिसत आहेत. परंतु, ह्या पतंगासाठी वापरण्यात येणाऱ्या मांजामुळे नागरिकांच्या जीवाला धोका उद्भवत असल्याचे निदर्शनास आले आहे. पतंग खेळत असताना कट होणाऱ्या पतंगाबरोबर असलेला दोरा नागरिकांच्या गळयाभोवती, तोंडावर गुंडाळला जाऊन नागरिकांना गंभीर जखमा होत आहेत. शिवणे येथील एका नागरिकाच्या गळयाला कापल्याची घटना ताजी असतानाच उत्तमनगर येथील राजेश धावडे यांना मांजामुळे गालावर गंभीर जखम झाली आहे.

**प्रशिक्षणार्थी विमानांना मांजामुळे घडू शकतो अपघात**

शिवणे, उत्तमनगर भागाला लागूनच राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी आहे. येथे विमान चालवण्याचे प्रशिक्षण दिले जाते. अशावेळी अचानक आलेल्या पतंगामुळे दुर्घटना घडू शकते. परिसरातील नागरिकांनी ह्या गोष्टीकडे गांभीर्याने पाहणे गरजेचे असून, पोलिस प्रशासनाने अशा व्यक्तींवर कडक कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.



# मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेमुळे शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठ्यासोबत मोफत वीज योजनेची भरपाई

**मुंबई, दि. २३ : प्रतिनिधी**

शेतकऱ्यांना सिंचनासाठी मोफत वीज देण्याची योजना पुढील पाच वर्षे चालू ठेवण्याचा सरकारचा निर्धार आहे. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० या योजनेमुळे शेतकऱ्यांना दिवसा अखंडित वीज पुरवठा करण्यासोबतच त्यांना मोफत वीज देण्यासाठी होणाऱ्या खर्चाची भरपाई होणार आहे, अशी माहिती मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी विधानसभेत दिली. अत्यंत कमी काळात योजनेची अंमलबजावणी केल्याबद्दल त्यांनी ऊर्जा विभागाचे अभिनंदन केले.

मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, शेतकऱ्यांना दिवसा अखंडित श्री फेज वीज पुरवठा करण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० या योजनेचे काम सुरू केले आहे. त्या अंतर्गत एमएसईबी सोलर अॅग्रो पॉवर लिमिटेड ही देशातील पहिली शेतकऱ्यांना वीज देणारी कंपनी स्थापन केली. कंपनीच्या अंतर्गत १६ हजार मेगावॅट क्षमतेचे वीजनिर्मीतीचे सौर ऊर्जा प्रकल्पांचे काम सुरू केले आहे. यामध्ये ८४२८ कृषी वाहिन्या (फीडर्स) सौर ऊर्जेवर चालवणार आहोत. आतापर्यंत ६६९ मेगावॅट एवढी क्षमता कार्यान्वित झाली आहे. त्यातून १, ३०,४८६ कृषी ग्राहकांना दिवसा वीज पुरवठा सुरू केला आहे. २०२६ पर्यंत १६ हजार मेगावॅटची कामे पूर्ण करून सर्व शेतकऱ्यांना दिवसा अखंडित वीज पुरवठा करण्याचा प्रयत्न आहे.

त्यांनी सांगितले की, शेतकऱ्यांकडून आगामी पाच वर्षात विजेचे बिल घ्यायचे नाही, हा निर्धार कायम आहे. शेतकऱ्यांना मोफत वीज देण्यासाठी अर्थसंकल्पावर सध्या १५ हजार कोटी रुपयांचा भार पडतो तेवढेच पैसे मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेमुळे वाचणार आहेत. सध्या आठ रुपये प्रतियुनिट दराने मिळणारी वीज शेतकऱ्यांना दीड रुपये प्रती युनीट दराने उपलब्ध केली जाते. आता हे बिलही सरकार भरते. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेत तीन रुपये प्रति युनिट दराने वीज मिळणार असल्याने वीज खरेदीत दहा हजार कोटी रुपये वाचतील. तसेच अनुदान आणि क्रॉस सबसिडीच्या पाच हजार कोटी रुपयांची बचत होईल. परिणामी २०२६ पर्यंत शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करण्यासोबतच त्यांच्या मोफत वीज योजनेचे पैसेही मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेमुळे वाचणार आहेत.

मा. मुख्यमंत्री म्हणाले की, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० च्या अंमलबजावणीबद्दल आपण ऊर्जा विभागाचे अभिनंदन करतो. खूप कमी काळामध्ये योजनेसाठी जमीन शोधणे, त्यावर सौर ऊर्जा प्रकल्प विकसित करण्यासाठी निविदा काढणे, विकसक निवडणे हे काम पारदर्शीपणे करण्यात आले. कमीत कमी दरात वीज उपलब्ध करण्यासाठी रिव्हर्स बिडिंग पद्धतीने काम करण्यात आले.

त्यांनी सांगितले की, मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेचे गतीने काम चालू आहे. त्यासाठी ९ लाख कृषी पंप उपलब्ध आहेत. त्यामुळे पेड पेंडिंग आता संपुष्टात येईल. आतापर्यंत २,३६,१८६ सौर कृषी पंप आस्थापित केले आहेत. जेव्हापासून सौर पंप योजना सुरू झाल्या त्या काळात जेवढे सौर पंप लावले त्यापेक्षा अधिक सौर पंप गेल्या एका वर्षात आस्थापित केल्या आहेत. या कामगिरीबद्दल विभागाचे अभिनंदन.

आपल्या सरकारने ऊर्जा क्षेत्रामध्ये खूप मोठ्या प्रमाणात योजना सुरू केल्या आहेत. राज्याची आतापर्यंतची स्थापित वीजनिर्मिती क्षमता ४४ हजार मेगावॅटची आहे. आता ५४ हजार मेगावॅटचे वीज खरेदीचे करार झाले आहेत. सध्या वीज पुरवठ्यामध्ये १६ टक्के वीज अपारंपरिक तर ८४ टक्के पारंपरिक आहे. आपण हाती घेतलेल्या प्रकल्पांमुळे २०३० पर्यंत राज्यात ५२ टक्के वीज पुरवठा अपारंपरिक विजेचा म्हणजेच हरित ऊर्जेचा असेल तर ४८ टक्के वीज पुरवठा पारंपरिक असेल, अशी माहिती त्यांनी दिली.

# गोदामात 9 बाल कामगारांकडून मजुरी

## मालकावर गुन्हा दाखल, अल्पवयीनांची सुटका

**भिवंडी, दि. २३ : प्रतिनिधी**

भिवंडीतील नारपोली पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका गोदामात अल्पवयीन मुलांना कामावर ठेवल्याची घटना भिवंडी तालुक्यातील वेहळे गावातून उघडकीस आली असून सामाजिक संस्थांच्या सक्रियतेमुळे पोलिसांनी छापा टाकून ९ अल्पवयीन मुलांची सुटका केली आहे.याप्रकरणी गोदाम मालक रामा राम सुतार याच्या विरोधात बालकामगार प्रतिबंध कायदा व इतर कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,लोढा अप्पर ठाणे बिल्डिंग टीआरएच्या फ्लॅट क्रमांक ४०३ मध्ये राहणारे रामा सुतार यांचा "स्मार्ट पॅकेजिंग सोल्युशन" नावाने पॅकेजिंगचा व्यवसाय आहे.त्या ठिकाणी बाल कामगारांकडून काम करून घेतले जात होते.गोदामात १२ ते १७ वर्षे वयोगटातील ९ मुलांना इलेक्ट्रॉनिक वस्तू पॅकिंगसाठी ठेवण्यात आल्याचे छाप्या दरम्यान निष्पन्न झाले आहे.यामध्ये रेखा सुनील लष्कर (१४),ज्योती बाबुलकर येल्लप्पा (१४),आशिफ खुशमुद्दीन शेख (१७),आदिती राजु शर्मा (१६),अनुराधारा लक्ष्मण मदेवार (१६),दुर्गा नागेश पवार (१२),सविता प्रकाश (१५),लक्ष्मी नरेश चौधरी (१७),राणी विनोद (सर्व रा.भिवंडी) आदि निरागस मुलांचा समावेश होता.याप्रकरणी आई फाऊंडेशनचे ठाणे जिल्हा प्रमुख राजेश दत्ताराम दखिनकर व अखिल भारतीय सेना यांनी भिवंडी सहायक कामगार आयुक्त कार्यालयात तक्रार केली होती.यानंतर रामा सुतार यांच्या वेहळे येथील राजेश्वरी लॉजेस्टीक पार्क नावाच्या गोदाम क्र.७२५ मधील गाळा क्र.१०७ ते ११० या ठिकाणी नारपोली पोलिस, जिल्हा महिला व बालविकास कार्यालय,सहाय्यक कामगार आयुक्त भिवंडी आदींच्या संयुक्त पथकाने २० डिसेंबर रोजी दुपारी साडे बारा वाजता घटनास्थळी छापा टाकला.छाप्या दरम्यान सर्व मुलांची सुटका करून त्यांना सुरक्षित स्थळी पाठवण्यात आले.पोलिसांनी आरोपी मालक रामाराम सुतार याच्याविरुद्ध बालकामगार कायदा व इतर अनुषंगिक कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. मात्र, मालक फरार असल्याचे सांगण्यात येत आहे. तर आरोपींना लवकरच अटक करणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली.सुटका करण्यात आलेल्या बालकांना सुरक्षित स्थळी पाठवून त्यांची योग्य काळजी आणि पुनर्वसन करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.अशा प्रकरणांमध्ये कडक कारवाई केली जाईल, असे संबंधित प्रशासनाने स्पष्ट केले आहे.नारपोली पोलिसांनी नागरिकांना बालमजुरीसारख्या अमानुष कृत्याची माहिती मिळाल्यास तात्काळ पोलिस किंवा संबंधित विभागाला कळवावे, असे आवाहन केले आहे. बालकामगार कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कारवाई केली जाईल,असेही पोलिस प्रशासनाने सांगितले आहे.या घटनेमुळे भिवंडीतील बालहक्क आणि कामगार कायद्याच्या पालनावर गंभीर प्रश्न निर्माण झाले असून दोषींना कठोर शिक्षा व्हावी आणि मुलांच्या सुरक्षेसाठी ठोस पावले उचलावीत, अशी मागणी सामाजिक संघटनांनी केली आहे.

### शहरातील धोकादायक इमारतींच्या पाडकामातील भ्रष्टाचारावरून आ. रईस शेख आक्रमक

**भिवंडी, दि. २२ : प्रतिनिधी**

शहरात धोकादायक व अतिधोकादायक इमारतींचा प्रश्न गंभीर बनला असून धोकादायक इमारती कोसळल्याच्या अनेक घटना शहरात यापूर्वी घडल्या आहेत ज्यात अनेकांचा जीव गेला आहे.भिवंडी महापालिकेच्या वतीने धोकादायक व अति धोकादायक इमारतींना नोटिसा बजावण्याची मोहीम पावसाळ्यापूर्वी राबविली असून सध्या ठिकठिकाणी धोकादायक इमारतींचे पाडकाम व कारवाई सुरू आहे. मात्र या धोकादायक इमारतींच्या पाडकामात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होत असल्याचा आरोप भिवंडी पूर्वचे आ.रईस शेख यांनी केला आहे. नागपूर येथे राज्याच्या हिवाळी अधिवेशनात आ. शेख यांनी हा मुद्दा उचलून धरला असून भिवंडी महानगरपालिकेचे अधिकारी साकीब खर्बे यांच्यावर भ्रष्टाचाराचा आरोप करत खरबे यांची चौकशी करावी अशी विनंती देखील शेख यांनी सभागृहात केली आहे.आमदार शेख यांच्या मागणीने भिवंडी पालिका वर्तुळात खळबळ उडाली आहे.

# प्राप्तिकर भरा वेळेत; अन्यथा ५ हजारांपर्यंत दंड

## ठराविक दंडासह विलंबित आयकर परतावा भरण्याची अंतिम मुदत ३१ डिसेंबरपर्यंत

■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. २३ :

आर्थिक वर्ष २०२३-२४ साठी ठराविक दंडासह विलंबित इन्कम टॅक्स रिटर्न (ह्यआयटीआर) भरण्याची अंतिम मुदत ३१ डिसेंबर आहे. या मुदतीत तो न भरल्यास आयकर विभागाकडून नोटिस मिळण्यासह मोठा दंड देखील भरावा लागू शकतो. त्यामुळे याकडे दुर्लक्ष न करता तत्काळ इन्कम टॅक्स रिटर्नचे विवरण सादर करण्याचा सल्ला शहरातील चार्टर्ड अकाउंटंट यांनी दिला आहे.

२०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी आयकर परतावा दाखल करण्याची प्रारंभिक अंतिम मुदत ३१ जुलै २०२४ होती; परंतु या मुदतीत जे करदाते इन्कम टॅक्स रिटर्न भरू शकले नाहीत. त्यांच्याकडे आता ३१ डिसेंबरपर्यंत विलंबित आयटीआर दाखल करण्यासाठी शेवटची संधी आहे. प्राप्तिकर कायद्याच्या कलम २३४ एएफ नुसार देय तारखेपूर्वी रिटर्न भरण्यात अयशस्वी झालेल्या व्यक्तींवर उशिरा कर भरण्याचे शुल्क आकारण्यात येते. दरम्यान, ३१ डिसेंबर या अंतिम मुदतीपर्यंत पाच लाखांपेक्षा अधिक उत्पन्न असणाऱ्यांना पाच हजार रुपये; तर अडीच लाख ते पाच लाखांपर्यंत उत्पन्न असणाऱ्यांना एक हजार रुपये दंड भरून विलंबित आयकर परतावा दाखल करता येऊ शकतो, असे या क्षेत्रातील तज्ज्ञांनी सांगितले. कर दात्यांनी अधिसूचित आयटीआर फॉर्म वापरून त्यांचे टॅक्स रिटर्न दाखल करणे आवश्यक आहे.



आयटीआर-यू फॉर्म सोबत भरावा लागणार आहे. कर परताव्याचा दावा करण्यासाठी अपडेटेड रिटर्न सबमिट केले जाऊ शकत नाही. कर दात्यांनी परताव्याच्या दाव्यांसाठी मूळ रिटर्न फाइल करण्याची अंतिम मुदत पाळणे अनिवार्य आहे.

मुदतीचा नियम न पाळल्यास काय होणार? ३१ डिसेंबर या अंतिम मुदतीपर्यंत आयकर परतावा दाखल न केल्यास संबंधित करदात्यांना विविध स्वरूपातील गंभीर समस्यांना तोंड द्यावे लागू शकते. अशा कर दात्यावर ५० ते २०० टक्के कर दायीत्वाचा दंड देखील आकारला जाऊ शकतो. याशिवाय प्रसंगी करदात्यांवर खटला देखील चालवला जाऊ शकतो. कर्ज मंजुरी प्रकरणात मोठी अडचण निर्माण होते. याशिवाय परदेशवारीसाठी व्हिसा अडथळा निर्माण होतो.

# महिलांनी श्रमदानातून साकारला वनराई बंधारा



■ महासागर प्रतिनिधी
बार्शीटाकळी, दि. २३ :

पाणी फाउंडेशनच्या सत्यमेव जयते फार्मर कप स्पर्धेत सहभागी कान्हेरी (सरप) तालुका बाशीर्टाकळी जि. अकोला येथील मैत्री महिला शेतकरी गटातील निमंत्रक व सदस्यांनी एकत्र येऊन सामाजिक कार्य सहभाग म्हणून आपल्या गावातील विद्रूपा नदीच्या पात्रामध्ये वनराई बंधारा तयार केला आहे.

फार्मर कप स्पर्धेत सहभागी शेतकरी गटांचा सामाजिक कार्यात सहभाग असतो. या सहभागातून जलसंधारणाची कामे वृक्षारोपण मोठ्या प्रमाणात करत आहेत. पाणी फाउंडेशनचे महाराष्ट्राचे मार्गदर्शक डॉ. अविनाश पोळ यांचा बाशीर्टाकळी दौरा होऊन गावागावांना मोलाचे मार्गदर्शन मिळत आहे. याचीच पूर्व तयारी म्हणून गटांचे निमंत्रक शीला खंडारे यांच्या नेतृत्वाखाली मैत्री महिला शेतकरी गटाच्या महिला एकत्र येऊन तालुका समन्वयक संघपाल वाहुरवाघ यांचा मार्गदर्शनाखाली एकत्र मिटींग आयोजन करण्यात आली होती. ह्या मीटिंगमध्ये जलसंधारण कामाचे महत्त्व तालुका समन्वयक यांनी महिला गटांना पटवून दिले. कान्हेरी (सरप) हे गाव बार्शीटाकळी तालुक्यातील लोकसंख्येने मोठे गाव असून, सन २०२१७ च्या वॉटर कप स्पर्धेत गावांतील तरुणांनी सक्रिय सहभाग घेतल्याने गावातील पाणी प्रश्न सुटला. गावाच्या शिवारात नदी खोलीकरण, शेततळे, बांध बंदिस्ती, सीसीटी केल्याने गावच्या शिवारातील पाणी पातळीत कमालीची वाढ झाली आहे. महिला शेतकरी गटांनी एकत्र येऊन तयार केलेल्या या वनराई बंधाऱ्याने पुन्हा एकदा वॉटर कपची आठवण करून दिली. यावेळी अनिल खंडारे, राजू शेगोकार व पाणी फाउंडेशन तालुका समन्वयक संघपाल वाहुरवाघ व मैत्री संघ महिला शेतकरी गटाचे निमंत्रक व सदस्य उपस्थित होते.

# आंतरशालेय रंगभरण स्पर्धेत दीड हजार विद्यार्थी सहभागी

■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. २३ :

श्री शिवाजी विद्यालयाच्या अकोला येथील मुख्य शाखेत डॉ, पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या शतकोत्तर रौप्य जयंती महोत्सव आणि कर्मयोगी संत गाडगे महाराज यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून आंतरशालेय रंगभरण स्पर्धा २० डिसेंबरला झाली. या स्पर्धेमध्ये अकोला शहर व परिसरातील सर्व माध्यमांच्या शाळांचे सुमारे १५०० पेक्षा जास्त विद्यार्थी सहभागी झाले होते.



प्रमुख पाहुणे जिल्हा माध्यमिक शिक्षणाधिकारी सुचिता पाटेकर व प्रभात किड्सचे संचालक डॉ. गजानन नारे यांनी उपक्रमाचे व नियोजनाचे भरभरून कौतुक केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक विजय ठोकळ होते. कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. गजानन नारे यांनी केले. यावेळी उद्योजक मूर्तिकार शरद कोकाटे , जय बजरंग विद्यालयाचे कलाशिक्षक आशिष चौथे उपस्थित होते. सोबत मंचावर शाळेच्या उप मुख्याध्यापिका डॉ. निर्मला भामोदे ,पर्यवेक्षक हि. रा. गवई, शिक्षक प्रतिनिधी अमर देशमुख, शिक्षकेतर कर्मचारी प्रतिनिधी पराग ठाकरे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात संगीत विभाग प्रमुख शुभांगी गावंडे यांच्या चमूद्वारे गायलेल्या स्वागतगीताने झाली. त्यानंतर पुष्पगुच्छ देऊन पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. प्रास्ताविक शुभांगी गावंडे यांनी केले. शाळेचे पर्यवेक्षक हि. रा.गवई यांनी गाडगे बाबांच्या जीवनावर आपली कविता सादर केली.

पालकांनी विद्यार्थ्यांना स्पर्धेमध्ये सहभागी होण्यासाठी सहकार्य केले. विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले. मंचावर डॉ. गजानन नारे, आशिष चौथे, शरद कोकाटे यांचा ऋणनिर्देशपत्र व शाल देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कविता शेळके यांनी केले व आभार प्रदर्शन विक्रम गावंडे यांनी केले.

## संत गाडगे महाराजांच्या दशसूत्रीत परोपकारी जीवन जगण्याचे सामर्थ्य : प्रा. गजानन भारसाकळे

■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. २३ :

गाडगे बाबांच्या दशसूत्रीत परोपकारी जीवन जगण्याचे सामर्थ्य असल्याचे प्रतिपादन प्रा . गजानन भारसाकळे यांनी केले. कर्मयोगी संत गाडगेबाबा पुण्यतिथी दिनानिमित्त श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावतीद्वारे संचालित अभियांत्रिकी व तांत्रिकी महाविद्यालयात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते.

महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने पुण्यतिथी कार्यक्रम संपन्न झाला. दीप प्रज्वलनाने तथा विद्यापीठ गीताने कार्यक्रमाला प्रारंभ झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य तथा संगणक विभाग प्रमुख डॉ. एस. एल. सातारकर होते. प्रमुख अतिथी म्हणून महाविद्यालयाचे माजी प्राचार्य तथा विद्यमान संचालक डॉ. अनंत मराठे होते. या दिनाच्या औचित्य साधून संत गाडगेबाबा या विषयावर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकरिता दशसूत्री संदेश वाचन व वक्तृत्व स्पधार्ही घेण्यात आली. प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. ज्योती शेगोकार यांनी केले.

वक्त्यांचा परीचय प्रा. कल्याणी बारब्दे यांनी करून दिला. सूत्रसंचालन शिवानी भुसारे व आभार बतूल अलामदार या विद्यार्थीनिनी केले. कार्यक्रम राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. धर्मेंद्र कोठारी, डॉ. ज्योती शेगोकार व डॉ. व्ही. आर. ठाकरे यांचे प्रमुख नियोजनात पार पडला.


**NAGPUR MUNICIPAL CORPORATION**
**Offline Tender Notice**

Commissioner NMC invite Offline tender for the following works. This Offline tender can be Submitted by the registered contractor of NMC. The terms and conditons of tender are available in tender form the sale and purchase of Offliine tender form at E.E. Zone 02 Office, Harne Marg Gokulpeth Market Dharampeth Zone Office NMC.

| Name of Work | Tender Cost | EMD |
|---|---|---|
| Renovation of Public Toilet at Sudamnagari and Futala Area in Prabhag No. 13 Dharampeth zone 02 | 379227 | 4000 |
| Renovation of Public Urinal at Sitaburdi Market Place Area & Civil Lines Area in Dharampeth zone 02 | 418116 | 4200 |
| Development of Junction Freedom Park Prabhag No. 15 Dharampeth Zone 02 | 478885 | 5000 |

**Note :- 1)** Time period (In Days) 4 month **2)** Cost of Blank Tender form (Rs.590/-). **3)** Class Of ContractorTender Sale & Submission Start Date : 20.12.2024 **4)** Tender Sale & Submission End Date: 27.12.2024 at 4:00 pm. **5)** Date of Opening of Tender (if Possible) : 27.12.2024 at 5:00

**Executive Engineer Zone 02**
Nagpur Municipal Corporation

**Advt No. 799 PR Date 23.12.2024**

P/N/24/799



**पंजाब एण्ड सिंध बैंक**
**PUNJAB & SIND BANK**
(भारत सरकारचा उपक्रम)
मुंबई अंचल

**जागेची आवश्यकता**

शाखा उघडणे / स्थलांतरित करण्यासाठी निम्न परिसरात तळमजल्यावरील जागा किमान १५ वर्षांसाठी भाडेपट्टीवर घेण्यास बँक इच्छुक आहे.


| शाखेचे नाव व परिसर | चटई क्षेत्र चौ.फूट |
|---|---|
| यवतमाळ शहर, जि. यवतमाळ महाराष्ट्र | १०००-१२०० |

इच्छुक पक्षांकडून दोन वेगवेगळ्या लिफाफ्यांमध्ये निर्धारित नमून्यात तांत्रिक व आर्थिक बोलीच्या निविदा मागविण्यात येत आहेत. दोन वेगवेगळ्या लिफाफ्यांमध्ये मोहोरबंद निविदा जमा करण्याची अंतिम तारीख १३ जानेवारी २०२५ आहे.

अधिक तपशीलाकरिता बँकेच्या वेबसाइट **www.punjabandsindbank.co.in** ला भेट द्या.

**आंचलिक प्रबंधक,**
**मुंबई**





# असादचा 'कत्तलखाना'... तुरुंग सेडनाया!

उमर फक्त 15 वर्षांचा होता. त्याचे घर सीरियातील बनियास शहरात होते. 2012 मध्ये असद सरकारच्या विरोधात आंदोलन सुरू होते, त्यात उमरही सामील झाला. पोलिसांनी त्याला पकडले. त्याच्यावर सीरियन लष्कराच्या जवानांची हत्या केल्याचा आरोप होता. थेट सेडनाया तुरुंगात पाठवले. 3 वर्षांनंतर उमर बाहेर आला तेव्हा त्याच्यासोबत या तुरुंगातील भयावह कहाण्या बाहेर आल्या. सेडनाया तुरुंगात गुन्ह्याची कबुली न दिल्याने हात-पाय कापण्यात आले. एक प्रेशर मशिनही होती, यातना करताना कैद्यांना त्यात ठेवून दबाव टाकला जायचा. मरण पावलेल्यांचे मृतदेह आणि त्यांचे कापलेले हातपाय रसायनांनी भरलेल्या प्लास्टिकच्या डब्यात विरघळवले जायचे. उपासमार करणे, मारहाण करणे आणि मानसिक छळ करणे ही सर्वात पूर्वीची पद्धत होती. ऑम्नेस्टी इंटरनॅशनल आणि यूएनच्या म्हणण्यानुसार या तुरुंगात सुमारे 30,000 कैदी मारले गेले.

-------------------

सेडनाया तुरुंगासमोरच्या गेटवर असद सरकारने ज्यांना या तुरुंगात टाकले होते आणि जे पुन्हा कधीही बाहेर येऊ शकत नाहीत, अशा लोकांचे पोस्टर्स चिकटवले आहेत. दमास्कसपासून 40 किमी अंतरावर असलेल्या टेकडीवर असलेले हे तुरुंग असदचे वडील हाफिज अल-असाद यांनी 38 वर्षांपूर्वी त्यांच्या शत्रूंसाठी बांधले होते. आता या जेलच्या गेटवर लिहिले आहे- 'फ्री सीरिया.'

उमर सांगतो, 'मला रोज वाटायचे की मी मरेन. कोठडीत हात पसरण्याइतकी जागा नव्हती. जेवण मिळत नव्हते. बरेच दिवस तहानलेले राहिलो. रोज मारहाण होत होती. हे सर्व तीन वर्षे चालू राहिले.

आता 29 वर्षांचा उमर स्वीडनमध्ये राहतो. सेडनाया तुरुंगात त्याच्यासारख्या दीड लाख लोकांना यातना सहन कराव्या लागल्या, 30 हजारांहून अधिक मरण पावले. आम्हीही दमास्कसहून सेडनायाच्या दिशेने निघालो. डोंगर सुरू होताच थंडी वाढू लागली.

कैद्यांनी सांगितलेल्या कथांनुसार, ही थंडी असद सरकारसाठी कैद्यांना फोडण्याचे साधन होते. त्यांना पाण्यात बुडवून उघड्यावर सोडण्यात यायचे. सेडनायाभोवतीचा संपूर्ण परिसर ओसाड आहे. दूरपर्यंत एक झाडही नाही. थोडं पुढे गेल्यावर समोर डोंगरावर एक त्रिकोणी इमारत दिसली. जळालेली वाहने आणि टाक्या वाटेत उभ्या होत्या. ही वाहने असदच्या सैनिकांची आहेत, ज्यांना त्यांनी सोडून पळ काढला.

कारागृहाच्या मुख्य गेटमधून आत शिरताच तोडफोडीच्या खुणा दिसू लागतात. बंडखोरांनी येथे बांधलेली सुरक्षा चौकी तोडली होती. सर्वत्र काजळ आणि जळण्याच्या खुणा आहेत. गेटवर अनेक पोस्टर्स चिकटवले आहेत. हे पोस्टर त्या कैद्यांचे आहेत ज्यांच्या कुटुंबीयांना वाटत होते की ते तुरुंगात आहेत, परंतु ते येथे सापडले नाहीत.

कारागृह आता निर्जन झाले आहे. असदच्या सैन्याला पराभूत करून दमास्कस ताब्यात घेणारे एचटीएस लढवय्ये सावध आहेत. वेळोवेळी काही सामान्य लोक हे कारागृह पाहण्यासाठी येत असतात. कारागृहाच्या इमारतीत प्रवेश करताच लढ्ढर फायटर भेटले. चेहऱ्यावर मास्क, चष्मा आणि हातात अऽ-47 रायफल. 8 डिसेंबर रोजी तुरुंगावर हल्ला करणाऱ्या गटाचा ते भाग होते. तेव्हापासून ते येथे पहारा देत होते.

एचटीएस फायटर हातिमने सांगितले की, मला इदलिबमधून भरती करण्यात आले होते. हातीमचा भाऊही सेडनाया तुरुंगात बंद होता. तुरुंगावर ताबा मिळवण्याबाबत हातिम म्हणाला, 'आम्ही असदच्या लष्कराशी तीन दिवस लढत होतो. सेडनाया तुरुंगावर कब्जा करण्यासाठी माझी ब्रिगेड जबाबदार होती. तुरुंगाच्या गेटवर काही काळ हाणामारी झाली. यानंतर असदचे सैनिक आपली शस्त्रे आणि रणगाडे सोडून पळू लागले.

'आम्हाला माहीत होते की ते हरले आहेत आणि ते पळून जातील. कारागृह ताब्यात घेतल्यानंतर सर्वात आधी आम्ही कैद्यांचा शोध सुरू केला. त्याची सुटका आमच्यासाठी सर्वात महत्त्वाची होती. याशिवाय कैद्यांवर अत्याचार करण्यासाठी असद सरकार कोणत्या पद्धती वापरत होते, हेही शोधायचे होते. बशर अल-असदची क्रूरता जगासमोर आणायची होती.

सेडनाया कारागृहाच्या पहिल्या मजल्यावर एका ओळीत बॅरेक्स बांधले आहेत. कैद्यांचे कपडे त्यांच्यामध्ये विखुरलेले आहेत. हातीमने सांगितले की, या 10 बाय 20 बॅरेकमध्ये 100 हून अधिक कैदी ठेवण्यात आले होते.

हातीम तुरुंगातून सुटलेल्या काही कैद्यांशी बोलला होता. हातीमने आपला अनुभव आम्हाला सांगितला, 'एवढ्या लहानशा कोठडीत 100-100 लोक अडकले होते. कैद्यांची अवस्था अशी होती की, सर्वांना बसायलाही जागा मिळत नव्हती.

'सगळे एकेक करून झोपायचे, कारण झोपायला जागा नव्हती. एक कैदी फक्त 4 तास झोपायचा, जेणेकरून दुसरा कैदी झोपू शकेल. कोठडीत अंधार पसरलेला होता. कैद्यांना दोन आठवड्यातून एकदा बाहेर काढले जायचे आणि तेही फक्त 2-3 मिनिटांसाठी. यानंतर त्यांना पुन्हा आत बंद केले जाई.

'तुरुंगातील कर्मचारी खूप भ्रष्ट होते. पैसे दिल्यावर पोलीस त्यांना जास्त काळ बाहेर राहू देत. कैद्यांच्या घरून येणाऱ्या वस्तूही ते ठेवत असत. 'या जेलमध्ये यातना सहन कराव्या लागायच्या. सरळ उभे राहण्याची आणि चालण्याची परवानगी नव्हती. फक्त गुडघ्यावर किंवा रांगत चालता यायचे.

'येथे तुरुंगवासाचा अर्थ एकच होता - मृत्यू. कित्येकदा असे वाटले की मृत्यू येणार आहे. इथे आम्ही रोज मरायचो. तुरुंगातील कर्मचारी अनेक दिवस उपाशी ठेवायचे. अनेक कैदी भुकेने मरण पावले.

'असद सरकारचा असा विश्वास होता की भूक हे एखाद्याला मारण्यासाठी सर्वात प्रभावी शस्त्र आहे. दर दोन आठवड्यांनी एक भाकरी मिळायची, तीही कोरडीच. त्यांनी प्यायला पाणी दिले नाही. टॉयलेटला जाता येत नव्हते. जवळच कैदी होते, त्यामुळे त्यांना बॅरेकमध्येही लघवी करता येत नव्हती. पिंजऱ्यात ठेवलेल्या उंदरांपेक्षा त्यांची अवस्था वाईट झाली होती.






बॅरेकच्या बाहेर कृत्रिम पाय पडलेले आहेत. हातीम सांगतो, 'तो टॉर्चर सेल होता.' येथे कैद्यांची बोटे, हात आणि पाय कापण्यात यायचे. कबुलीजबाब मिळवण्यासाठी आणि आपले म्हणणे वदवून घेण्यासाठी अत्याचार करण्याची ही सर्वात क्रूर पद्धत होती. सेडनाया तुरुंगाच्या एका बॅरेकबाहेर अपंग व्यक्तींनी वापरलेले कृत्रिम पाय पडलेले दिसले. ज्या कैद्यांचे पाय कापले गेले होते त्यांना हे नंतर देण्यात आले.

तळमजल्यावर काही यंत्रे येथे ठेवली आहेत. अबू म्हणाला, 'येथे कैद्यांना फाशीची शिक्षा दिली जात होती. प्रेशर मशीनमध्ये टाकून त्यांना दाबले जायचे. कैद्याचा मृत्यू झाल्यास त्याचा मृतदेह कटरने कापून मोठ्या रासायनिक ड्रममध्ये टाकला जात असे. म्हणजे कैद्यांच्या शरीराचे अवयवही सापडले नाहीत. एक मशीन मृतदेह जाळण्यासाठी होती. या खोलीच्या भिंतींवर काजळी आहे.सेडनाया तुरुंगात बांधलेल्या टाक्या पिवळ्या ॲसिडने भरलेल्या होत्या. या टाक्यांमध्ये मृतदेह विरघळवले जायचे

सेडनाया तुरुंग उघडल्यानंतर असद सरकारच्या क्रूरतेची कहाणी समोर आली आहे. कैदी जसजसे पुढे येत आहेत, तसतसे त्यांच्या कथाही पुढे येत आहेत. तुरुंगाच्या भिंतींवर अरबी भाषेत लिहिले आहे - 'सिरियन लोकांची क्रांती यशस्वी झाली आणि सीरिया मुक्त झाला.'

असद पळून गेल्यावर लोक त्यांच्या प्रियजनांचा शोध घेण्यासाठी आले, पण तिथे कोणीच नव्हते 8 ऑगस्ट रोजी, बंडखोरांनी निर्जन टेकडीवर आकारात बांधलेल्या सेडनाया तुरुंगावर कब्जा केला. हे कारागृह दोन भागांत बांधले आहे. वाय आकाराची लाल बिल्डिंग हे जेल आहे, तर व्हाईट बिल्डिंगमधील कैद्यांना फाशीची शिक्षा दिली जात होती.

बंडखोरांनी तुरुंगावर ताबा मिळवताच सेडनाया तुरुंगाबाहेर हजारो लोक जमा झाले. हे लोक सीरियाच्या कानाकोपऱ्यातून आले होते. असद सरकार पडल्याची बातमी येताच पहिली व्यक्ती या तुरुंगाकडे धावली. वर्षानुवर्षे किंवा दशकांपूर्वी बेपत्ता झालेल्या त्यांच्या प्रियजनांना ते शोधत होते.

रडणाऱ्या लोकांनी जड लोखंडी दरवाजे उघडले तेव्हा त्यांना दिसले की आतील बहुतेक खोल्या रिकाम्या होत्या. हातोडा, फावडे आणि ड्रिलच्या सहाय्याने फरशी आणि भिंतींमध्ये छिद्र केले गेले. त्यांना वाटले की कदाचित तेथे काही भूमिगत कोठडी असावी जिथे कैद्यांना ठेवले होते, परंतु त्यांना काहीही सापडले नाही. आपल्या प्रियजनांना पुन्हा भेटण्याची त्यांची आशा धुळीस मिळाली. सेडनाया तुरुंगाच्या रिकाम्या बॅरेक्स. बंडखोरांनी तुरुंग ताब्यात घेतला तेव्हा किती कैदी होते हे माहीत नाही. 13 वर्षांत 30 हजारांहून अधिक कैद्यांचा मृत्यू झाला.

2011 मध्ये सीरियामध्ये उठाव सुरू झाल्यानंतर असदच्या बहुतेक विरोधकांना सेडनाया तुरुंगात ठेवण्यात आले होते. सरकारच्या विरोधात कोणतेही विधान किंवा मतभेद हे तुरुंगात टाकण्यासाठी पुरेसे होते. 2017 मध्ये मानवाधिकार संघटना ॲम्नेस्टी इंटरनॅशनलने अंदाज व्यक्त केला होता की त्यावेळी येथे 10 ते 20 हजार लोक तुरुंगात होते.

2011 ते 2018 दरम्यान 30 हजारांहून अधिक कैद्यांचा मृत्यू झाला. हे मृत्यू अत्याचार, उपचारांचा अभाव किंवा उपासमारीने झाले आहेत. हा अहवाल तयार करण्यासाठी, ॲम्नेस्टी इंटरनॅशनलने सेडनाया तुरुंगात रक्षक, कैदी किंवा कर्मचारी असलेल्या 84 लोकांशी बोलले. त्याचा हवाला देत असे सांगण्यात आले की, सेडनाया तुरुंगात दर दोन आठवड्यांना 20 ते 50 कैद्यांचा मृत्यू होत असे.

मीडिया रिपोर्ट्सनुसार, काही सुटका झालेल्या कैद्यांनी म्हटले आहे की 2018 ते 2021 दरम्यान 500 कैदी मारले गेले. बंडखोरांनी तुरुंग ताब्यात घेतल्यानंतर व्हाइट हेल्मेट संघटनेने येथे बचावकार्य सुरू केले. यासाठी 5 पथके तैनात करण्यात आली होती. जेल इलेक्ट्रिशियनला सोबत आणले. प्रत्येक शाफ्ट, व्हेंट आणि सीवेज उघडून तपासले गेले.

व्हाईट हेल्मेटचे प्रवक्ते घयाथ अबू अल-दहाब म्हणतात, 'तुरुंगात सापडलेल्या कागदपत्रांवरून असे दिसून आले आहे की असद सरकार पडण्याच्या तीन महिन्यांपूर्वी येथे 3,500 हून अधिक कैदी होते. आता आत कोणी अडकण्याची शक्यता नाही, त्यामुळे आम्ही कारवाई थांबवली आहे.

●●●●●●●●●

# अनिष्ट रूढी व परंपरांना सदा विनम्र!

समाजातील जातिभेद, अस्पृश्यता यांसारख्या अनिष्ट रूढी व परंपरांना साने गुरुजींनी नेहमी विरोध केला. सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात हरिजनांना प्रवेश मिळावा, यासाठी त्यांनी सन १९४६च्या दरम्यान महाराष्ट्राचा दौरा केला, या भूमिकेला त्यांनी महात्मा गांधींचा पाठिंबा मिळवण्याचा प्रयत्न केला, तो शेवटपर्यंत मिळाला नाही. अखेर साने गुरुजींनी या मुद्यावर उपोषणाचा मार्ग अवलंबला व त्यांना यश मिळाले. "एका पांडुरंगाने दुसऱ्या पांडुरंगाला खऱ्या अर्थाने मुक्त केले", असे त्या वेळी म्हटले गेले.

----------------

साने गुरुजी हे मराठीतले एक श्रेष्ठ गांधीवादी शिक्षक, स्वातंत्र्यसैनिक, समाजसुधारक आणि प्रतिभावंत लेखक होते. त्यांचा जन्म कोकणातील रत्नागिरी जिल्ह्यातील पालगड या गावी झाला. त्याठिकाणी त्यांचे वडील कोर्टाचे काम करीत असत. कोर्टाचे घराणे साधारणतः वैभवसंपन्न व श्रीमंत समजले जाते व त्यांच्या आजोबांच्या वेळची परिस्थिती तशी होतीही.

पण त्यांच्या वडिलांच्या, सदाशिवरावांच्या वेळेपासून मात्र घराण्याची आर्थिक स्थिती घसरत गेली. ती इतकी की, सदाशिवरावांचे घरदारही जप्तीत नाहीसे झाले. अशा रितीने "बडा घर पण पोकळ वासा" झालेल्या या घराण्यात दि.२४ डिसेंबर १८९९ रोजी पांडुरंग सदाशिव सानेंचा जन्म झाला. त्यांच्यावर त्यांच्या आईच्या शिकवणुकीचा फार मोठा प्रभाव पडला होता. त्यांच्या आईने त्यांच्या बालमनावर जे विविध संस्कार केले त्यातूनच साने गुरुजींचा जीवनविकास झाला. त्यांनी इंग्रजी साहित्यामध्ये एमए. ही उच्च पदवी मिळवली होती.

"जो आवडतो सर्वांला।
तोचि आवडे देवाला।।"

शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी जळगाव जिल्ह्यातील अमळनेर येथील प्रताप हायस्कूल येथे शिक्षक म्हणून सहा वर्षे- सन १९२४ ते १९३०पर्यंत नोकरी केली. प्रताप हायस्कूलच्या वसतिगृहाची जबाबदारी सांभाळताना त्यांच्यातील शिक्षकाला अधिक वाव मिळाला. त्यांनी वसतिगृहातील विद्यार्थ्यांना स्वतःच्या उदाहरणातून स्वावलंबनाचे धडे दिले, सेवावृत्ती शिकवली.

अंमळनेर येथील प्रताप तत्त्वज्ञान केंद्र येथे त्यांनी तत्त्वज्ञानाचा अभ्यासही केला. इ.स. १९२८ साली त्यांनी "विद्यार्थी" हे मासिक सुरू केले. त्यांच्यावर महात्मा गांधींच्या विचारांचा फार मोठा प्रभाव होता. ते स्वतः खादीचाच वापर करत असत. इ.स.१९३० साली त्यांनी शिक्षकाची नोकरी सोडून सविनय कायदेभंगाच्या चळवळीत भाग घेतला. त्यांनी "कॉंग्रेस" नावाचे साप्ताहिक काढले. दुष्काळात शेतकऱ्यांची करमाफी व्हावी म्हणून प्रयत्न केले.

जळगाव जिल्ह्यातील फैजपूर येथील कॉंग्रेस अधिवेशन-१९३६ यशस्वी होण्यासाठी त्यांनी खूप काम केले. इ.स.१९४२च्या चळवळीत भूमिगत राहून स्वातंत्र्याचा प्रचार केला. फैजपूर येथील अधिवेशनात महात्मा गांधींच्या विचारसरणीस अनुसरून त्यांनी मैला वाहणे व ग्राम स्वच्छतेची इतर कामे केली.

साने गुरुजी यांनी राष्ट्र सेवा दलाची स्थापना केली. पत्री या त्यांच्या पहिल्या काव्यसंग्रहातून त्यांच्या देशभक्तिपर कविता प्रसिद्ध झाल्या आहेत. त्यातील बलसागर भारत होवो सारख्या कवितांचा नागरिकांवरील वाढता प्रभाव लक्षात घेऊन ब्रिटिश सरकारने त्या काव्यसंग्रहाच्या प्रती जप्त केल्या होत्या. त्यातील ही एक कविता-

"बलसागर भारत होवो।
विश्वात शोभुनी राहो।।
हे कंकण करी बाँधियले।
जन सेवेत जीवन दिधले।।
राष्ट्रार्थ प्राण हे उरले।
मी सिद्ध मरायाला हो।।"

समाजातील जातिभेद, अस्पृश्यता यांसारख्या अनिष्ट रूढी व परंपरांना साने गुरुजींनी नेहमी विरोध केला. सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात हरिजनांना प्रवेश मिळावा, यासाठी त्यांनी सन १९४६च्या दरम्यान महाराष्ट्राचा दौरा केला,

या भूमिकेला त्यांनी महात्मा गांधींचा पाठिंबा मिळवण्याचा प्रयत्न केला, तो शेवटपर्यंत मिळाला नाही. अखेर साने गुरुजींनी या मुद्यावर उपोषणाचा मार्ग अवलंबला व त्यांना यश मिळाले. "एका पांडुरंगाने दुसऱ्या पांडुरंगाला खऱ्या अर्थाने मुक्त केले", असे त्या वेळी म्हटले गेले. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ते समाजवादी पक्षात सामील झाले. स्वातंत्र्यानंतर आंतरभारती चळवळीच्या मार्गाने त्यांनी भारत जोडण्याचा प्रयत्न केला. विविध राज्यांतील लोकांनी एकमेकांची संस्कृती समजून घ्यावी, अनेक भाषा समजून घ्याव्यात असे या चळवळीत अभिप्रेत होते.

ते स्वतः तमिळ, बंगाली आदी भाषा शिकले होते. सन १९४८मध्ये त्यांनी साधना साप्ताहिक सुरू केले. त्यांच्या कथा, कादंबऱ्या, लेख, निबंध, चरित्रे, कविता यांमधून त्यांच्यातील संवेदनशील साहित्यिकही आपल्याला दिसतो. मानवतावाद, सामाजिक सुधारणा व देशभक्ती ही मूल्ये त्यांच्या साहित्यात ठायी ठायी दिसतात.

त्यांनी एकूण ७३ पुस्तके लिहिली. त्यांनी त्यांचे बहुतांश लेखन हे तुरुंगात असतानाच केले. श्यामची आई ही सुप्रसिद्ध कादंबरी त्यांनी नाशिकमधील तुरुंगात असतानाच लिहिली. आचार्य विनोबा भावे रचितट गीता प्रवचनेसुद्धा विनोबा भावे यांनी धुळे येथील तुरुंगात-१९३२ साली सांगितली व साने गुरुजींनी लिहिली. याच धुळ्यातील तुरुंगात त्यांनी स्वातंत्र्यलढ्यातील सहभागाबद्दल सुमारे १५ महिन्यांचा तुरुंगवास भोगला.

पुढे बंगलोर येथील तुरुंगात असताना त्यांनी तिरुवल्लिवर नावाच्या कवीच्या कुरल नावाच्या तमिळ महाकाव्याचे मराठीत भाषांतर केले. नंतर फ्रेंच भाषेतील लेस मिझरेबल्स या कादंबरीचे दुःखी या नावाने मराठीत अनुवादन केले. डॉ. हेन्री थॉमस या जगप्रसिद्ध मानववंश शास्त्रज्ञाच्या दी स्टोरी ऑफ ह्युमन या पुस्तकाचे मराठीत मानवजातीचा इतिहास असे भाषांतर केले.

"करील मनोरंजन जो मुलांचे।
जडेल नाते प्रभुशी तयाचे।।"

हे गुरुजींच्या जीवनाचे सार होते. मनोरंजनातून मुलांवर सुसंस्कार करण्यासाठी गुरुजींनी अनेक पुस्तके लिहिली. साने गुरुजींचे भारतीय संस्कृती आणि हिंदू धर्मावर निरतिशय प्रेम होते.

त्यानी भारतीय संस्कृती हा ग्रंथ लिहिला. तसेच भारतीय संस्कृतीतील अनेक महापुरुषांची चरित्रे लिहिली. त्यांचे मोरी गाय हे पुस्तक प्रसिद्ध आहे. मातृहृदयी गुरुजींनी आई वडिलांच्या प्रेमावर मोलकरीण नावाची अप्रतिम कादंबरी लिहिली ज्यावर पुढे जाऊन मराठी चित्रपट निघाला. गुरुजींनी लिहिलेली ही कविता खरा धर्म शिकविते-

"खरा तो एकचि धर्म,
जगाला प्रेम अर्पावे।।
जगी जे हीन अतिपतित,
जगी जे दीन पददलित।।
तया जाऊन उठवावे,
जगाला प्रेम अर्पावे।।"

ही कविता भारतीय संस्कृतीची द्योतक आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात साने गुरूजी भारतीय समाजातील असमानता दूर करण्याच्या शक्यतेमुळे निराश झाले होते. महात्मा गांधींच्या हत्येचा त्यांच्यावर खोलवर परिणाम झाला. या शोकांतिकेबद्दल त्यांनी दिलेला प्रतिसाद २१ दिवस उपोषणासाठी होता. साने गुरुजी अनेक कारणांमुळे देशाच्या स्वातंत्र्यानंतर खूप अस्वस्थ झाले. दि.११ जून १९५० रोजी झोपेच्या गोळ्यांचा अतिरेक घेत त्यांनी आत्महत्या केली व जीवनयात्रा संपवली.

"अशी पाखरे येती,
स्मृती ठेवुनीया जाती।
दोन दिसांची रंगतसंगत,
दोन दिसांची नाती।।"

!! साने गुरूजींना जयंतीच्या पावन पर्वावर अनंत कोटी विनम्र अभिवादन !!

●●●●●●●




कृष्णकुमार गोविंदा
निकोडे गुरूजी
रामनगर, गडचिरोली.
९४२३७१४८८३.

# साने गुरुजी

आज भारत मातेचे थोर सुपुत्र, स्वातंत्र्य सैनिक, समाजवादी विचारवंत, सामाजिक कार्यकर्ते, मराठी साहित्यिक साने गुरुजी यांची जयंती.

साने गुरुजी यांचे पूर्ण नाव पांडुरंग सदाशिव साने. त्यांचा जन्म २४ डिसेंबर १८९९ रोजी कोकणातील पालगड येथे झाला. त्यांचे वडील सदाशिवराव हे पालगडचे खोत होते. लहानपणापासून साने गुरुजींचे त्यांच्या आईवर खूप प्रेम होते. त्यांच्यावर त्यांच्या आईच्या शिकवणुकीचा खूप प्रभाव होता. श्यामची आई या पुस्तकात त्यांनी आपल्या आईच्या साऱ्या आठवणी सांगितल्या आहेत.



साने गुरुजींच्या आईने त्यांच्या बालमनावर जे संस्कार केले त्यातूनच त्यांचा जीवनविकास झाला. सर्वांवरती प्रेम करा हा धडा त्यांना त्यांच्या आईनेच दिला. साने गुरुजींचे मन अतिशय भावनाप्रधान व संस्कारक्षम होते. म्हणूनच आईने पेरलेल्या सदभावनांची वाढ त्यांच्या ठिकाणी लवकर झाली. शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी अमंळनेर येथील प्रताप हायस्कूलमध्ये काहीकाळ शिक्षक म्हणून नोकरी केली.

प्रताप हायस्कूलच्या वसतिगृहाची जबाबदारी सांभाळताना त्यांच्यातील शिक्षकाला अधिक वाव मिळाला. त्यांनी वसतिगृहातील विद्यार्थ्यांना स्वावलंबनाचे धडे दिले. सेवावृत्ती शिकवली. १९२८ साली त्यांनी विद्यार्थी हे मासिक सुरू केले. त्यानंतर त्यांनी विपुल लेखन केले. कांदबऱ्या, लेख, निबंध, काव्य, चरित्रे, नाट्यसंवाद अशा सर्व साहित्य प्रकारात त्यांची लेखणी अविरत चालली.

त्यांच्या साहित्यात करुणा, स्नेह, प्रेम या गोष्टीचा वर्षाव झालेला आहे. त्यांच्या भाषेला एकप्रकारची धार आहे, बोध आहे. त्यांनी अतिशय साध्या आणि सोप्या शब्दात लेखन केल्याने लोकांना ते भावले. नाशिकच्या कारागृहात असताना त्यांनी श्यामची आई ही अजरामर कादंबरी लिहिली. धुळ्याच्या तुरुंगात त्यांनी विनोबा भावेंनी सांगितलेली गीताई लिहिली.

साने गुरुजी थोर देशभक्त होते त्यांच्यावर महात्मा गांधींचा मोठा प्रभाव होता. ते स्वतः खादीचाच वापर करत. १९३० साली त्यांनी सविनय कायदेभंग आंदोलनात भाग घेतला त्यामुळे त्यांना तुरुंगवास भोगावा लागला होता. कॉंग्रेस नावाचे साप्ताहिक त्यांनी सुरू केले, दुष्काळात शेतकऱ्यांची करमाफी मिळावी यासाठीही त्यांनी आंदोलन केले होते.

१९४२ च्या भारत छोडो आंदोलनात त्यांनी भाग घेतला. भूमिगत राहून स्वातंत्र्याचा प्रचार, राष्ट्र सेवा दलाचे कार्य या माध्यमातून त्यांनी राजकीय कार्य केले. पत्री या त्यांच्या पहिल्या काव्यसंग्रहात त्यांनी अनेक देशभक्तीपर गीते लिहिली. त्यातील बलसागर भारत होवो... या गीताने तरुणांना स्फुरण चढले या गीताने प्रेरित होऊन हजारो तरुण स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाले.

या गीताचा वाढता प्रसार पाहून इंग्रज सरकारने या काव्यसंग्रहाच्या प्रती जप्त करुन या गीतावर बंदी आणली. साने गुरुजींना अस्पृश्यता, जातीपात, रूढी परंपरा, अंधश्रद्धा याविषयी कमालीची चीड होती. या गोष्टींना त्यांनी नेहमीच विरोध केला. पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात दलितांनाही प्रवेश मिळावा यासाठी १९४६ साली त्यांनी महाराष्ट्राभर दौरा केला. त्यासाठी त्यांनी उपोषण केले त्यांच्या प्रयत्नांमुळेच पंढरपूरच्या विठ्ठलाचे मंदिर सर्वांसाठी खुले झाले. एका पांडुरंगाने दुसऱ्या पांडुरंगाला मुक्त केले असे त्यावेळी म्हटले गेले. स्वातंत्र्य मिळाल्यावर ते समाजवादी पक्षात सामील झाले.

स्वातंत्र्यानंतर आंतरभारती चळवळीच्या माध्यमातून त्यांनी देश जोडण्याचा प्रयत्न केला. विविध राज्यातील लोकांनी एकमेकांची संस्कृती समजून घ्यावी, अनेक भाषा समजून घ्याव्यात असा उद्देश या चळवळीचा होता. त्यांनी स्वतः तामिळ व बंगाली या भाषा शिकल्या होत्या. १९४८ साली त्यांनी साधना हे मासिक सुरू केले. या मासिकांतून ते जनजागृती करू लागले. ११ जून १९५० रोजी त्यांचे दुःखद निधन झाले. साने गुरुजींना जयंतीदिनी विनम्र अभिवादन.

-------------------

श्याम ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

●●●●●●●●●

# थंडीत वाढते सांधेदुखी... या टिप्सचा करा वापर

हिवाळा सुरु झाला की अनेक आजार डोके वर काढतात. जसे फ्लू, सर्दी आणि खोकला किंवा घसा खवखवतो. तसेच सांधेदुखीचा देखील त्रास सुरु होतो. थंडीत संधीवाताची समस्या असणाऱ्या ज्येष्ठांना अधिक त्रास होतो. त्यामुळे आपल्या जीवनशैलीत थोडा बदल करुन आपण या त्रासापासून वाचू शकतो.



**स्वतःला उबदार ठेवा :** सांध्यांना गरम ठेवल्याने स्नायू आखडणे आणि दुखणे कमी होते. गरम पाण्याचा शेक किंवा गरम कपडे घातल्याने स्नायू अधिक मजबूत होतात आणि रक्ताभिसरण वाढते. त्यामुळे सूज कमी होऊन आराम मिळते.

**दररोज व्यायाम करा :** दररोज जर व्यायाम केला तर सांध्याची लवचिकता वाढते. आणि स्नायू आखडण्याचे प्रमाण कमी होते.स्नायू मजबूत होऊन रक्ताभिसरण वाढते. त्यामुळे सूज कमी होते.

**तेलाचा मसाज :** संधीवाताने सांधे आखडतात. त्यामुळे चालताना विशेषतः जिने उतरताना आणि चढताना कळा येतात. त्यामुळे गरम तेलाने सांध्याची मालिश करावी. त्याने आखडलेले स्नायू मोकळे होतात आणि ब्लड सक्युर्लेशन वाढते. तिळाच्या तेलात थोडी हळद टाकून मालिश केल्याने हळदीतील एंटी इंफ्लेमेटरी गुणाचा फायदा होतो.

**हॉट एण्ड कोल्ड थेरपी :** स्नायूंना आराम मिळावा आणि आखडलेपणा दूर करण्यासाठी हीट पॅकर्सचा वापर करु शकता. इंफ्लेमेशन आणि सूज कमी करण्यासाठी कोल्ड पॅकचा देखील वापर करु शकता.

**हायड्रेट रहा :** सांध्यात लुब्रिकेशन राहण्यासाठी तुम्हाला जादा पाणी पायला हवे.थंडीत लोक कमी पाणी पितात त्यामुळे सांध्यात दुखणे आणि सूज येण्याचा प्रकार सुरु होतो.त्यामुळे जास्त पाणी प्यावे.

**ओमेगो- ३ फॅटी एसिड :** सांध्यातील दुखणे आणि तसेच सांध्यात अवघडलेपणा दूर करण्यासाठी

**आहारात ओमेगा :** ३ फॅटी एसिडचा समावेश करावा, त्यासाठी तुम्हाला माशाचे तेल,आळशीच्या बियांचा आहारात समावेश करावा लागेल.

**हळद आणि आल्याचा चहा :** हळद आणि आल्यात दोन्हीत पॉवरफूल इंफ्लेमेटरी गुण असतात. रोज एक कप हळद- आल्याचा चहा प्यायल्याने सूज कमी होते. सांध्यातील गतिशीलतेत सुधारणा होऊन सांधे दुखणे आणि आखडणे कमी होण्यास मदत होते.

●●●●●●●●●

## अशोकायन

### संत महिमा

संसारात लपलेला आहे सार
त्याला शोधण्या घ्यावा
संताचा आधार
तरच भवसागर होईल पार..

अन्यथा घ्या कितीही डुबक्या
हाती लागतील ' गोटे '
पस्तावाल मनी
म्हणणे नाही खोटे ..

गीता उपदेश आचरता
मिळे मानवा मुक्ति
अन्यथा जन्मी आला हेला
अशी होते भाऊ दुर्गती..!



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

# रब्बी हंगामाचे कर्ज वितरण केवळ २३%
# पेरणी मात्र १० टक्क्यांवर

■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. २३ :

जिल्ह्यात रब्बी हंगामातील पिकांची पेरणी ९० टक्केपेक्षा जास्त झाली असली तरी कर्ज वितरण मात्र २३.३२ टक्केच झाले आहे. काही बँकांकडून पुनर्गठणासाठी आग्रह धरण्यात येत आहे. अनेक जण कर्जमाफीच्या प्रतीक्षेत असून, नवीन योजनेत थकीत कजार्ची कोणती तारीख निश्चित होते, याकडेही त्यांचे लक्ष लागले आहे. परिणामी सध्या कजार्ची टक्केवारी कमी असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. गतवर्षी २९ टक्के कर्जवितरण झाले होते.

यंदा खरीप हंगामात कधी अवर्षण तर कधी अतिवृष्टीमुळे उत्पादन प्रचंड प्रमाणात घटले. परतीच्या पावसानेही शेतात सोंगून ठेवलेले सोयाबीन व कपाशीचीही हानी झाली. परिणामी शेतकऱ्यांनी



पिकासाठी लावलेला खर्चही निघाला नाही, अशी स्थिती आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी रब्बी हंगामावर लक्ष केंद्रीत केले असून, ९० टक्क्यांपेक्षा जास्त क्षेत्रावर पेरणीही झाली. मात्र रब्बीसाठी लागणारा पैसा जमा करण्याकरिता शेतकऱ्यांनी प्रचंड कसरत होत असल्याचे कर्ज वितरणाच्या टक्केवारीवर नजर टाकल्यास दिसून येते. त्यामुळे आता आगामी काळात तरी ही टक्केवारी वाढणार काय, हे लवकरच दिसून येईल. त्ररब्बी हंगामात कर्ज वितरण कमी होण्यामागे अनेक कारणं असल्याचे कृषी अर्थ तज्ज्ञ तथा शेतकरी चळवळीतील नेत्यांचे म्हणणे आहे. शेतकऱ्यांना बँका कर्जपुनर्गठणाचा पर्याय सुचवत असल्याचे शेतकरी संघटनेचे युवा आघाडीचे विदर्भ अध्यक्ष डॉ. नीलेश पाटील यांचे म्हणणे आहे. त्रपुनर्गठणाच्या आग्रहामुळेही काही जण कर्ज घेत नाहीत. रब्बीचे कर्ज फेडण्यासाठी ३१ मार्चपर्यंत मुदत देण्यात येते. मुळात ही मुदतच ४-५ महिनेच असते.

त्यामुळे हा कालावधी वाढवून तोही खरीपप्रमाणेच करणे आवश्यक असल्याचे शेतकरी जागर मंचाचे संयोजक प्रशांत गावंडे यांनी नमूद केले. खरीपमध्ये जून व जुलै महिन्यात अतिवृष्टीमुळे ९ हजार ५८८ हेक्टरवरील पिकांना फटका बसला. ऑगस्ट व सप्टेंबर महिन्यात अतिवृष्टीमुळे ५७ हजार ७५८ हेक्टर क्षेत्रावरील पिकांची हानी झाली. त्यामुळे शेतकऱ्यांना आता रब्बी हंगामातून उत्पन्न मिळेल, अशी आशा आहे.

अशी आहे पेरणीची स्थिती जिल्ह्यात सरासरी क्षेत्र १ लाख २१ हजार १०४ हेक्टर असून, पेरणी १ लाख ६ हजार १५ हेक्टर क्षेत्रावर झाली. टक्केवारी ९० टक्के आहे. त्यामध्ये हरभरा आघाडीवर असून, ८५ हजार ८६८ हेक्टरवर पेरणी झाली आहे. याशिवाय गहू, मका पिकांनाही यंदा प्राधान्य देण्यात आले आहे.

कर्ज वितरणाचा तपशील यंदा रब्बीत २०० कोटींच्या कर्ज वितरणाचे उद्दिष्ट आहे. ४६ कोटी ६४ लाखाचे कर्ज वितरण झाले आहे, असे जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक नयन सिन्हा यांचे म्हणणे आहे. राष्ट्रीयकृत बँकांनी ३५ कोटी ५४ लाख वितरीत केले असून, टक्केवारी ४० पर्यंत पोहोचल आहे. खासगी बँकांचे उद्दिष्ट ९० टक्के झाले असून ही रक्कम ९ कोटी ४६ लाखापर्यंत आहे. कोकण बँकेने १ टक्के कर्ज वितरण केले.

## साळुंकाबाई राऊत विद्यालयात स्नेहसंमेलन
### १८ कला प्रकारातील ३६ विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र

■ महासागर प्रतिनिधी
मंगरूळपीर, दि. २३ :

मंगरूळपीर तालुक्यातील आदर्श ग्राम वनोजा येथील श्रीमती साळुंकाबाई राऊत कला व वाणिज्य महाविद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन "युवारंग २०२४ चे आयोजन १८ ते २१ डिसेंबर या दरम्यान करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन तसेच द्वीप प्रज्वलन करण्यात आले.



याप्रसंगी अध्यक्ष म्हणून ज्ञानगंगा शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्षा कमलाबाई राऊत, उद्घाटक म्हणून सचिव सुशीलाबाई राऊत, प्राचार्य डॉ. देवेंद्र गावंडे, डॉ. जयाप्रभा भगत, आदित्य इंगोले, भाविका राऊत, शिवानी पाटील, डॉ. सचिन कडू उपस्थित होते. मान्यवरांनी उपस्थित विद्यार्थ्यार्ना मार्गदर्शन केले. तसेच २१ तारखेला सहभागी विद्यार्थ्यांना पारितोषिक व बक्षीस वितरण करण्यात आले. या समारोपीय कार्यक्रमाच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. यात एकूण १८ कला प्रकारातील ३६ विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. या समारोपीय कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ देवेंद्र गावंडे यांनी केले. तर सूत्रसंचालन प्रा. बापूराव डोंगरे यांनी केले.

आभार आयोजक डॉ सचिन कडू यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील डॉ. गजानन घोंगटे, डॉ. ममता पाथ्रीकर, प्रा. दीपक भगत, डॉ. सुनील बोरचाटे, प्रा. बापूराव डोंगरे, प्रा. राधिका सावके, प्रा. रवी कुटे, प्रा. अन्वर गारवे, प्रा. दिलीप मुंदे, प्रा. धनराज पाथ्रीकर, प्रा. निलेश राऊत, प्रा. तृषाल राऊत, प्रा. चेतन महल्ले, प्रा. आकाश बुधे, प्रा. अक्षय आव्हाळे, प्रा. वैभव राऊत, संजय राऊत, गणेश राऊत, गजानन बायस्कार, गणेश आडे, पांडुरंग डाबेराव, सचिन राणे, आदित्य इंगोले यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

वेशभूषा केलेला विद्यार्थी वार्षिक स्नेहसंमेलनात सहभागी झालेले संस्थेचे पदाधिकारी व इतर मान्यवर. स्नेहसंमेलनात विविध स्पर्धेचे आयोजन या स्नेहसंमेलनात वाद-विवाद स्पर्धा, वक्तृत्व, प्रश्नमंजुषा, वेशभूषा , गीत गायन, नृत्य स्पर्धा, व्हॉलीबॉल , कबड्डी , १०० मी. धावणे, लिंबू चमचा, संगीत खुर्ची आदी खेळ होते.

## समर्थ महाविद्यालयामध्ये पालक मेळावा उत्साहात

■ महासागर प्रतिनिधी
बुलडाणा, दि. २३ :

समर्थ कॉलेज ऑफ फार्मसी मध्ये डी फार्म च्या पालक मेळावा आयोजित केला होता. विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा आलेख, विद्यार्थ्यांची उपस्थिती पालकांना समजावी या उद्देशाने पालक मेळाव्याचे आयोजन केले होते . यावेळी प्राचार्य प्रफुल ताठे, उपप्राचार्य डॉ गोपाल सीताफळे, डॉ पुरुषोत्तम लढा, प्रा किशोर चराटे, प्रा.सुनील कोल्हे उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी नियमित महाविद्यालयात उपस्थित राहणे अनिवार्य आहे व वेळोवेळी प्राध्यापकांनी सांगितलेले असाइनमेंट पूर्ण करणे आवश्यक आहे. तरच विद्यार्थी प्रगती करू शकतो. असे मनोगत यावेळी प्रसंगी डॉ प्रफुल ताठे यांनी व्यक्त केले. महाविद्यालय तीन वर्षांपासून उत्कृष्ट मानकांना मध्ये आहे व उत्कृष्ट निकालाची परंपरा विद्यालयाची कायम आहे. अशी माहिती डॉ.गोपालकृष्ण सिताफळे यांनी दिली.

याप्रसंगी डॉ.पुरुषोत्तम लड्डा व प्रा किशोर चराटे यांनी विचार व्यक्त करत असताना महाविद्यालय विद्यार्थ्यांच्या हितासाठी विविध उपक्रम राबवित असल्याची माहिती दिली. कार्यक्रमाचे संचालन सुनील कोल्हे यांनी तर आभार किरण सानप यांनी केले. कार्यक्रमाला प्रा उगले, प्रा तायडे, प्रा. पिंपळे ,प्रा शालिनी अंभोरे यांची उपस्थीती होती. कार्यक्रमासाठी वैभव तळेकर, नारायण वाघ, शरद नागरे, निरंजन डांगे यांनी प्रयत्न केले. याप्रसंगी पालकांनी मनोगत व्यक्त करीत असताना महाविद्यालयाबद्दल भावना व्यक्त केल्या व महाविद्यालयाने राबवीत असलेल्या उपक्रमाबद्दल कौतुक केले.

# कोंडोली येथील अनुजा राऊत प्रशासकीय सेवेसाठी सज्ज
## पुणे शहरात पोलिस उपनिरीक्षक पदाचा स्वीकारणार पदभार

■ महासागर प्रतिनिधी
मानोरा, दि. २३ :

कोंडोली येथील शिक्षक श्रीकृष्ण राऊत यांची कन्या अनुजा राऊत या पिंपरी चिंचवड पुणे येथे पोलीस उपनिरीक्षक पदी रुजू होणार आहेत. राज्य लोकसेवा आयोगामार्फत निवड झालेल्या राज्यातील एकूण ६२० पोलिस उपनिरीक्षकांचे वर्षभराचे प्रशिक्षण पूर्ण केलेल्या नाशिक येथील पोलिस अकादमी मध्ये नुकताच दीक्षांत समारंभ पार पडला. ४१० पुरुष आणि २१० महिलांचा यात समावेश आहे.

अनुजा राऊत यांनी राज्य लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेद्वारे पोलिस उपनिरीक्षक या पदासाठी निवड झाल्यानंतर त्यांनी पोलिस अकादमीत आपले प्रशिक्षण पूर्ण केले. आज पिंपरी चिंचवड येथे पोलिस उपनिरीक्षक पदाचा पदभार स्विकारणार असल्याची माहिती त्यांच्या पालकांनी दिली. अनुजा राऊत यांनी मिळवलेल्या यशाबद्दल गावकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.



## अंगदुखीच्या समस्यांमुळे महिला योग वर्गाकडे

■ महासागर प्रतिनिधी
यवतमाळ, दि. २३ :

यवतमाळ शारीरिक आणि मानसिक तंदुरुस्ती राखण्यासाठी महिलांचा कल योग वर्गांकडे वाढल्याचे चित्र आहे. सुरूवातीला नगण्य असणारे हे प्रमाण कोरोना काळानंतर ४० टक्क्यांनी वाढले आहे. सध्या यवतमाळ शहरात जवळपास ३० ते ४० क्लासेस योगाचे घडे देत आहे.

यासाठी दोन ते तीन सत्रात एक हजार महिला योगाचे प्रशिक्षण घेत आहेत. यात सर्वाधिक महिला जीवनमान बदलल्याने अंगदुखी वाढल्याची तक्रार घेऊन योगाच्या वर्गाला जात आहेत.

आंतरराष्ट्रीय योग दिनामुळे योगाला महत्त्व शरीर, मन व बुद्धीची एकाग्रता साधण्यासाठी व आरोग्य चांगले राहण्यासाठी योगसाधना अतिशय महत्त्वाची आहे. योग साधनेमुळे शारीरिक व मानसिक आजार दूर ठेवणे शक्य होते.

या गोष्टी लक्षात घेत २१ जून हा आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा केला जात आहे. योग साधनेला आंतरराष्ट्रीय स्तरावर अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. सध्या शाळा, महाविद्यालये, सेवाभावी संस्था आदी ठिकाणी योग दिनानिमित्त कार्यक्रम होतात.

### तलाठी मारहाण प्रकरणातील आरोपीला अटक

■ महासागर प्रतिनिधी
यवतमाळ, दि. २३ :

राळेगाव तालुक्यातील पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या तलाठी हल्ल्यातील तीन आरोपींना शनिवारी अटक करण्यात आली. प्रतीक दशरथ वाढोणकर, वय ३४ वर्ष रा. वाढोणा बाजार, सतीश बाबाराव मडावी, वय २५ वर्ष रा. दादा बादशहा नगर, राळेगाव आणि प्रमोद मोतीबाबा सोनुले, वय २५ वर्ष रा. वरध, ता. राळेगाव असे अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत.

याप्रकरणी प्राप्त माहितीनूसार, राळेगाव तालुक्यातील वडकी येथे तलाठी मिलिंद नामदेवराव लोहात हे कार्यरत आहे. तीन दिवसांपूर्वी त्यांच्यावर तिघांनी हल्ला केला होता. याप्रकरणी वडकी पोलिस ठाण्यात तक्रार देण्यात आली होती.

## धर्म जागरण करणाऱ्यांचे मनोबल ब्राह्मण समाजाने उंचवावे : राहुल आळमस्त

■ महासागर प्रतिनिधी
शेगाव, दि. २३ :

प्रथम राष्ट्र या भावनेतूनच सर्व जातीच्या लोकांनी काम केले पाहिजे व हिंदूंना अधिक संघटित करून देश मजबूत केला पाहिजे अ. भा. ब्राह्मण महासंघाने पुढाकार घेऊन नवीन कपडे भेट देऊन या अभियानाला मोठा पाठिंबा दिला आहे त्यामुळेच धर्म जागरणाचे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचे मनोबल वाढून कामाला वेग येईल व देश सुरक्षित आणि मजबूत स्थितीत येईल, असे प्रतिपादन विदर्भ प्रांत परीयोजन प्रमुख राहुल आळमस्त यांनी केले.

अ. भा. ब्राह्मण महासंघ शाखा शेगावच्या वतीने नवीन साड्या आणि शर्ट पिस घरवापसीची अभियानात भेट स्वरुपात सुपूर्द



करण्यात आल्या या वेळी ते बोलत होते. हा कार्यक्रम "मधुकर स्मृती "संघ कार्यालयाच्या सभागृहात झाला. या वेळी आळमस्त म्हणाले की, धमार्जागरण मंचच्या वतीने देशभर अभियान सुरू आहे.

या अभियानात अ. भा. ब्राह्मण संघ शेगाव शाखेने अतुलनीय योगदान दिले आहे. या वेळी महेंद्र रायचुरा यांनी धर्म जागरण मंचची माहिती उपस्थिताना दिली तसेच दहा हजार साड्या या अभियानाला लागतात. त्या समाजाने भेट स्वरुपात धर्म जागरण मंचला द्याव्या, असे ते म्हणाले व या अभियानाला सवोतोपरी तन-मन-धनाने पाठिंबा देण्याचे आवाहन केले.

## निमगाव येथील अभ्यासिकेला पुस्तकांची भेट

■ महासागर प्रतिनिधी
नांदुरा, दि. २३ :

कृषी अधिकारी प्रशांत जामोदे यांनी वडील, सेवानिवृत्त शिक्षक समाधान बळीराम जामोदे यांच्या ७५ व्या वाढदिवसाचे औचित्य साधून निमगाव येथील स्पर्धा परीक्षेचे अभ्यास करणाऱ्या अभ्यासिकेतील विद्यार्थ्यांना पुस्तके रविवारी २२ डिसेंबरला देऊन वडीलाचा वाढदिवस साजरा केला. या अभ्यासिकेतून शासकीय नोकरीत दाखल झालेल्या माजी विद्यार्थ्यांचा सत्कार त्यांनी केला. तालुक्यातील निमगाव येथे शेतकरी पुत्र अभ्यासिका ही ग्रामपंचायत आवारातील सामाजिक सभागृहात दहा वर्षांपासून कार्यरत आहे. परिसरातील विद्यार्थी येथे एकत्र येऊन स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करतात. त्यांना स्पर्धा परीक्षांची नवीन पुस्तके उपलब्ध व्हावी व



नवीन पुस्तकांतून त्यांचा उत्साह द्विगुणीत करण्यासाठी कृषी अधिकारी प्रशांत जामोदे यांनी त्यांच्या वडिलांचा ७५ वा वाढदिवस अभ्यासिकेत साजरा केला. सेवानिवृत्त शिक्षक समाधान बळीराम जामोदे यांच्या वाढदिवसानिमित्त स्पर्धा परीक्षेची पुस्तके जामोदे परिवाराने अभ्यासिकेला भेट दिली. यावेळी आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी निमगावचे सरपंच विकास इंगळे होते.

तर शेतकरी पुत्र अभ्यासिका हा उपक्रम सर्वत्र राबविण्यासाठी पुढाकार घेणारे राजेश गावंडे, सुहास वाघमारे, ग्रामपंचायत सदस्य जानराव इंगळे, योगेश चावरे, महेंद्र भोपळे, बाबुराव शिवलकर यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कृषी अधिकारी प्रशांत जामोद यांनी केले. यावेळी राजेश गावंडे यांनी सेवानिवृत्त शिक्षक समाधान जामोदे यांचा ७५ व्या वाढदिवसानिमित्त शाल व श्रीफळ देऊन त्यांचा गौरव केला. या कार्यक्रमात शासकीय सेवेत रुजू झालेले दीपक गावंडे, प्रशांत तायडे, सुनील वानखडे, रवींद्र सूर्यवंशी, वैभव बोंबटकर, मनोज क्षीरसागर, निंबाजी ढोले, शुभम राखोंडे, भूषण चोपडे, जीवन पुरी, मयूर पाऊलझगडे, राजेश गिरी, नितीन बगाडे, विवेक चोपडे, अमोल अवचार, राजकुमार कुटे यांनी अभ्यासिकेतून मिळवलेल्या यशाची माहिती दिली. या वेळी अभ्यासिकेतून अभ्यास करून स्पर्धा परीक्षांमधून शासकीय सेवेत रुजू झालेल्या अभ्यासिकेच्या माजी विद्यार्थ्यांनी त्यांचे मनोगत व्यक्त केले.

# निःस्वार्थ सेवा फाउंडेशनतर्फे आयोजित शिबिरात ८६ दात्यांनी केले रक्तदान

■ महासागर प्रतिनिधी
यवतमाळ, दि. २३ :

रेमंड युको डेनिम व निस्वार्थ सेवा फाउंडेशन यांचे संयुक्त विद्यमाने रेमंड युको डेनिम प्रा.ली. येथे रक्तदान शिबिर नुकतेच घेण्यात आले. या रक्तदान शिबिरात ८६ रक्तदात्यांनी आपले रक्तदान करून सामाजिक कार्य पार पाडले.

शासकीय रक्तपेढीमध्ये मागील अनेक दिवसांपसून रक्ताचा तुटवडा निर्माण झाला होता. त्यामुळे रुग्णालयातील रुग्णांना रक्त मिळणे कठीण झाले होते. थालेसेमिया, सिकलसेल, प्रसुती तसेच अपघातग्रस्त अशा अनेक रूग्णांना रक्ता अभावी उपचार घेणे अवघड झाले होते.

निःस्वार्थ सेवा फाउंडेशन या रुग्णांना रक्त मिळावे, यासाठी सातत्याने प्रयत्नशील असते. निस्वार्थ सेवा फाउंडेशन यांनी रेमंड युको डेनिम प्रा. ली.

या कंपनीच्या अधिकाऱ्यांना रक्तदान शिबिराचे आयोजन



करण्याचे आवाहन केले. त्यांनी लगेचच रक्तदान शिबिर आयोजनासाठी परवानगी दिली. रेमंडमधील अधिकारी व कामगारांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. शिबिरामध्ये ८६ रक्तदात्यांनी उपस्थित राहून रक्तदान केले. शिबिराचे उद्घाटन नितीन श्रीवास्तव, संतोष चांडक यांचे हस्ते करण्यात आले.

शिबिरासाठी रेमंड युको डेनिम प्रा.ली कंपनीतर्फे नितीन श्रीवास्तव, पातुरकर, संतोष चांडक, जयविर राठोड, मयूर काळे, निलेश कळसकर, अझर खान, श्यान इंगळे, निलेश कोरे आणि अनेक अधिकारी व कर्मचाऱ्यांनी पुढाकार घेतला. निस्वार्थ सेवा फाऊंडेशनतर्फे अनिकेत नवरे, परशुराम कडू, निलेश जगताप, आस्तेश गावंडे यांनीही पुढाकार घेतला.

शासकीय रक्तपेढीच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सुध्दा शिबिरासाठी सहकार्य केले. शासकीय रक्तपेढीतर्फे डॉ. विकास भरकाडे, समाजसेवा अधीक्षक आशिष दहापुते, आशिष खडसे, मोहन तडवेकर, अतुल राऊत, अनिकेत राठोड, अनिकेत चव्हाण, अंजली जाधव, पल्लवी राठोड, स्नेहल शिवनकर, दीक्षा राऊत या सर्व चमूने सहकार्य केले.

## संत गाडगेबाबांनी संतांचे उरलेले कार्य सिद्धीस नेले : गणेश धर्माळे

■ महासागर प्रतिनिधी
पुसद, दि. २३ :

अज्ञान, अंधश्रद्धा, अस्वच्छता यांनी बुरसटलेल्या समाजाचा विकास करण्यासाठी दिवसा हातात खराटा घेऊन ग्रामस्वच्छता व रात्री कीर्तनातून मनाची शुद्धता करत संतांचे उरलेले कार्य सिध्दीस नेणारे राष्ट्रसंत गाडगे महाराज एक थोर संत व समाजसुधारक होते, असे प्रतिपादन मुख्याध्यापक गणेश धर्माळे यांनी गाडगे महाराजांच्या पुण्यतिथीदिनी केले.

मातोश्री सुभद्राबाई जिल्हेवार विद्यालय श्रीरामपूर येथे कर्मयोगी गाडगे महाराजांना पुण्यतिथीनिमित्त अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक गणेश धमार्ळे, तर प्रमुख अतिथी बाळकृष्ण मंदाडे, विशेष अतिथी छाया वाघमारे उपस्थित होते. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन करून स्वच्छतेचे अग्रदूत गाडगे महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या वेळी राजनंदिनी काळे व पुजा पांडे यांनी सुरेल आवाजात स्वागतगीत सादर केले. रोहित पतंगे, हिना शेख मुकद्दर, आर्यन वाघमारे, लखन भालेराव, रोहन टारफे, रुपाली भगत यांनी गाडगे महाराजांच्या जिवन कार्यावर प्रकाश टाकला. या वेळी धमार्ळे पुढे म्हणाले की, गाडगे बाबा चालते बोलते विद्यापीठ होते.

गाडगेबाबा यांनी समाजात धर्माच्या नावाखाली होत असलेला अन्याय, अत्याचार, अनीति दूर करण्यासाठी आयुष्य वेचल्याचे सांगितले. तर छाया वाघमारे म्हणाल्या की, गाडगे बाबांनी लोकांना सुग्रास जेवण देवून स्वतः काम करून शिळ्या भाकरीचे जेवण केले.

गोधडीवजा फाटके कपडे घालून लेकी-सुना यांना नवीन साड्या व लुगडे दिली. कित्येक धर्मशाळा लोकांसाठी बांधल्या पण स्वतः उघड्यावर झोपले. त्यांचे जिवन धगधगते वैराग्य होते. राज्यातील प्रमुख शहरात व तीर्थक्षेत्री धर्मशाळा, आश्रमशाळा, नद्यांना घाट, पानपोया, गोरक्षण, अंध अपंगासाठी सदावर्त, मुलांसाठी शाळा कॉलेज व वसतिगृहे बांधली.

त्यांचे नाव अमरावती विद्यापीठास दिले. यावरूनच त्यांचे मोठेपण सिद्ध होत असल्याचे नमूद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिल अस्वार, तर आभार दत्ता पांडे याने मानले.

संत गाडगे बागांनी अनिष्ठ रूढी परंपरेचा कीर्तनातून विरोध केला. चोरी करु नका, कर्ज काढू नका, व्यसनाच्या आहारी जाऊ नका, अशा अनेक बाबींवर त्यांनी जनजागृती केली, असेही गणेश धमार्ळे यांनी नमूद केले. प्रमुख अतिथी बाळकृष्ण मंदाडे यांनीही महाराष्ट्र समाजाचे व्यासपीठ, स्वच्छता, प्रामाणिकपणा, भूतदया असणाऱ्या व देव हा दगड, धोंड्यात नसून माणसांत आहे, अशी शिकवण गाडगे बाबांनी दिल्याचे सांगितले.

**Change Of Name**

MY OLD NAME WAS **KHATIJA HAIDER ALI**. NOW MY NEW NAME IS **KHADIJA BURHANUDDIN BADRI.**
**ADD:** WEEKLY MARKET KHAMGAON BULDHANA 444303

MY OLD NAME WAS **GULAM HASHMEE.** NOW MY NEW NAME IS **GHULAM HASHMI.**
**ADD:** P. NO. 815 SAIFI NAGAR MOMINPURA NAGPUR 440018

MY OLD NAME WAS **NEETU THAKRANI.** NOW MY NEW NAME IS **NEETA THAKRANI.**
**ADD:** BAZAR AREA, DESAIGANJ (VADASA) GADCHIROLI 441207 MH

MY OLD NAME WAS **PRANITA PRADIP WANARE.** NOW MY NEW NAME IS **PRANITA ASHISH ZADPE.**
**ADD:** PLOT NO.116, TAPDIYA ESTATE, HINGOLI- 431513

MY OLD NAME WAS **SHAMINA ALI SAYYED MUSHTAQ ALI / SHAMINA SAIYED MUSTAQ ALI.** NOW MY NEW NAME IS **SHAMINA NAZ MOHAMMAD ASIF IQBAL.**
**ADD:** PLOT NO 297 GUPTA STEEL BHANDAR GADDIGODAM NAGPUR 440001.

MY OLD NAME WAS **SYED NAJEERUDDIN / SYED NAJEERUDDIN S/O SUBHAN.** NOW MY NEW NAME IS **NAJEERUDDIN RAO S SYED.**
**ADD :** BALAJI DAWAKHANA KAMPTEE NAGPUR 441002.



# चला करू या बंजी जंपिंग

भटकंती

भारतातही सध्या धाडसी खेळ म्हणजे ॲडव्हेंचर स्पोर्टसची क्रेझ वाढू लागली आहे. रिव्हर राफ्टिंग,गिर्यारोहण, रॉक क्लाईंबिंग असे प्रकार लोकप्रिय होत आहेत. बंजी जंपिंग हा सुद्धा असाच एक धाडसी खेळ. गेल्या काही वर्षांत बंजी जंपिंगचं प्रस्थ चांगलंच वाढलं आहे. आपल्याकडच्या अनेक शहरांमध्ये बंजी जंपिंगही सोय आहे. तुम्हालाही धाडसी खेळांची आवड असेल, जिंदगी ना मिलेगी दोबारा म्हणत जगावेगळं काहीतरी करण्याची हौस असेल तर बंजी जंपिंगची सुविधा असणाऱ्या काही ठिकाणांना नक्की भेट द्या.

✽ ऋषीकेशला हे धार्मिक स्थान तर आहेच. शिवाय इथे धाडसी खेळांची आवड असणाऱ्यांनाही खूप मजा करता येते. इथल्या मोहन छत्ती येथे बंजी जंपिंगची सोय आहे. इथलं बंजी जंपिंग हा अविस्मरणीय अनुभव ठरू शकतो. निश्चित स्थानाहून बंजी जंपिंग करता येणारं हे भारतातलं एकमेव ठिकाण आहे. जमिनीपासून ८३ मीटर उंचीवर बंजी जंपिंगचं स्थान तयार करण्यात आलं आहे. म्हणूनच हा सर्वात थरारक अनुभव ठरू शकतो.

✽ लोणावळ्यालाही बंजी जंपिंगची सोय आहे. इथे तुम्ही ४५ मीटरवरून उडी मारता. इथलं बंजी जंपिंग सुरक्षित मानलं जातं. दहा वर्षांच्या पुढील व्यक्ती बंजी जंपिंग करू शकतात. इथे कमी किंमतीत या थरारक क्रीडाप्रकाराचा अनुभव घेता येतो.

✽ बंगळूरूतल्या बंजी जंपिंगसाठी तुमच्याकडे पुरेसा अनुभव हवा किंवा धोका पत्करायची तयारी हवी. इथे बंजी जंपिंगसाठी निश्चित असं स्थान नाही. तुम्हाला क्रेनमधून उडी घ्यावी लागते. त्यामुळे धोकाही वाढतो. ८० फूट उंचीवरून उडी मारायची असते. त्यामुळे मन घट्ट करूनच बंजी जंपिंग करा.

✽ गोव्यात अंजुना बीच परिसरात बंजी जंपिंगचा आनंद घेता येतो. इथे फक्त २५ मीटरवरून उंडी मारायची असल्यामुळे छातीत फार धडधडणार नाही.

**होम ऑटोमेशन किंवा घराचं यांत्रिकीकरण ही संकल्पना भारतात आत्ता कुठे मूळ धरू लागली आहे. त्याचा वटवृक्ष व्हायला वेळ लागेल. सध्या काही श्रीमंतांच्या घरीच हे तंत्रज्ञान पहायला मिळतं. घरातल्या प्रत्येक उपकरणावर नियंत्रण मिळवून देणारी ही प्रणाली अद्याप सर्वसामान्यांच्या आवाक्यात आलेली नाही. पण राजस्थानच्या प्रांजल कचोलियाने हे शिवधनुष्य पेललं आणि लाखो रुपयांची ही प्रणाली अवघ्या काही हजारांमध्ये उपलब्ध करून दिली.**

# स्मार्ट घरांसाठी मस्त पर्याय

अचिव्हर

घरातून बाहेर पडून बरेच दूर गेल्यावर दिवा, पंखा, टीव्ही सुरू राहिल्याचं आपल्या लक्षात येतं. मग स्वत:चाच राग येतो. अशा वेळी शेजाऱ्यांना सांगावं लागतं. पण तोही पर्याय नसेल तर काय करायचं? प्रत्येकानेच ही परिस्थिती कधी ना कधी अनुभवलेली असते. राजस्थानच्या प्रांजल कचोलियाने यावर प्रभावी उपाय शोधला. घराबाहेर असतानाही तुम्ही घरातले सुरू राहिलेले दिवे, पंखे एका ॲपच्या मदतीने बंद करू शकता. 'घरांचं यांत्रिकीकरण' ही संकल्पना परदेशात बरीच लोकप्रिय ठरली असली तरी भारतातला तिचा आवाका मर्यादितच आहे. या तंत्रज्ञानासाठीचा प्रचंड खर्च हे यामागचं मुख्य कारण आहे. घरात ही प्रणाली बसवून घ्यायची तर किमान ८ ते १० लाख रुपये खर्ची पडतात. अर्थातच सर्वसामान्यांना हा खर्च परवडणारा नसतो. म्हणूनच प्रांजलने 'ईडन स्मार्ट होम्स' हे स्टार्टअप सुरू केलं. प्रांजल आयआयटी दिल्लीमधून इंजिनिअरींग केलं असून या स्टार्टअपच्या माध्यमातून त्याने परवडणाऱ्या दरातली स्मार्ट होम प्रणाली विकसित केली आहे.



शिकत असताना सुटीत कोट्याला आपल्या घरी आला असताना प्रांजलने होम ऑटोमेशन विक्रेत्याची भेट घेतली. ही प्रणाली ३ बीएचके घरात बसवण्यासाठीचा खर्च ८ ते १० लाख रुपयांच्या घरात होता. बऱ्याच जणांना भेटल्यानंतर तो खूपच निराश झाला. पण यातूनच त्याला व्यवसायाची उत्तम संधी गवसली. आयआयटीत परतल्यानंतर त्याने संशोधनाला सुरूवात केली. या क्षेत्रात काम केलेल्या इंजिनिअर्सची टीम उभी केली. मग त्याच्या टीमने एक उत्पादन तयार केलं. हे उत्पादन सध्या उपलब्ध असणाऱ्या तंत्रज्ञानाच्या तुलनेत बरंच उजवं तसंच किंमतही खूप कमी असल्याने सर्वसामान्यांना परवडणारं होतं.

ही प्रणाली घरातल्या स्वीचबोर्डसच्या मागे बसवता येते. यामुळे एका स्मार्टफोन ॲपच्या माध्यमातून तुम्ही घरातली सगळी यंत्रं नियंत्रित करू शकता. ही प्रणाली बसवण्यासाठी घरातलं वायरिंग बदलण्याची गरज नसते. सूचनापत्र वाचून कोणताही इलेक्ट्रिशियन ही प्रणाली बसवून देऊ शकतो. प्रणाली बसवण्यासाठी फक्त पंधरा मिनिटं पुरतात. ॲपवर यंत्र बंद झाली किंवा नाही याची सूचना लगेच उपलब्ध होते. त्यामुळे तुम्ही निश्चिंत मनाने बाहेर जाऊ शकता. यासोबतच या प्रणालीची इतरही बरीच वैशिष्ट्यं आहेत.

विशेष म्हणजे याचा खर्च अवघा ९० हजार रुपये आहे. ईडन स्मार्ट होम्सला केंद्र सरकारचं पाठबळ लाभलं आहे. सरकारच्या स्टार्टअप इंडिया कार्यक्रमासाठीही ईडन स्मार्ट होमची निवड झाली होती. प्रांजलचं हे तंत्रज्ञान देशातल्या स्मार्ट होम संकल्पनेला बळ देईल, अशी आशा आहे.




## फंडू एसएमएस

छुपाने लगा हूं
आजकल कुछ राज
अपने आप से सुना है...
कुछ लोग मुझको
मुझसे ज्यादा जानने
लगे हैं।

ये वादा है हमारा,
ना छोडेंगे साथ
तुम्हारा। जो गए तुम
हमको भूल कर, ले
आऐंगे पकड कर हाथ
तुम्हारा।

उनकी छत पर गये थे
हम कटी हुई पतंग
लूटने,पगली से नजरें
मिल गयी तो कहने
लगी, सुनो, तुम पतंग
लूटने आये हो या दिल...

## बी ॲलर्ट

### कस्टमर केअरला फोन करताय?




गूगलवर कस्टमर केअर नंबरचा शोधत असाल तर थोडं सावध व्हा. कारण सर्चमध्ये बनावट कस्टमर केअर नंबरही असू शकतो. या क्रमांकावर फोन केल्यास तुमची फसवणूक होऊ शकते. बनावट कस्टमर केअरचे प्रतिनिधी रिमोट ॲक्सेस ॲप्स डाउनलोड करायला सांगतात. या माध्यमातून तुमच्या स्क्रीनवर समोरची व्यक्ती नियंत्रण ठेऊ शकते. त्यामुळे कोणत्याही कस्टमर केअरशी संपर्क केल्यानंतर 'टीम व्यूवर क्वीक सपोर्ट', 'मायक्रोसॉफ्ट रिमोट डेस्कटॉप', 'एनी डेस्क रिमोट कंट्रोल', 'एअर ड्रॉइड रिमोट ॲक्सेस ॲंड फाईल',' क्रोम रिमोट डेस्कटॉप', 'स्प्लॅशशॉट पर्सनल रिमोट डेस्कटॉप' अशी ॲप्स डाउनलोड करायला सांगण्यात आली तर ती अजिबात करू नका.

## स्मार्ट टेक

### आता वापरा इलेक्ट्रिक बनी हॅट आणि शॉल



थंडीच्या दिवसात कानटोप्या, मोजे, स्वेटर वापरले जातात. जाड पांघरून घेऊन गुडूप झोपावंसं वाटतं. आजच्या तंत्रज्ञानाच्या काळात या वस्तूही स्मार्ट झाल्या आहेत. ब्यूटूथ म्युझिक बनी हॅट खूपच आकर्षक आहे. या बिल्ट इन स्पीकर्सही आहेत. ही हॅट मोबाईल, कंप्युटर किंवा लॅपटॉपला कनेक्ट करून गाणी ऐकता येतात. यूएसबी इलेक्ट्रिक हिटिंग शॉलही आहे. ही शॉल धुता येते. याला डिटॅचेबल केबल आहे. ही केबल काढून तुम्ही शॉल धुवू शकता. यासोबत इलेक्ट्रिक हिटेड सॉक्स, इलेक्ट्रिक लंच बॉक्स, इलेक्ट्रिक फूट वॉर्मर अशा वस्तूही उपलब्ध आहेत. या वस्तूंमुळे थंडी सुसह्य होऊ शकते.

## ॲप वर्ल्ड

### संकटकाळाचा साथी




आज आपण स्मार्टफोनवर अवलंबून आहोत. स्मार्टफोनमधल्या स्मार्ट फीचर्समुळे आपलं आयुष्य सुसह्य झालं आहे. संकटकाळीही स्मार्टफोन आपली मदत करू शकतो. ॲंड्रॉईडमध्ये इमर्जंसी लोकेशनचीही सोय आहे. स्मार्टफोनमध्ये इमर्जंसी सेवा सेट करता येतील. यासाठी स्मार्टफोनचं पॉवर बटण काही काळासाठी दाबून ठेवा. यानंतर स्क्रीनवर इमर्जंसी एसओएस फीचरवर टॅप करा. यानंतर स्मार्टफोन ११२ क्रमांकाला फोन लावेल. फोन लागल्यावर तो कट करा. यानंतर स्क्रीनवर खालच्या बाजूला मेडिकल इन्फॉर्मेशन हा पर्याय दिसेल. त्यावर क्लिक करा. यात तुमची आरोग्यविषयक माहिती नोंदवता येईल. यानंतर डन हे बटण दाबा. यामुळे संकटकाळी तुम्हाला मदत मिळू शकेल.

## स्मार्ट टिप्स

### वाढवा लॅपटॉपचा वेग



मित्रांनो, लॅपटॉप, कॉम्प्युटरशिवाय आपलं पानही हलत नाही. ऑनलाईन क्लास, वर्क फ्रॉम होममुळे तर ही उपकरणं आपल्या आयुष्याचा अविभाज्य भाग बनून गेली आहेत. म्हणूनच लॅपटॉप, पीसी स्लो झाला की चांगलीच पंचाईत होते. आता स्लो झालेल्या पीसीची गती वाढवण्यासाठी या टिप्सची मदत घेता येईल. सर्वात आधी नको असणारी, निरूपयोगी सॉफ्टवेअर्स डिलिट करून टाका. यासाठी कंट्रोल पॅनलमध्ये जाऊन अनइन्स्टॉल प्रोग्रामवर क्लिक करा. इथे तुम्हाला सॉफ्टवेअर्सची यादी दिसेल. तुम्ही वापरात नसणारी सॉफ्टवेअर्स डिलिट करू शकता. डिस्क क्लीन अप हा सुद्धा एक चांगला पर्याय आहे. तुमच्या लॅपटॉपमध्ये बराच डाटा सेव्ह करावा लागत असेल तर रॅम वाढवून घेता येईल. रॅम वाढवून घेतल्यानंतर पीसी किंवा कॉम्प्युटरचा वेग वाढू शकेल.

# ग्रुम अप युअरसेल्फ

ग्रुमिंग

अप टू डेट राहणं ही काळाची गरज आहे. कॉलेज असो वा ऑफिस, तुम्ही व्यवस्थित रहायलाच हवं. विस्कटलेले केस, चुरगाळलेले कपडे, वाढलेली दाढी असा लूक कॅरी करण्याचे दिवस कधीच गेले. मेन्स पार्लर्समध्ये ग्रुमिंगसाठी येणाऱ्या युथची संख्या मोठी असते. त्यामुळेच आता टॉल, डार्क आणि हॅंडसम दिसायचं असेल तर काही टीप्स फॉलो कराव्या लागतील.

✽ सर्वात महत्वाची असते ती स्वच्छता. सध्या थंडी असली तरी आंघोळ टाळू नका. गरम पाण्याने आंघोळ केल्यानं तुम्ही फ्रेश व्हाल. चांगला माउथवॉश आणि डिओ वापरा.



✽ थंडीत मुलांची त्वचाही कोरडी होते. बाजारात चांगले मेन्स फेसवॉश मिळतात. चांगल्या फेसवॉशनं चेहरा धुवून मॉश्चराईज करा.

✽ तुमच्या पर्सनॅलिटीत भर घालतात ते तुमचे केस. त्यामुळे लेटेस्ट ट्रेंड फॉलो करून छानसा हेअर कट करून घ्या. केस वाढवायला आवडत असतील तर ते नीट मेंटेन करा.

✽ कपाट उचकटून हाताला लागतील ते कपडे परिधान करू नका. ऑफिसला तुम्ही नीट तयार होऊन जाताच पण कॉलेजमध्येही स्मार्ट दिसण्यासाठी कपड्यांकडे लक्ष द्या. पॅंटला सूट होईल असाच शर्ट निवडा. उगाचच मिस मॅच करू नका.

✽ फिटनेस हा आजचा मंत्र आहे. त्यामुळे आठवड्यातून तीन दिवस वॉकिंग किंवा जॉगिंगला जा. सायकलिंग हा ही फिटनेससाठी एक छान ऑप्शन आहे. तुम्ही जिमही जॉईन करू शकता.

✽ जंक फूड, धूम्रपान टाळा. हेल्दी फूड खा. वाईट सवयींमुळे तुमची पर्सनॅलिटी बिघडून जाते. चुकीच्या सवयी वेळीच सोडा.

✽ दिवसभराच्या दगदगीनंतर झोप सर्वात महत्वाची. कामाचा ताण, प्रोजेक्ट सबमिशन, असाईमेंट्स असल्या तरी रात्री पुरेशी झोप घ्या. यामुळे तुमचा दिवस मस्त जाईल.

# नववर्षाचा जल्लोष

युवामानस

मित्रांनो, तुम्हालाही नव्या वर्षाची चाहूल लागली असेल. जुनं वर्ष सरायला आता काही दिवसच शिल्लक राहिले आहेत. न्यू इयर सेलिब्रेशनच्या हटके कल्पना तुमच्या सुपीक डोक्यातून निघाल्या असतील. कोणाला फिरायला जायचं असेल, कोणाला मित्रमैत्रिणींसोबत धम्माल पार्टी करायची असेल. कोणाला सिनेमा पहायचा असेल. तर कोणाला मस्त गाण्यांवर थिरकायचं असेल. पण काही जण डोंगरमाथ्यावर उगवत्या सूर्याच्या साक्षीनं नव्या वर्षाचं स्वागत करतात. रात्री डोंगर चढायचा आणि सकाळी उगवत्या सूर्याला नमस्कार करून नव्या वर्षाची नवी स्वप्नं सजवायची. कशी वाटते कल्पना? नेहमीच्या वहिवाटेवर न चालता वेगळी वाट निवडणाऱ्यांना न्यू इयर ट्रेकिंग करता येईल. हरिश्चंद्र गड, गोरखगड, नाणेघाट, चंद्रगड, राजगड, सागरगड, वन ट्री हिल ही युथची आवडती ट्रेकिंग डेस्टीनेशन्स आहेत. अनेक ट्रेकिंग संस्था आणि क्लब्ज न्यू इयर ट्रेकिंगचं आयोजन करतात. हुडहुडी भरवणाऱ्या थंडीत डोंगरमाथ्यावर मस्तपैकी तंबू ठोकून शेकोटी पेटवून नव्या वर्षाचं स्वागत करायचं. तेही गरमागरम कॉफीचे घुटके घेत, मित्रांसोबत गाणी म्हणत, तारे-तारकांनी भरलेल्या निळ्या आभाळाच्या साक्षीने. ही कल्पनाच लई भारी वाटते. निसर्गाच्या सानिध्यात मित्र-मैत्रिणी किंवा कुटुंबियांसोबत न्यू इयर सेलिब्रेट करा आणि रिफ्रेश होऊन जा. मग करताय ना तयारी न्यू इयर ट्रेकिंगची...

# फिटनेस असावा बजेटमधला



फिटनेस मंत्रा

दोस्तांनो,तारुण्य म्हणजे धमाल, मजा आणि भरपूर मस्ती. या दिवसांत तुम्ही खूप फिरता, भरपूर हादडता. खांद्यांवर फारशी जबाबदारीही नसते. तारुण्याच्या बहराचा हा काळ करीअरच्या दृष्टीने महत्त्वाचा असतो तसंच फिटनेस आणि वेलनेसचा पायाही याच काळात घालता येतो. तुम्हाला छान दिसायचं असतं. पीळदार शरीरयष्टी हवी असते. मग जीम लावलं जातं. तिथले ट्रेनर्स सूचनांचा भडीमार करतात. पोषक आहार आणि सप्लीमेंट्स सुचवतात. पण या सगळ्यात बजेटची पार वाटत लागते. प्रोटीन पावडर असो की इतर पोषक घटक... त्यासाठी प्रचंड पैसा ओतावा लागतो. पण सगळ्यांनाच हे जमत नाही आणि फिटनेसचं पार वाटोळं होतं. पण बजेटमध्ये राहूनही तुम्ही फिटनेस राखू शकता. कसा ते पाहू या.

✽ सर्वात आधी कॅलरी काउंट ॲप डाउनलोड करा. महिन्याचं बजेट ठरवा. त्यात बसणारे पदार्थ निवडा. आपल्या सोयीनुसार खाण्याचं विभाजन करा. आहाराच्या वेळा ठरवा. स्नायू बळकट करायचे असतील तर दिवसातून तीन ते पाच वेळा खायला हवं.

✽ न्याहारीला चार ब्रेड स्लाईस, एक अंड, दोन अंड्यांचा पांढरा भाग आणि एक चमचा बटर किंवा लोणी खा.

✽ मधल्या वेळेत दोन मध्यम केळी आणि मूठभर शेंगदाणे खा.

✽ मांसाहारी लोक दुपारच्या जेवणात दोन पोळ्या, एक मुद भात, वाटीभर चिकन, एक वाटी दही आणि सॅलाड घेऊ शकतात. शाकाहारी चिकनऐवजी वाटीभर डाळ आणि भाजी खाऊ शकतात. चिकनऐवजी फिशचा पर्यायही आहे.

✽ व्यायामाआधी एक मध्यम आकाराचं केळं, दोन ब्रेड स्लाईस आणि एक चमचा पीनट बटर तर व्यायामानंतर सहा अंड्यांचा पांढरा भाग खा.

✽ रात्रीच्या जेवणात वाटीभर चिकन किंवा भाजी, भात आणि डाळ व चमचाभर तूप घ्या.

हा सर्वसाधारण आहार आहे. तुम्ही आवडीनुसार आणि गरजेनुसार विविध पोषक पदार्थ खाऊ शकता. आहारात फळं, सुका मेवा यांचा समावेश करू शकता.

वेट लिफ्टिंग करा. यामुळे स्नायू बळकट होतात. पोषक आहारामुळे ही प्रक्रिया सुलभ होते. अर्थात स्नायूंची ताकद वाढवण्यासाठी पुरेसा वेळ द्यायला हवा. त्यासाठी नियमित व्यायाम करा. एका सांध्याऐवजी विविध सांध्यांवर लक्ष केंद्रित करा. दररोज सहा ते आठ तास झोप घ्या. मनासारख्या गोष्टी घडल्या नाहीत तर ताण घेऊ नका.

# चमचमीत गार्लिक पोटॅटो चाट

झटपट रेसिपी

दोस्तांनो, हॉस्टेलमध्ये काही चटपटीत आणि वेगळं खावंसं वाटतं. खोलीत बटाटे असतातच मग गार्लिक पोटॅटो चाट बनवून बघा. हा कुरकुरीत पोटॅटो चाट मित्रमंडळींनाही आवडेल.



**साहित्य** : दोन ते तीन मध्यम आकाराचे बटाटे, दोन चिरलेल्या हिरव्या मिरच्या, अर्धा चमचा लसूण पेस्ट, (लसूण पाकळ्या सोलून वाटून घ्या.), एक कप दही, तेल, चमचाभर मसाला दाणे, दोन चमचे तिखट, चवीनुसार मीठ, चाट मसाला आणि जिरे पूड.

**कृती** : बटाटे अर्धवट उकडून लांबट तुकडे करुन तळून घ्या. आता कढईत थोडं तेल तापायल ठेवा. तेल गरम झाल्यानंतर त्यात हिरव्या मिरच्या आणि लसूण पेस्ट घालून परतून घ्या. पाच मिनिटं मंद आचेवर शिजवा. आता त्यात तळलेले बटाटे घाला. मग दह्यामध्ये तिखट, मीठ, जिरेपूड घाला. चांगलं मिसळून घ्या. तळलेले बटाटे या दह्यात घाला. नीट हलवून घ्या. चाट मसाला आणि मसाला दाणे घालून सजवा. दही नसेल किंवा नको असेल तर टॉमेटो सॉसही घालू शकता.

# रुबाबदार दिसायचं तर...



फॅशन पॅशन

ऑफिसमध्ये तुम्ही नीटनेटकं आणि टापटिपच असायला हवं. अशा ठिकाणी कॅज्युअल कपडे घालता येत नाहीत. कडक इस्त्रीचा शर्ट, ट्राउझर अशा पेहरावात ऑफिसला जाणाऱ्यांचा रुबाब काही वेगळाच असतो. अशा कर्मचाऱ्यांना मानही मिळतो. गबाळं राहून काहीच फायदा नसतो. तुम्हालाही तुमच्या व्यक्तिमत्त्वाची छाप पाडायची असेल तर ऑफिसच्या कपडे खरेदी करताना विशिष्ट रंगांना प्राधान्य द्या. ठराविक रंगांचे शर्ट तुमच्याकडे असायलाच हवेत. कोणते आहेत हे रंग? पाहू या.

✽ पांढऱ्या रंगाची जागा कोणीही घेऊ शकत नाही. इस्त्री केलेला छानशा पांढरा शुभ्र शर्ट तुमचा रुबाब नक्कीच वाढवेल. पांढऱ्या रंगाचे काही गुण आहेत. शांत, मनमिळावू, एकाग्र आणि समर्पित वृत्ती पांढऱ्या रंगातून झळकत असते. असे गुण कार्यस्थळी खूप उपयुक्त ठरतात. पांढरा शर्ट घालून तुम्ही समोरच्यावर प्रभाव टाकू शकता.

✽ ग्रे शर्टही छान दिसतो. अनेकांना ग्रे कंटाळवाणा आणि एकसुरी रंग वाटतो. पण प्रत्यक्षात तसं नाही. या रंगामुळे तुम्ही उठून दिसाल. ग्रे रंगाचे शर्ट फारसे घातले जात नाहीत. त्यामुळे तुमच्या या निवडीचं कौतुक होईल.

✽ निळा रंगही आकर्षक आहे. निळ्या रंगातले शेड्स तुम्ही घालू शकता. निळ्या रंगाचे कपडे घालणारे कामाच्या ठिकाणी यशस्वी होतात,, असं एका अभ्यासातून समोर आलं आहे. त्यामुळे तुमच्याकडेही निळा शर्ट असायला हवा.

✽ हिरवा हा सुद्धा हटके रंग आहे. मात्र तो तुम्हाला नीट कॅरी करता आला पाहिजे. हिरवा रंग समृद्धी, प्रगतीचं प्रतीक असतो. हा रंग ताजेपणाचा अनुभव देतो. त्यामुळे या रंगाचा शर्टही मस्ट हॅव आहे. हिरव्या रंगातल्या विविध छटा खूप सुंदर दिसतात.

# धडधड वाढते आहे

मॅच मेकिंग

मी २७ वर्षांची युवती असून माझं लग्न ठरलं आहे. हे माझं लव्ह कम अरेंज मॅरेज असलं तरी आता धाकधूक वाटू लागली आहे. त्याच्याशी लग्न करण्याची माझी इच्छा होती. मधल्या काळात आमचे आई-बाबा एकमेकांना भेटले. आमचं लग्नही ठरलं. पण का कोण जाणे, निर्णय घ्यायला काही वेळ घ्यावा असं मला वाटतंय. हे लग्न वर्षभर पुढे ढकलावं असा माझा विचार आहे. मला त्याच्याशी लग्न करायचं होतं. पण आता सगळं जमून आलेलं असताना मनात धाकधूक आहे. मी काय करू?



**उत्तर** : लग्नाच्या आधीची अस्वस्थता ही अगदी सामान्य बाब आहे. लग्नानंतर आयुष्य आमूलाग्र बदलतं. प्राधान्यक्रम ठरवावे लागतात. त्यातही मुलींना आपलं घर सोडून नव्या घरी जावं लागतं. नवी नाती स्वीकारावी लागतात. प्रेमविवाह असो किंवा ठरवून केलेलं लग्न, मुलांपेक्षा मुलींवर जास्त ताण येतो. आता आवडत्या मुलासोबत तुझं लग्न होत आहे. त्यामुळे त्याच्याशी मनातील या सर्व भावनांबद्दल मोकळेपणाने बोल. तुझ्या अपेक्षा सांग. मनातली भीती, अस्वस्थता नेमकी कशासाठी आहे हे जाणून घे. कारण यामागेही अनेक कारणं असतात. तुला विवाह समुपदेशकांची मदतही घेता येईल. मनात नकारात्मक विचार येऊ देऊ नको. प्रत्येक बदलाकडे सकारात्मकतेने बघ. तुझं नातं नक्कीच फुलेल. दुसरं म्हणजे तो मुलगा तुला का आवडतो आणि अगदी ऐनवेळी तुला कशासाठी वेळ हवा आहे याचं विश्लेषण कर. यामुळे ताणाचं नेमकं कारण कळेल. कुढत राहून प्रश्न सुटणार नाहीत.

# विमानतळाची नवीन धावपट्टी एक महिन्यात पूर्ण करा



## केंद्रीय मंत्री गडकरी यांनी दिला अल्टिमेटम

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २३ :**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळावरील नवीन धावपट्टीच्या कामाला वेळ लागत असल्याबद्दल केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. त्याचवेळी एक महिन्याच्या आत हे काम पूर्ण करा, अन्यथा कारवाई करण्यात येईल, असा अल्टिमेटम गडकरी यांनी संबंधित कंपनीला दिला.

डिसेंबर २०२३ मध्ये विमानतळ प्राधिकरणाने धावपट्टीच्या कारपेटिंगची निविदा प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यानंतर १ मे २०२४ ला के. जी. गुप्ता कंपनीला या कामाचे कार्यादेश देण्यात आले. मात्र, अद्याप धावपट्टीचे काम पूर्ण झालेले नाही. यासंदर्भात अनेक तक्रारी गडकरी यांना प्राप्त झाल्या होत्या. शिवाय, धावपट्टीच्या कामामुळे सकाळी १० ते संध्याकाळी ६ या वेळेत नागपूर विमातळावरील आवागमन बंद ठेवण्यात आले आहे. त्यामुळे विमानांच्या तिकिटांचे दरही दुप्पट-तिप्पट प्रमाणात वाढलेले आहेत.

नियमित विमान प्रवास करणाऱ्यांना याचा त्रास होत आहे. याची दखल घेत ना. श्री. नितीन गडकरी यांनी धावपट्टीच्या कामाची सोमवारी पाहणी केली. यावेळी आमदार मोहन मते, विमानतळ सल्लागार समितीचे सदस्य गिरधारी मंत्री, प्रकाश भोयर, दिलीप जाधव, मिहानच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती पांडे, विमानतळ प्राधिकरणारे अधिकारी तसेच के. जी. गुप्ता कंपनीचे अधिकारी उपस्थित होते.

कंपनीला मे २०२४ मध्ये कायार्देश मिळाल्यावर जून ते सप्टेंबर २०२४ या कालावधीत सर्वेक्षण करून अहवाल सादर करण्यात आला. १ ऑक्टोबर २०२४ पासून प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली.

या दरम्यान काही कारणांनी काम बंद होते. त्यानंतर २४ नोव्हेंबरपासून पुन्हा कामाला सुरुवात झाली. पहिल्या लेअरचे काम ८० टक्के पूर्ण झाले आहे. तर दुसऱ्या आणि तिसऱ्या लेअरचे काम पूर्ण होण्यासाठी २१ मे २०२५ पर्यंतचा कालावधी लागेल, असे कंपनीतर्फे सांगण्यात आले.

गडकरी यांनी धावपट्टीचे काम संथगतीने सुरू असल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली. त्याचवेळी आणखी पाच महिने सर्वसामान्य नागरिकांना विमान प्रवासाची भाडेवाढ सोसावी लागणे योग्य नाही, याकडेही मिहान व कंपनीच्या अधिकाऱ्यांचे लक्ष वेधले. त्यानंतर एक महिन्याच्या आत धावपट्टीचे काम पूर्ण करावे. अन्यथा कारवाईला सामोरे जाण्याची तयारी ठेवावी, असा स्पष्ट इशाराही यावेळी केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांनी दिला.

# महसूल कायद्यात सुधारणा..

## महसूलमंत्री बावनकुळे यांची माहिती

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २३ :**
महसूल कायद्यातील अनेक तरतुदींमुळे राज्याच्या अनेक भागातील विकासकामे थांबलेली आहे. विशेषतः विदर्भासह राज्याच्या काही भागात झुडपी जंगलामुळे पायाभूत सुविधांची कामे



अडलेली आहे. हा अडथळा दूर करण्यासाठी महसूल कायद्यात सुधारणा करणार असल्याची माहिती नवनियुक्त महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

संपूर्ण महसुली कायद्यांना अधिक लोकाभिमुख करीत शेतकरी व शेतमजुरांपर्यंत लाभ मिळावा यासाठी महसूल कायद्यात सुधारणा आवश्यक आहे. त्यादृष्टीने काम करणार आहे. आज छोट्या छोट्या कारणांमुळे विकास प्रकल्प थांबले आहेत. त्याला पुढे नेण्याचे काम करू. ८६ हजार हेक्टर झुडपी जंगल नसताना त्याच्या नोंदी केल्या आहेत. त्याप्रमाणे सर्वोच्च न्यायालयात ते प्रकरण सुरू आहे. लवकर झुडपी जंगल मुक्त होईल. विदर्भातील झुडपी जंगल जमिनीमुळे विकास प्रकल्प थांबले आहेत. सर्वोच्च न्यायालयात महाराष्ट्र सरकारच्या वतीने आम्ही बाजू मांडू. रेतीमाफियांच्या मुसक्या आवळण्यासाठी प्रयत्न करणार आहे, असे बावनकुळे म्हणाले. कायद्यात काय सुलभीकरण झाले हे जनतेला घरी बसून पाहता येईल. जनतेची फरपट थांबेल असा बदल करून जनतेला दिलासा देऊ. महसूल खात्याकडून होणारा त्रास थांबेल, असे बावनकुळे यावेळी म्हणाले.

मंत्रिमंडळ विस्तार झाल्यानंतर अतिशय सुलभपणे खाती वाटप झाली आहेत. पालकमंत्री देखील तिन्ही पक्षांचा विचार घेऊनच नेमण्यात येणार आहेत. त्यामुळे कुणीही नाराज नसल्याचे बावनकुळे यांनी सांगितले.

## अक्षरक्रांती आंतरराष्ट्रीय साहित्य संमेलनात डी. बी. जगत्पुरिया

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २३ :**



नागपूर येथे 28 व 29 डिसेंबरला होणाऱ्या अक्षरक्रांती आंतरराष्ट्रीय साहित्य संमेलनात मुख्य अतिथी म्हणून विख्यात कवी, समीक्षक, ज्येष्ठ पत्रकार डी. बी. जगत्पुरिया हे सन्मानित होणार आहेत.

कथाकार सुरेश पाचकवडे संमेलनाचे अध्यक्ष आहेत. कन्हेरे फाउंडेशनचे मा. किशोर कन्हेरे उद्घाटक आहेत. 97 व्या अखिल भारतीय संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. रवीन्द्र शोभणे व टोकियो, जपान येथील प्रसिद्ध कादंबरीकार, उर्मिला देवेन हे विशेष अतिथी म्हणून सहभागी होणार आहेत. सदर संमेलन, महात्मा फुले शिक्षण संस्था, रेशीमबाग, नागपूर येथे होणार आहे.

डी. बी. जगत्पुरिया यांच्या नावावर मराठी, हिन्दी कविता संग्रह, सत्त्वसार, मूल्याक्ष, दस्तऐवज असे पाच समीक्षा ग्रंथ सामाजिक वैचारिक गंध, दौलत हा कथा संग्रह, नाटक, एकांकिका असे लेखन प्रकाशित आहे. दरवर्षी महाराष्ट्रातील सुमारे 25 ते 30 दिवाळी अंकात त्यांचे लेखन प्रकाशित होते. अनेक राज्यस्तरीय पुरस्कारांसह त्यांच्या नावे सात राष्ट्रीय पुरस्कार आहेत.

अस्मितादर्श, अंकुर साहित्य संमेलनांसह काही संमेलनांचे अध्यक्ष, उद्घाटक, परिसंवादाचे अध्यक्ष व वक्ते म्हणून त्यांनी सहभाग नोंदवला आहे. यवतमाळ येथे झालेल्या जागर साहित्य संमेलानात ते प्रमुख परिसंवादाचे अध्यक्ष होते. कवी संमेलन शिखरावर नेणारे सूत्रसंचालक म्हणून त्यांनी ख्याती अर्जित केली आहे. त्यांचे सर्वश्री डॉ. श्रीपाल सबनीस, डॉ युवराज सोनटक्के, डॉ. गजानन सोनुने, डॉ. विनोद सिनकर, डॉ. प्रकाश नाईक, डॉ. प्रा. डी. व्ही. पाटील, जगदीश देवपूरकर यांच्यासह अनेक साहित्यिकांनी अभिनंदन केले आहे.

# दै. महासागर दिवाळी अंकाला उत्कृष्ट दिवाळी अंक पुरस्कार

## गजानन तुपे यांना 'प्राइड ऑफ स्पंदन अवॉर्ड' २०२४ राज्यस्तरीय पुरस्कार





*दीप प्रज्वलन करताना महासागरचे मुख्य वृत्त संपादक गजानन तुपे, डॉ. निळकंठ धारेश्वर महाराज तसेच मंगेश चिवटे. कार्यक्रमात मनोगत व्यक्त करताना गजानन तुपे.*

**कराडमध्ये दैनिक महासागरचा डबल धमाका**

■ **वृत्तसंस्था, कराड, दि. २३ :**
आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार आणि महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या कराडच्या पावन भूमीत दैनिक महासागरचा दुहेरी डंका वाजला.

राज्यस्तरीय "प्राइड ऑफ स्पंदन अवॉर्ड २०२४" या राज्यस्तरीय मानाच्या पुरस्कार सोहळ्यात दैनिक महासागर मुंबईचे मुख्य वृत्त संपादक गजानन तुपे यांना त्यांच्या पत्रकारितेतील निस्वार्थी, निस्पृह आणि दीर्घ वाटचालीबद्दल आणि साहित्य क्षेत्रातील योगदानाबद्दल 'प्राइड ऑफ स्पंदन अवॉर्ड 2024' ने गौरविण्यात आले. तर दैनिक महासागरच्या दिवाळी अंकासही स्पंदनच्या स्पर्धेमध्ये उत्कृष्ट दिवाळी अंकाचा पुरस्कार देण्यात आला. कराड येथे एका शानदार सोहळ्यात हे पुरस्कार प्रदान करण्यात आले.

प्रमुख अतिथी आणि सत्कारमुर्ती म्हणून उपस्थित असलेले डॉ. निळकंठ धारेश्वर महाराज तसेच मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी कक्षाचे माजी कक्ष प्रमुख मंगेश चिवटे यांच्या हस्ते हे पुरस्कार देण्यात आले.

यांप्रसंगी व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष डॉ. संदिप डाकवे, पत्रकार भिमराव धुळप, मालिका दिग्दर्शक विठ्ठल डाकवे, अभिनेते पंकज काळे, शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य सौ. संगीता साळुंखे (माई), पार्श्वगायिका कविता राम, रीलस्टार अंजली आकळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमास महाराष्ट्रभरातून आलेल्या तसेच सातारा जिल्ह्यातील प्रज्ञावंतांची मांदियाळी होती.

**समाज संस्कारित करण्याचे आणि परंपरा संवर्धनाचे कार्य**

दैनिक महासागरचे मुख्य वृत्त संपादक गजानन तुपे यावेळी बोलताना म्हणाले की, स्पंदनच्या माध्यमातून डॉक्टर संदीप डाकवे, सौ. रेश्मा डाकवे आपल्या संपूर्ण टीम सह परंपरा संवर्धन आणि समाजासाठी संस्कार देण्याचे कार्य करीत आहेत. वाचन चळवळीच्या माध्यमातून सुदृढ समाज घडविण्यासाठी स्पंदन जे कार्य करीत आहे ते कौतुकास्पद आहे.






नागपूर

महासागर वृत्तसागर

■ मंगळवार, दि. २४, डिसेंबर २०२४ ■

# अल्पवयीन प्रेयसीने इंस्टाग्रामवर व्हिडिओ टाकणे प्रियकराला पडले महागात

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :
अल्पवयीन प्रेयसीने प्रियकरासोबत बगिच्यात फिरत असल्याचा व्हिडीओ इंस्टाग्रामवर टाकणे प्रियकराला चांगलेच महागात पडले. मुलीच्या भावाने हा व्हिडीओ पाहिल्यानंतर घरच्यांना तिचे प्रेमप्रकरण माहिती झाले. या प्रकरणाची पोलिस ठाण्यात तक्रार झाल्यानंतर बलात्काराचा गुन्हा दाखल झाला. कपीलनगर पोलिसांनी कुटुंबीयांच्या तक्रारीवरुन प्रियकराविरुद्ध बलात्काराचा गुन्हा दाखल करुन अटक केली. प्रतिक शैलेंद्र वक्ते (२३, रा, कपीलनगर) असे आरोपी प्रियकराचे नाव आहे.

बारावीत असलेल्या विद्यार्थिनीचे वस्तीत राहणाऱ्या प्रतिक वक्ते या युवकासोबत प्रेमसंबंध होते. बारावीची परीक्षा झाल्यावर त्यांनी एकमेकांशी लग्न करण्याचा निर्णय घेतला होता. दोघांच्याही वारंवार भेटी-गाठी होत होत्या. त्यांच्या प्रेमसंबंधाची कुणकुण कुणालाही लागली नव्हती. सर्व सुरळीत सुरु असतानाच मुलीच्या इंस्टाग्रामवर प्रियकरासोबतचे बरेच व्हिडिओ तिच्या भावाला दिसले. त्याने आईवडिलांशी चर्चा केली आणि थेट पोलीस ठाण्यात तक्रार करण्याचा निर्णय घेतला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित मुलगी आईवडिल आणि भावासह कपीलनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहाते. दोन वर्षांपूर्वी तिची आरोपी प्रतिकसोबत ओळख झाली. तो बी.ए. तृतीय वषार्चा विद्यार्थी आहे. दोघांचेही कॉलेज एकाच रस्त्यावर असल्यामुळे दोघेही एकमेकांशी बोलत होते. दोघांमध्ये चांगली मैत्री होती. दोघेही एकमेकांना नेहमी मदत करायचे. प्रतिक एका खासगी कंपनीत कामाला जात होता. त्यामुळे तो तिला शिक्षणासाठीसुद्धा मदत करीत होता. दोघांची मैत्री वाढून गाठीभेटी व्हायला लागल्या. त्याने फेब्रुवारी २०२४ मध्ये व्हॅलेंटाईन डेला मुलीला प्रेमाची मागणी घातली. प्रतिकच्या प्रेमाला तिनेही साद दिला.

दोघांचेही प्रेमसंबंध वाढले. मार्च महिन्यात त्याने मुलीला सरप्राईज पार्टी असल्याचे सांगून फिरायला नेले. एका ढाब्यावर तिच्यासोबत जेवण केल्यानंतर तिला शारीरिक संबंधाची मागणी केली. मात्र, तिने स्पष्ट नकार दिला. त्यामुळे प्रतिकने तिला लग्न करण्याचे आमिष दाखवून तिच्याशी शारीरिक संबंध ठेवले. त्यानंतर त्याने अनेकदा तिला वेगवेगळ्या ठिकाणी नेऊन शारीरिक संबंध ठेवले.

प्रतिक आणि अल्पवयीन मुलगी हे दोघेही वस्तीपासून दूर जावून एकमेकांच्या भेटी घ्यायला लागले. तिने प्रियकरासोबत बाहेर फिरायला गेल्यानंतर बरेच व्हिडिओ आणि फोटो काढले. काही दिवसांपूर्वीच तिने प्रतिकसोबत एका बगिच्यात फिरत असलेला व्हिडिओ इंस्टाग्रामवर टाकला. त्यात प्रेमाचे गीतसुद्धा घातले. गेल्या दोन दिवसांपूर्वी इंस्टाग्रामवरील व्हिडिओ तिच्या भावाने बघितला. त्याने बहिणीचे प्रेमप्रकरण आईवडिलांना सांगितले.

कुटुंबीयांनी विचारणा केली असता तिने प्रतिकसोबत प्रेम असून आम्ही लवकरच लग्न करणार असल्याचे सांगितले. तसेच शारीरिक संबंध ठेवल्याची कबुली दिली. त्यामुळे चिडलेल्या कुटुंबीयांनी तिला कपीलनगर पोलीस ठाण्यात नेले. लेखी तक्रारीवरुन पोलिसांनी सोनमच्या प्रियकराविरुद्ध बलात्कार केल्याचा गुन्हा दाखल केला.

# जुबिन नौटियालच्या रॉकिंग परफॉर्मन्सने तरुणाई बेधुंद

## खासदार सांस्कृतिक महोत्सवाचा शानदार समारोप





### रसिकांमुळेच महोत्सव यशस्वी : नितीन गडकरी

खासदार सांस्कृतिक महोत्सवाचा नवव्या पवार्तील सकाळ व संध्याकाळच्या सत्राला प्रचंड गर्दी करून रसिकांनी हा महोत्सव यशस्वी केला. महोत्सवाचे नावे दोन विश्वविक्रमाची नोंद होणे, ही देखील अभूतपूर्व घटना आहे. फेसबुक, इन्स्टा, युट्यूब, लाईव्ह स्ट्रीमिंग यासारख्या सोशल माध्यमातून हा महोत्सव 1 कोटी 52 लाख लोकांपर्यंत पोहोचला आहे. महोत्सवाचे स्वरूप दिवसेंदिवस व्यापक होत असून ही जागा कमी पडते आहे, असे मत नितीन गडकरी यांनी व्यक्त केले.

### लहानग्यांचे ढोलताशा वादन

समारोपीय कार्यक्रमाची सुरुवात गजवर्क ढोलताशा पथकाच्या वादनाने झाली. त्यानंतर भारतातील छोट्या मुलांचे पहिले ढोलताशा व ध्वज पथक असलेल्या शिव नवयुग पथकाने शानदार वादन करीत वाहवा मिळवली.

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :
युवकांमध्ये अत्यंत लोकप्रिय असलेल्या जुबिन नौटियाल यांच्या ह्यलाईव्ह इन कॉन्सर्टने खासदार सांस्कृतिक महोत्सवाच्या नवव्या पवार्चा शानदार समारोप झाला. जुबिन नौटियालच्या रॉकिंग परफॉर्मन्स ने तरुणाई बेधुंद झाली. दुपारी बारा वाजेपासून पटांगणाबाहेर तरुणांच्या रांगा बघायला मिळाल्या. पटांगण खचाखच भरून होते.

ईश्वर देशमुख शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या पटांगणावर मागील दहा दिवसांपासून नागपूरच्या रसिकांनी वैविध्यपूर्ण कार्यक्रमांचा आनंद घेतला.

सोमवारी महोत्सवाचा समारोप करताना कैसे जिऊंगा तेरे बिना, ना चैन से जीने दे, किन्ना सोणा तेणू रब ने बनाया, दुवा ना कोई, के राता लंबिया लंबिया रे, हा मुझे प्यार है तुमसे हा, तुम धडकन मैं दिल, तुजको है तुझसे राबता, अशा अनेक गाण्यावर तरुणाई थिरकली.

चार वर्षांपूर्वी नागपुरात आलो होते. आज परत नितीन गडकरी यांच्यामुळे परत आपण भेटलो आहोत, असे जूबीन म्हणाला.

कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, संस्कार भारतीच्या विदर्भ प्रांत प्रमुख कांचन गडकरी, राज्यमंत्री ॲड. आशीष जयस्वाल यांच्या उपस्थित दीप प्रज्वलन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाळासाहेब कुळकर्णी व रेणुका देशकर यांनी केले.

**महोत्सवाच्या यशस्वीतेचे मानकरी**

खासदार सांस्कृतिक महोत्सव यशस्वी करण्यासाठी रात्रंदिवस झटलेल्या सर्व सदस्यांचा नितीन गडकरी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

त्यात समितीचे अध्यक्ष प्रा. अनिल सोले, उपाध्यक्ष डॉ. गौरीशंकर पाराशर, अशोक मानकर, दिलीप जाधव, डॉ. दीपक खिरवडकर, सचिव जयप्रकाश गुप्ता, कोषाध्यक्ष प्रा. राजेश बागडी, सदस्य बाळासाहेब कुलकर्णी, हाजी अब्दुल कदीर, सारंग गडकरी, अविनाश घुशे, संदीप गवई, संजय गुळकरी, रेणुका देशकर,गुड्डू त्रिवेदी, किशोर पाटील, चेतन कायरकर, आशिष वांदिले, भोलानाथ सहारे, ॲड. नितीन तेलगोटे, मनिषा काशीकर, विजय फडणवीस, महेंद्र राऊत, दिलीप गौर, शैलेश ढोबळे, माया इवनाते, प्रमोद पेंडके, राम अंबुलकर, किसन गावंडे, दिलीप गौड, महेंद्र राऊत, प्रसन्न अटाळकर, संदीप बारस्कर, सनी जयस्वाल, मेहबूब भाई, शंतनू वेळेकर यांचा त्यात समावेश होता.

# हक्कासाठी लढणाऱ्या विद्यार्थ्यांना शहरी नक्षली ठरवण्याचा प्रयत्न : एनएसयूआयचा आरोप

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :
शिष्यवृत्ती, अधिछात्रवृत्ती, सरकारी नोकऱ्यातील आरक्षण यासाठी सरकारविरोधात आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांना शहरी नक्षली ठरवण्याचा प्रयत्न होत आहे, असा आरोप स्टुडंट्स युनियन ऑफ इंडियाचे (एनएसयूआय) राष्ट्रीय अध्यक्ष वरुण चौधरी यांनी सोमवारी येथे पत्रकार परिषदेत दिला.

एनएसयुआयची राष्ट्रीय प्रशिक्षण कार्यशाळा सेवाग्राम येथे पार पडली. त्यानंतर चौधरी यांनी नागपुरात पत्रकारांशी संवाद साधला. चौधरी म्हणाले, केंद्र सरकारने शिक्षणातून आरक्षण संपविण्याची सुरुवात केली आहे. २०१३ मध्ये सार्वजनिक क्षेत्रात १३ लाख नोकऱ्या होत्या. २०२३ पर्यंत त्या साडेआठ लाख राहिल्या आहेत. देशातील ४५ केंद्रीय विद्यापीठांमध्ये फक्त दहा टक्केच शिक्षक व प्राध्यापक हे एससी, एसटी व ओबीसीचे आहेत. गेल्या काही वर्षांपासून विद्यार्थ्यांची अधिछात्रवृत्ती व शिष्यवृत्ती अडविली जात आहे. या विरोधात आवाज उठविणाऱ्या विद्यार्थ्यांवर गुन्हे दाखल केले जात आहेत. त्यांना भीती दाखवण्याचा प्रयत्न होत आहे, असा आरोपही त्यांनी केला. यावेळी एनएसयूआयचे महाराष्ट्र प्रभारी अक्षय क्रांतिवीर, अर्जुन छापराणा उपस्थित होते. सदस्य नोंदणी अभियानास सुरुवात एनएसयूआयतर्फे आजपासून देशभरात सदस्य नोंदणी अभियान सुरू करण्यात आले आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अपमान केला आहे. सरकारचे प्रमुख म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यासाठी माफी मागितली पाहिजे. तसेच सरकारच्या चुकीच्या धोरणाचा विरोध करणाऱ्या विद्यार्थ्यांवर गुन्हे दाखल करून त्यांना घाबरणे बंद करावे, अन्यथा देशभरातील विद्यार्थी रस्त्यावर उतरून आंदोलन करतील, असा इशारा चौधरी यांनी दिला.

# भटक्या विमुक्तांचे प्रश्न प्राधान्याने विधिमंडळात मांडा

## बेलदार समाज संघर्ष समितीची मागणी

**नागपूर :** राजकीय, सामाजिक व आर्थिक आरक्षणापासून वंचित असलेल्या भटक्या विमुक्त समाजाचे जिव्हाळ्याचे प्रश्न प्राधान्याने विधिमंडळात मांडून न्याय मिळवून द्यावा अशी मागणी बेलदार समाज संघर्ष समितीतर्फे माजी मंत्री श्री जयंत पाटील व माजी मंत्री श्री जितेंद्र आव्हाड, आमदार प्रतापदादा अडसड यांच्याकडे करण्यात आली.

बेलदार समाज संघर्ष समितीतर्फे बुधवारी विधानभवनात भटक्या विमुक्तांच्या प्रलंबित प्रश्नांसंदर्भात सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. यात भटक्या विमुक्तांची जनगणना करण्यास शासनास बाध्य करावे, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये लोकसंख्येच्या प्रमाणात ११% आरक्षण लागू करण्यात यावे, विविध शासकीय, सामाजिक कमिटीमध्ये स्वतंत्रपणे भटक्या विमुक्तांचे प्रतिनिधित्व देण्यात यावे, स्वाधार योजनेचा भटक्या विमुक्तांच्या मुलामुलींना १००%लाभ देण्यात यावा यासह विविध मागण्यांचा समावेश होता. या मागण्यांचे निवेदन माजी मंत्री व राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, माजी मंत्री जितेंद्र आव्हाड, आमदार प्रतापदादा अडसड यांना बेलदार समाज संघर्ष समितीतर्फे देण्यात आले. यावेळी बेलदार समाज संघर्ष समितीचे अध्यक्ष राजेंद्र बढिये, मुकुंद अडेवार, भाजप भटके-विमुक्त आघाडीचे प्रदेश सरचिटणीस युवराज मोहिते, शिक्षक नेते व ओबीसी चळवळीचे नेतृत्व मिलिंद वानखेडे, बेलदार समाज संघर्ष समितीचे सचिव खिमेश बढिये, दिपक मोहिते उपस्थित होते.

# वॉटर जीनियस-स्वयं जागृतीसे विश्व जागृती परीक्षेचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :
पाणी समस्या आणि त्याबाबतच्या उपायांविषयी लहानांपासून तर प्रौढांपर्यंत जल समस्या निराकारणावर योग्य शिक्षण आणि मार्गदर्शन देणे ही काळाची गरज आहे. भविष्यातील भीषण समस्या व उपाय योजना म्हणून नटराज निकेतन संस्थेने वॉटर जीनियसस्वयम जागृती से विश्व जागृती परीक्षेचे आयोजन 1 फेब्रुवारी 2025 ला केले आहे.




भविष्यातील पाण्याच्या भीषण समस्येवर उपाययोजना म्हणून नटराज निकेतन संस्थेने, समविद इंटरनॅशनल प्रायव्हेट लिमिटेड आणि वॉटर शॉपी वर्ल्ड वाइड यांच्या सौजन्याने तसेच वन हेल्थ फाउंडेशन यांच्या संयोगाने 1 फेब्रुवारी 2025 रोजी विविध स्तरांवर वॉटर जिनियस स्वयम जागृतीसे विश्व जागृती ही संकल्पना जलतज्ञ आणि वॉटर टेक्नॉलॉजिस्ट मुकुंद पात्रीकर यांची असून या उपक्रमासाठी अध्यक्ष मंगला पात्रीकर यांचे मार्गदर्शन लाभलेले आहे. जागरूक नागरिक आणि शाश्वत विकास हा या मागील मूळ उद्देश आहे. येणाऱ्या काळात पाण्याचा तुटवडा पाहता या समस्येचे निराकरण करायचं असेल तर घराघरातून वॉटर एक्सपर्ट तयार होणे ही काळाची गरज आहे. हीच काळाची गरज ओळखून नटराज निकेतन संस्थेने या परीक्षेचे विश्वव्यापी आयोजन केले आहे.

वॉटर जीनियस या महत्वकांक्षी उपक्रमात वय वर्ष सहा ते त्यापुढील सर्वांना सहभागी होता येणार आहे. विद्यार्थ्यांची परीक्षा त्यांच्या शैक्षणिक संस्थांमध्ये तर इतरांची ऑनलाइन पद्धतीने घेण्यात येईल. परीक्षेचे एकूण शुल्क 295 एवढे राहणार आहे. 18 वर्षावरील विद्यार्थ्यांना तसेच विद्यार्थी तर सगळ्यांना वॉटर एक्सपर्ट म्हणून पाणी समस्या आणि त्यावरील उपाय योजना यामध्ये करिअर करण्याची उत्तम संधी मिळणार आहे.

या परीक्षेमध्ये जलसंवर्धन, जलसंरक्षण, जलसुरक्षा, जल आणि आरोग्य, जल कायदा या सर्व मुद्द्यांचा समावेश केला जाणार आहे. भारतासह जगभर या परीक्षेच्या आयोजन केल्या जात आहे व 35 लाख म्हणून अधिक लोक या परीक्षेला सहभागी होतील. ही परीक्षा एक फेब्रुवारी 2025 ला सकाळी दहा ते साडेअकरा या कालावधीत होणार आहे. 200 पेक्षा जास्त विद्यार्थी सहभागी होणाऱ्या शाळेला सन्मान चिन्ह देण्यात येणार आहे व विविध बक्षीसांची तरतूदही केली जाणार आहे.

परीक्षेचे संकेत स्थळावर जाऊन करावे किंवा 9049116633 यावर संपर्क साधावा. असे सांगून जास्तीत जास्त लोकांनी या परीक्षेत बसून पाणी समस्या बाबत स्वतःला जागृत करावे असे आवाहन नटराज निकेतन संस्थेचे सचिव मुकुंद पात्रीकर यांनी केले आहे. पत्रकार परिषदेमध्ये नटराज निकेतन संस्थेच्या अध्यक्षा मंगला पात्रीकर, ॲड मधुरा व्यास, ब्रँड अँबेसिडर विष्णू मनोहर, मधुलिका जगदळे, उज्वल गजबे, छोटे ब्रँड अँबेसिडर अयांश मालपाणी, अक्षिव भगत, गार्गी पात्रीकर गायत्री इत्यादी उपस्थित होते.

# नोकरी मागणारे नव्हे तर नोकरी देणारे व्हावे : नितीन गडकरी

## रोजगार मेळाव्याचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून रोजगार मेळाव्याला संबोधित केले आणि सरकारी विभाग आणि संस्थांमध्ये नवनियुक्त 71,000 हून अधिक युवांना नियुक्ती पत्रांचे वितरण केले. हा रोजगार मेळा पंतप्रधानांच्या रोजगार निर्मितीला प्राधान्य देण्याच्या वचनबद्धतेला अधोरेखित करत असून युवकांना राष्ट्रउभारणी आणि आत्मसक्षमीकरणात योगदान देण्यासाठी अर्थपूर्ण संधी उपलब्ध करून त्यांना सक्षम करेल.

देशभरात 45 ठिकाणी रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला. केंद्र सरकारच्या विविध मंत्रालये आणि विभागांसाठी ही भरती होत आहे. देशभरातून निवडलेले नवीन कर्मचारी गृह मंत्रालय, टपाल विभाग, उच्च शिक्षण विभाग, आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय, वित्तीय सेवा विभाग, यासह विविध मंत्रालये किंवा विभागांमध्ये सामील होतील. महाराष्ट्रातही नागपूर आणि पुणे येथे रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.



आयुष्यामध्ये प्रामाणिकपणा, विश्वसनीयता आणि पारदर्शकता ही क्षमता आहे. शासकीय नोकऱ्यांमध्ये नवनियुक्तांनी आपल्या अंगभूत तसेच व्यक्तिगत कौशल्याचा विकास करून केवळ नोकरी मागणारे नव्हे तर नोकरी देणारे व्हावे असे आवाहन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आज नागपूरच्या केंद्रीय राखीव पोलीस दल ग्रुप सेंटर हिंगणा येथे आयोजित रोजगार मेळाव्यात केले. या मेळाव्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संबोधित केले. सुमारे 257 जणांना नागपूर मधील रोजगार मेळाव्यात गडकरींच्या हस्ते नियुक्तीपत्र वितरित करण्यात आले. यात सीआरपीएफ, बीएसएफ, सीआयएसएफ, आयटीबीपी, आसाम रायफल, एसएसबी, रेल्वे, पोस्ट डिपार्टमेंट, बँक या विभागातील उमेदवारांचा समावेश आहे .

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा 2047 सालापर्यंत भारताला विकसित देश बनवण्याचा संकल्प पूर्ण करण्याची जबाबदारी देशाच्या युवा वर्गावर आहे आणि आपल्याला एक अतिशय उत्तम संधी पंतप्रधानांनी दिली असून युवा वर्ग या संधीचे नक्कीच सोने करेल, असा विश्वास केंद्रीय सहकार आणि नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी व्यक्त केला आहे. पुण्यामध्ये तळेगाव येथे सीआरपीएफ ग्रुप सेंटर येथे आज रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या मेळाव्यात ते बोलत होते. आज देशभरात 45 ठिकाणी रोजगार मेळाव्यांचं आयोजन होत असून 71,000 पेक्षा जास्त नवनियुक्तांना नियुक्तीपत्रे दिली जात आहेत. या मेळाव्यांचा एक भाग म्हणून हा मेळावा आयोजित करण्यात आला. यावेळी सुमारे 500 नवनियुक्तांना नियुक्तीपत्रांचे वितरण करण्यात आले. यावेळी मोहोळ यांनी गेल्या 10 वर्षात झालेल्या बदलांचे महत्त्व अधोरेखित केले. गेल्या 10 वर्षात जागतिक स्तरावर आपल्या देशाचे नाव मोठे झाले आहे. पंतप्रधानांनी देशातील प्रत्येक घटकाचा विचार केला आहे. देशातील निम्म्याहून जास्त लोकसंख्या पंतप्रधानांनी सुरू केलेल्या कोणत्या ना कोणत्या योजनेचा लाभ घेत आहे, असे मोहोळ म्हणाले. या रोजगार मेळाव्यात केंद्र सरकारच्या विविध विभाग/संस्था (बीएसएफ, एसएसबी, आयटीबीपी, सीआरपीएफ, एआर, बीआरओ, इंडियन पोस्ट, एसबीआय, बँक ऑफ इंडिया, , कॅनरा बँक, आयएमयू, सीपीडब्लूडी) मधील सुमारे 500 उमेदवारांना नियुक्ती पत्रे प्राप्त करण्यासाठी आमंत्रित करण्यात आले होते.

केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. के.के. पांडे, डीआयजी आयआयएम सीआरपीएफ पुणे, जलज सिन्हा, डीआयजी (मेडिकल) सीएच, सीआरपीएफ पुणे आणि इतर अधिकाऱ्यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले. सर्व नवनियुक्त उमेदवारांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी दीपक एस पाटील, हरीश उपाध्याय, उपनिबंधक आणि इतर विभाग/संस्थांचे अधिकारी देखील आपापल्या विभाग/संस्थेच्या वतीने या कार्यक्रमात सहभागी झाले होते.

# हत्याकांडात दोघांना आजीवन कारावास

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :
कोरोना लॉकडाऊन दरम्यान मानस चौकातील खालसा भोजनालयात कुकची हत्या प्रकरणात न्यायालयाने दोन आरोपींना दोषी ठरवून आजीवन कारावासाची शिक्षा सुनावली. सतीश उर्फ बबलू रामरईस तिवारी (32) आणि राजू उर्फ रंजू दुखीराम कौरती (30) दोन्ही रा. बाशीवाडा, रिवा अशी दोषींची नावे आहेत. 14 मे 2020 च्या सायंकाळी खालसा हॉटेलमध्ये शंकर नावाचा 50 वर्षीय कुक मृतावस्थेत आढळला होता. शंकर 3-4 वर्षांपासून खालसा भोजनालयातच काम करीत होता. या दरम्यान त्याने त्याच्या पगारातून 3 लाख रुपयांची बचत केली होती. याची माहिती बबलूला होती. कोरोना लॉकडाऊन लागल्यामुळे भोजनालय बंद होते. कर्मचारी भोजनालयातच रहात होते. लोभातून बबलूने सोबत काम करणाऱ्या राजूसोबत मिळून शंकरला लुटण्याची योजना बनवली. दोघांनीही 6 मे 2020 रोजी शंकरचे पैसे हिसकावण्याचा प्रयत्न केला. विरोध केला असता आरोपींनी खलबत्त्याने शंकरच्या डोक्यावर मारून खून केला. त्यानंतर त्याचे दोन्ही हात टेपने मागे बांधले तर पाय नाराळाच्या दोरीने बांधले. मृतदेह ब्लँकेटमध्ये गुंडाळून भोजनालयातच सोडला आणि फरार झाले. परिसरात दुर्गंध पसरल्याने आसपासचे नागरिक त्रस्त झाले. पोलिसांना सूचना देण्यात आली. भोजनालय तपासले असता शंकरचा मृतदेह आढळला. बऱ्याच प्रयत्नानंतर पोलिसांना बबलूचा सुगावा लागला आणि दहा दिवसानंतर त्याला रिवा येथून अटक केली. त्याच्या कबुली जबाबावरून पोलिसांनी राजूलाही अटक केली. तत्कालीन सहायक पोलिस निरीक्षक किशोर शेरकी यांनी प्रकरणाचा सखोल तपास करून पुरावे गोळा केले आणि न्यायालयात आरोप पत्र दाखल करण्यात आले. सरकारी वकील दिपाली गनगने आरोप सिद्ध करण्यात यशस्वी झाल्या.

# योजनांपासून शेतकरी लांब, कृषी अधिकारी पाहतात तालुक्यावरून काम....

## कृषी अधिकारी, सहाय्यक योजनांची माहितीच देत नाहीत

■ महासागर प्रतिनिधी
मौदा, दि. २३ :

केंद्र व राज्य शासनाकडून शेतकऱ्यांसाठी विविध योजना राबवून त्या अंमलात आणतात. या योजनांची पूर्तता करत शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्याचे काम कृषी अधिकारी व कर्मचारी यांच्यावर असते. परंतु मौदा तालुका कृषी अधिकारी व पंचायत समिती येथील कृषी अधिकारी कार्यालयातील कृषी अधिकारी व कृषीमंडळ अधिकारी, पर्यवेक्षक, सहायक केवळ तालुक्याच्या ठिकाणी बसून कारभार पाहत असल्याने अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या दुर्लक्षितपणामुळे तालुक्यात कृषी योजनेचा बट्याबोळ झाला आहे. अनेक शेतकरी कृषीविषयक शासकीय योजनांपासून वंचित असून



माहितीच दिली जात नसल्याचा आरोप अनेक शेतकऱ्यांनी केला आहे.

मौदा तालुक्यात कृषिविषयी अनेक योजनांची माहिती शेतकऱ्यांना वेळोवेळी पुरवली जात नाही. याकडे प्रशासनाचे लक्ष नसल्याची खंतही शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. तालुक्यात पर्जन्यमान कमी पडले की, सत्तर टक्क्यांपेक्षा अधिक शेती क्षेत्राला दुष्काळी परिस्थिती निर्माण होत असते.

**अधिकारी, कर्मचारी तालुक्यावर**

मुळात ज्यांच्यावर जबाबदारी आहे तेच जर महिना महिना शेतकऱ्यांच्या संपर्कात राहत नसले तर काय उपयोग, कृषी सहायक हा तालुक्यावरून आपला कार्यभार पाहतात. एखाद्या शेतकऱ्याने दूरध्वनीवरून माहिती विचारल्यास उद्धटपणे वागणूक देत शेतकऱ्यांशी गैरवर्तणूक केली जाते. अशा या कर्मचाऱ्यांवर वरिष्ठांचे कुठलेच नियंत्रण नसल्याने या भागातील शेतकरी कर्मचाऱ्यांपासून वैतागले आहेत. याबाबत अनेक शेतकऱ्यांनी कैफियत मांडली आहे. त्यातच योजनेच्या नावावर शेती शाळा घेऊन प्रशिक्षणाचा निधी जाते कुठ असाही प्रश्न उपस्थित होत आहे. प्रत्यक्षात प्रशिक्षणात उपस्थिती नागण्य असतानासुद्धा उपस्थिती अधिकची दाखवून तसा अहवाल वरिष्ठांकडे सुद्धा सादर करण्यात येतो. जे शेतकरी शासकीय योजनेचा लाभ घेण्यासाठी कागदपत्रांची जुळवाजुळ करतात अशा अनेक शेतकऱ्यांना या विभागाचे लाभ मिळत नसल्याचेही शेतकऱ्यांनी म्हटले आहे. याकडे जिल्हा कृषी अधिकारी यांनी लक्ष देऊन कार्यवाही करावी.

### शेती अवजारे मिळतच नाहीत....!!!!

मौदा तालुका येथील बहुतांश शेती कोरडवाहू असल्याने शासनाच्या सुधारित तंत्रज्ञानाच्या आधारावर येथील शेतकऱ्यांना अनेक योजनांचा लाभ देण्यासाठी राष्ट्रीय फलोत्पादन अभियान, गतिमान पाणलोट तसेच जलसंधारण कार्यक्रम, ग्रामीण रोजगार हमी योजना, सेंद्रिय खताचा समतोल व एकात्मिक वापर, पीक संरक्षण योजना, अनुसूचित जाती, जमाती योजना, अनुदानावर शेती अवजारे वाटप अशा अनेक योजना शासन स्तरावर राबवल्या जातात. मात्र या सर्व योजनेची प्रत्यक्षात योग्य प्रकारे अंमलबजावणीची जबाबदारी ज्या शासकीय प्रतिनिधींवर असते ते म्हणजे कृषी विभागाचे अधिकारी, मंडळ अधिकारी तसेच शेतकऱ्यांसाठी निवडलेला कृषी सहायक.

# दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शाळेतील शिक्षकाचे तीन महीन्यापासुनचे वेतन प्रलंबीत

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २३ :

दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शाळेतील शिक्षक कर्मचारी यांना सातव्या वेतन आयोगातील थकबाकी रक्कम तातडीने अदा करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे तसेच नागपूर जिल्ह्यातील शाळेसाठी वेतनासाठी ३ कोटी रुपये १५ लक्ष ६५ हजार असतांनाही मतिमंद प्रवगातील शिक्षक-कर्मचारी यांचे माहे ऑक्टोबर २०२४ पासून न झालेल्या नियमित वेतनाबाबत विदर्भ दिव्यांग शाळा-कार्मशाळा शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी संघटना यांनी गुरुवार १९ डिसेंबर रोजी सचिव सचिंद्र प्रताप सिंह यांची भेट घेतली.

सातव्या वेतन आयोगातील थकबाकी पाच हप्त्यांची रक्कम तातडीने अदा करण्यासाठी पाठपुरावा विदर्भ दिव्यांग शाळा संघटना यांनी २६ फेब्रुवारी २०२४ ला विभागिय समाज कल्याण अधिकारी कार्यालय समोर आंदोलन करण्यात आले होते. ३० सप्टेंबर २०२४ देवेंद्र फडणवीस व बच्चु कडु यांना निवेदन पाठविण्यात आले. तसेच आयुक्त दिव्यांग कल्याण यांना प्रत्यक्ष भेटून चर्चा केली याची सचिव सचिंद्र प्रताप सिंह यांना याची माहिती देण्यात आली.

आयुक्त यांना सातव्या वेतन आयोगातील थकबाकी शिक्षक कर्मचारी यांना मिळाली नाही त्यामधे संत विक्तू बाबा मतिमंद मुला मुलींची निवासी शाळा टाकळघाट, ता. हिंगणा, सेवायोग मतिमंद मुलांची शाळा पारडी नागपूर, भारत मुकबधीर विद्यालय, जगनाडे चौक, नंदनवन, नागपूर, स्नेह संपदा अस्तीव्यंग विद्यालय, होम फॉर एज उंटखाना, नागपूर, जीओदय मतिमंद विद्यालय,सदर नागपूर, सोनुताई अग्नीहोत्री, मुकबधीर विद्यालय, छत्रपती चौक, नागपूर, सेवानिवृत्त शिक्षक कर्मचारी, डॉ.आंबेडकर मतिमंद विद्यालय, जनचेतना मतिमंद विद्यालय भंडारा, व इतर पाच अनुदानित दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शाळा-कर्मशाळा, भंडारा, अंजनाबाई वासनिक मतिमंद शाळा व राजीव गांधी मतिमंद शाळा, कांद्री कन्हान, नागपूर, या शाळांचा तक्रारीत समावेश होता.

संघटनेस मिळालेल्या माहितीनुसार काही शाळेतील शिक्षक कर्मचारी यांना, ज्यांनी आर्थिक गरजा पूर्ण केलेल्या आहे किंवा समाज कल्याण अधिकारी यांनी शिफारशी केल्या त्यांनाच सातव्या वेतन आयोगाची हप्ते अदा करण्यात आलेली आहे.

याचा उल्लेख चर्चेत करण्यात आला चर्चेच्यावेळी पुणे येथील अंध शिक्षकांचे शिष्टमंडळही उपस्थित होते असे सचिव सचिंद्र प्रताप सिंह यांना अवगत करण्यात आले.

शिबिर कार्यालय, नागपूर येथे गुरुवार १९ डिसेंबर रोजी दुपारी ४ वाजता दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव सचिंद्र प्रताप सिंह यांचे सोबत प्रत्यक्ष भेट व चर्चा करण्यात आली. त्यात मतीमंद प्रवगार्तील सेवायोग मतिमंद शाळा व संत विक्तू बाबा मतिमंद मुला मुलींची निवासी शाळा टाकळघाट,तह. हिंगणा या शाळेतील शिक्षक-कर्मचारी यांचे माहे ऑक्टोबर २०२४ पासुन वेतन नाही, याबाबत सचिव सचिंद्र प्रताप सिंह यांनी नागपूर विभागातील जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांची तात्काळ बैठक बोलावून त्यांना समज देण्यात आली.सोनुताई अग्नीहोत्री, मुकबधीर विद्यालय, छत्रपती चौक, नागपूर, नियमित शिक्षक कर्मचारी यांना सातव्या वेतन आयोगाची रक्कम अदा करण्यात आली. परंतु सेवानिवृत्त शिक्षक -कर्मचारी यांना अदा करण्यात आली नाही हा अनियमितेचा पुरावा आहे. यावेळी सहसचिव विष्णूदास घोडके, खासगी शिक्षक संघाचे संस्थापक संघाचे प्रमोद रेवतकर,तेजराज राजुरकर,रिता कराडे, निता बडकस उपस्थित होते.

# माऊली लर्निंग सेंटरचे स्नेहसंमेलन साजरे

■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. २३ :

हिंगणा धनगरपुरा येथील नाना-नानी उद्यान परिसरात माऊली लर्निंग सेंटर शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन विविध सांस्कृतिक कार्यक्रमासह संपन्न झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हिंगणा पोलिस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक वसंता शेडमाके होते. तर हिंगणा नगरपंचायतच्या अध्यक्षा लता गौतम पारधी, सामाजिक कार्यकर्ते विनायक इंगळे शिवगर्जना युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष पंकज गजबे , नगरसेविका सुचिता चामाटे, नगरसेविका वडे, नगरसेविका प्राजक्ता गजबे व संचालक सुनिल माहुरे उपस्थित होते. माऊली लर्निंग सेंटरच्या लहान बालकांनी विविध प्रकारचे सांस्कृतिक कार्यक्रम, बहारदार नृत्य तसेच झाडे लावा,झाडे जगवा व जल है तो कल है.अशाप्रकारे संदेश देणारे अतिशय उत्तम, आकर्षक, मनोरंजनात्मक व उद्बोधक कार्यक्रम सादर करण्यात आले. यानंतर लता गौतम पारधी, पंकज गजबे व सुनिल माहुरे यांनी मार्गदर्शन केले. स्वाती माहुरे व पल्लवी गव्हारे यांनी सुरेख सुत्रसंचालन तर प्रिया झाडें व दिव्या घोडे यांनी आभार मानले.याप्रसंगी सुनिल माहुरे, प्रशांत लहाने, सुशांत घोडे, शुभांगी लहाने, अमोल माहुरे व अक्षय ढोके उपस्थित होते.

# केंद्रीयमंत्री गडकरी यांच्या हस्ते सुवी बर्ड पार्कचे भूमिपूजन

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. २३ :

रामटेक येथील धार्मिक पर्यटनस्थळ रामधाम येथे दि.२१ डिसेंबर ला शनिवारी सुवी बर्ड पार्कचे भूमिपूजन केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी रामधामचे संस्थापक चंद्रपाल चौकसे, माजी आमदार डी. मल्लिकार्जुन रेड्डी यांची प्रमुख उपस्थिती होती. विधिवत भूमिपूजन झाले. यावेळी चंद्रपाल चौकसे यांनी केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांचा शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार केला. केंद्रीयमंत्री गडकरी



यांनी रामधाम गाठून सुवी बर्ड पार्कला भेट देऊन कुतूहलाने पक्ष्यांशी संबंधित माहिती घेतली. त्यानंतर काही पक्षी हातात घेतले तर काही पक्ष्यांची ओळख करून घेतली. पर्यटकमित्र चंद्रपाल चौकसे यांनी बांधलेल्या या रामधामच्या माध्यमातून रामटेकला एक नवी ओळख मिळाली असल्याचे ते म्हणाले. राबविलेल्या सर्व उपक्रमांचे त्यांनी कौतुक केले आणि येथे लावलेल्या बांबूची अधिक माहिती घेतली.

# बालपांडे पब्लिक स्कूल येथे जल्लोष कार्यक्रम साजरा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :

बालपांडे पब्लिक स्कूल, बेसा या शाळेत जल्लोष या कार्यक्रमाचे उद्घाटन संस्थेच्या संचालिका सौ. वैशाली बालपांडे व पदविका महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन डुमोरे, डॉ. महाजन यांच्या उपस्थितीत अतिशय उत्तम पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात किलबिल करत विद्यार्थ्यांची नृत्याने झाली. यानंतर प्राथमिक वर्गाच्या विद्यार्थ्यांनी ड्रिलचे प्रदर्शन केले. हे प्रदर्शन पालकांना फार





आवडले. शाळेच्या प्राचार्य म्हणाल्या. शाळेच्या अभ्यास क्रमामध्ये खेळाचे फार महत्त्व आहे. कारण खेळ विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वपूर्ण डॉ. नितीन डुमोरे यांनी विद्यार्थ्यांच्या केलेल्या उत्कृष्ट खेळाबद्दल शुभेच्छा दिल्या आणि विद्यार्थ्यांना त्यांच्या पुढील उज्वल भविष्यासाठी प्रोत्साहन दिले.

# दत्तात्रेय प्रभू अवतार दिवस साजरा

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २३ :

येथील अभिजित नगर मधील श्री हनुमान मंदीर परिसरात पाच दिवशीय श्री दत्त जयंती उत्सव शनिवार १४ डिसेंबर ते बुधवार १८ डिसेंबर पर्यंत साजरा करण्यात आला.शनिवार १४ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता आयोजक अमित हुसनापुरे, जयश्री हुसनापुरे यांच्या हस्ते अभिषेक व महाआरती करण्यात आली. सायंकाळी ८ वाजता माऊली भजन मंडळ यांच्या भजनाचा कार्यक्रम पार पडला.

रविवार १५ डिसेंबर रोजी सायंकाळी ८ वाजता लक्ष्मी भजन मंडळ यांच्या भजनाचा कार्यक्रम पार पडला. सोमवार १६ डिसेंबर रोजी सायंकाळी ८ वाजता शारदा माता महिला मंडळ यांच्या भजनाचा कार्यक्रम पार पडला. मंगळवार १७ डिसेंबर रोजी दुपारी ४ वाजता माऊली भजन मंडळ यांचे काल्याचे भजन पार पडले.बुधवार १८ डिसेंबर रोजी श्री गुरुदेव सेवा मंडळ यांचे भजन, रात्री ८ वाजता



महाआरती व महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. श्री दत्तात्रेय प्रभू हे पूर्ण ब्रह्म परमेश्वरांचे अवतार आहेत.श्री दत्तात्रय प्रभूच्या जीव उद्धरण कायार्ची व विचारांची ओळख व्हावी या उदात्त हेतूने दोन पाचदिवसीय अवतार दिन साजरा करण्यात आल्याचे कार्यक्रमाचे आयोजक अमित हुसनापुरे यांनी सांगीतले. यावेळी ह.भ.प. निळकंठ महाराज सावरकर, ह.भ.प. अवजेकर महाराज, ह.भ.प. हेडावूताई, ह.भ.प. सावरकर, हभ.प. अशोकराव लोखंडे, ह. भ. प. रमेश धोटे, ह. भ.प. मस्के, ह.भ.प. किनकर, ह. भ. प. रामटेके, ह. भ. प. भोयर, ह. भ. प.निमजेताई, वासुदेव आवारे, वनिता आवारे, अरुण तट्टे, मोहन वसुले, आशिष निमजे, सौरभ घडीनकर, दिनेश पिरोडिया, शुभम पिरोडिया, कुणाल पिरोडिया, धीरज कलुके, यश हिरणवार, नवीन बोपचे, कार्तिक राऊत, पियांशू आसोडे शेषराव ऊके, नरेश निमजे, निळू चौधरी, किसन बांते, मनोज बांते, सचिन कुलपे, प्रशांत खाटीक, प्रशांत माल्लेर, यश बांते उपस्थित होते.

## तडीपार गुंडास अटक

**नागपूर :** गुन्हे शाखा युनिट 5 च्या पथकाने गस्तीदरम्यान मिळालेल्या गोपनिय माहितीवरून विना परवानगी शहरात फिरत असलेल्या तडीपार गुंडाला सापळा रचून अटक केली. सुमित उर्फ जॉन सुनील शिंदे (29) रा. मेकोसाबाग, लुंबिनीनगर असे अटकेतील गुंडाचे नाव आहे. सुमित हा सराईत गुन्हेगार असून त्याच्याविरुद्ध जरीपटका ठाण्यात गंभीर स्वरूपाचे अनेक गुन्हे नोंद आहेत. शनिवारी गुन्हे शाखा युनिट 5 चे पथक जरीपटका ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. या दरम्यान एक तडीपार गुंड गड्डीगोदाम चौकात एचएनआर पेट्रोल पंपसमोर उभा असल्याची माहिती मिळाली. या माहितीच्या आधारावर पोलिस परिसरात पोहोचले. पोलिसांना पाहताच सुमितने तेथून पळ काढला. पथकाने पाठलाग करून त्याला पकडले. सदर ठाण्यात आणून त्याचा रेकॉर्ड तपासला असता झोन 5 च्या पोलिस उपायुक्तांनी त्याला 16 मे 2024 रोजी शहर व ग्रामीण हद्दीतून एक वर्षासाठी तडीपार केले.

# नरखेड येथे संविधान बचाव मोर्चा, परभणी घटनेचे व संसदेतील डॉ.आंबेडकर अवमान घटनेचे तीव्र पडसाद

■ महासागर प्रतिनिधी
नरखेड, दि. २३ :

संविधान बचाव कृती समिती नरखेडच्या वतीने दि. १० डिसेंबर २०२४ रोजी परभणी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळील संविधान शिल्पाची समाजकंटक सोपान दत्तराव पवार या माथेफिरू इसमाने केलेली तोडफोड व संसदेत देशाच्या गृहमंत्र्याने केलेले बाबासाहेबांच्या अवमान या दोन्ही घटनेच्या निषेधार्थ मोर्चात घोषणा देऊन तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला. येथील डॉ, बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांना माल्यारपण करून मोर्चा नगरातील मुख्य रस्त्याने फिरून तहसील कार्यालय येथे मोचार्चे सभेत रूपांतर झाले. यावेळी सभेचे प्रास्ताविक अशोक ढोके यांनी केले तर राहुल गजबे, सुरेश तागडे, प्रा.



कैलास, बारमाटे, प्रा. प्रकाश सनेसर, संध्या ढोके, सुदर्शन नवघरे, नईम भाई कुरेशी, संजय बारमासे, यांनी सभेला संबोधित केले. कृती समितीचे समन्वयक दिगंबर नारनवरे यांचे नेतृत्वात तहसीलदार उमेश खोडके यांना मुख्यमंत्री महाराष्ट्र शासनला निवेदन सभास्थळी देण्यात आले. परभणी पोलिसांच्या अमानुष मारहाणीत मृत्यू झालेल्या सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मारेकऱ्यावर सदोष मनुषवधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा. परभणी येथील डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळील संविधान शिल्पाची तोडफोड करणाऱ्या सोपान पवार याच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात यावा, व दोषीला शिक्षा देण्यात यावी. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला सुरक्षा रक्षक नेमणूक करण्यात यावे. मोर्चाच्या यशस्वीते करिता प्रा. हेमंत ढोके, संजय गजबे, देविदास बागडे, शैलेश बागडे, पवन राऊत, शुभम गोडाणे, पवन गजबे, जयश्री ढोके आदींनी सहकार्य केले.

# सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरविणाऱ्या १४८ प्रकरणांची नोंद

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :

नागपूर महानगरपालिकेच्या उपद्रव शोध पथकाने सार्वजनिक ठिकाणी लघुशंका करणाऱ्यांवर, कचरा फेकणाऱ्यांवर, थुंकणाऱ्यांवर, 79 मायक्रॉन पेक्षा कमी प्लास्टिक पिशवीचा वापर करणाऱ्यांवर अधिक कठोर कारवाई ची सुरुवात केली आहे. सोमवार (23) रोजी शोध पथकाने 148 प्रकरणांची नोंद करून 68,400/- रुपयाचा दंड वसूल केला. हाथगाडया, स्टॉल्स, पानठेले, फेरीवाले, छोटे भाजी विक्रेते यांनी लगतच्या परिसरात अस्वच्छता (रु. 400/- दंड) या अंतर्गत 35 प्रकरणांची नोंद करून 14,000/- रुपयांची वसुली करण्यात आली. व्यक्तीने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे या अंतर्गत 10 प्रकरणांची नोंद करून 1000 रुपयांची वसुली करण्यात आली. दुकानदाराने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे (रु. 400/- दंड) या अंतर्गत 10 प्रकरणांची नोंद करून 4,000/- रुपयांची वसुली करण्यात आली.

मॉल, उपहारगृहे, लॉजिंग, बोर्डीग हॉटेल, सिनेमा हॉल, मंगल कार्यालय, कॅटरर्स सर्व्हीस प्रोव्हायडर इत्यादींनी रस्ता या अंतर्गत 1 प्रकरणांची नोंद करून 2,000/- रुपयांची वसुली करण्यात आली. वाहतूकीचा रस्ता मंडप, कमान, स्टेज इत्यादी रचना करुन अथवा वैयक्तिक कामाकरीता बंद करणे या अंतर्गत 22 प्रकरणांची नोंद करून 19,000/- रुपयांची वसुली करण्यात आली. सार्वजनिक ठिकाणी रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी जनावरे बांधणे या अंतर्गत 1 प्रकरणांची नोंद करून 1,000 रुपयांची वसुली करण्यात आली. सार्वजनिक ठिकाणी रस्ता, फुटपाथ, ठिकाणी बांधकामाचा मलबा / टाकवू कचरा टाकणे साठवणे या अंतर्गत 2 प्रकरणांची नोंद करून 2,000 रुपयांची वसुली करण्यात आली.

**जाहीर सुचना**
**कोर्ट विद्यमान २रे सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, रामटेक यांच्या न्यायालयातील एम.जे.सी. नं. ३८/२०२४**

पेशी ता. १८.०१.२०२५ प्रोसेस नं. ३००६ दि. २३.१२.२०२४.

अर्जदार : १. श्रीमती कल्पना वि. शंभु पडगिलवार वय ४३ वर्षे
२. कु. कशिश शंभु पडगिलवार वय २० वर्ष, व्यवसाय शिक्षण
३. प्रांजल शंभु पडगिलवार वय १७ वर्षे तर्फे अज्ञान पालन कर्ती आई श्रीमती कल्पना वि. शंभु पडगिलवार वय ४३ वर्षे सर्व राह–व्दारा भिमाबाई लेंडें, सुभाष वार्ड, मंगळवारी वार्ड रामटेक, तह–रामटेक, जि. नागपूर

-- विरुध्द --

प्रतिवादी : कोणीही नाही
मयतदार : शंभु नामदेवराव पडगिलवार मृत्यू दिनांक २९.०६.२०२४ राह–व्दारा भिमाबाई लेंडें, सुभाष वार्ड, मंगळतारी वार्ड रामटेक, ता. रामटेक, जि. नागपूर

सदरहू अर्जदाराने नियम २ प्रकरण १ मुंबई विनीमयम अधिनियम १८२७ सह कलम ३९० भारतीय वारसाहक्क अधिनियम १९२५ अंतर्गत या न्यायालयात कायदेशीर वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरिता अर्ज दाखल केला आहे. अर्जदाराने मयतदार शंभु नामदेवराव पठगिलवार मृत्यू दिनांक २९.०६.२०२४ राह.व्दारा भिमाबाई लेंडें, सुभाष वार्ड, मंगळवारी वार्ड रामटेक, ता. रामटेक, जि. नागपूर यांचे वारस क. १. श्रीमती कल्पना वि. शंभु पडगिलवार वय ४३ वर्षे २. कु. कशिश शंभु पडगिलवार वय २० वर्ष, व्यवसाय शिक्षण ३. प्रांजल शंभु पडगिलवारवय १७ वर्षे तर्फे अज्ञान पालन कर्ती आई श्रीमती कल्पना वि. शंभु पडगिलवार वय ४३ वर्ष सर्व राह. व्दारा भिमाबाई लेंडें, सुभाष वार्ड, मंगळवारी वार्ड रामटेक, तह.रामटेक, जि. नागपूर यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरिता या न्यायालयात अर्ज सादर केला आहे. त्या अर्जाच्या सुनावणीची तारीख १८.०१.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता ठरविली आहे. या जाहीर नोटीसद्वारे सर्व संबंधितांना, नातेवाईकांना व आम जनतेस कळविण्यात येते की, जर मयतदाराच्या कायदेशीर वारसान प्रमाणपत्र बाबत जर कोणाचा उजर असल्यास किंवा हरकत असल्यास त्याने आपला उजर पेशी तारेखेचे आत अथवा तारखेवर या न्यायालयात पेश करावा, जर अशी कोणतीही हरकत वा उजर न्यायालयात उपस्थित न झाल्यास अर्जदाराला कायदेशीर वारसान प्रमाणपत्र मंजूर करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

आज दि. २३/१२/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिला.

शिक्का

आदेशान्वये
**अधिक्षक**
**दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर, रामटेक**

**कोर्ट विद्यमान श्री भोजराज बडवाईक, कार्यकारी दंडाधिकारी, रामटेक यांचे न्यायालय**
प्र.क्र. २४ / एम आर सी–८१/२०२४
मौजा महादुला तालुका रामटेक

**: जाहीरनामा :**

ज्याअर्थी अर्जदार दिनेश बापूराव अरार्म वय ५१ वर्ष रा. महादुला यांनी त्यांचे वडील नामे बापूराव रामजी अरार्म यांचा मृत्यु दिनांक ३०.१२.१९८६ रोजी राहते घरी मौजा महायुला तालुका रामटेक येथे झाला परंतू त्यावेळेस अर्जदाराचे कुटुंबातील कोणत्याही व्यक्तीनी अर्जदाराचे मृत्युची नोंद संबंधीत नगर परिषद / ग्राम पंचायत कार्यालय महादुला येथे केली नाही. त्याबाबत ग्रामपंचायत/नगर परिषद महादुला यांनी प्रमाणपत्र दिले आहे. करीता नामे बापूराव रामजी अरार्म यांचा मृत्युची नोंद नगरपरीषद/ग्रामपंचायत महादुला ता. रामटेक येथे करण्याबाबत आदेश मिळण्याकरीता अर्ज सादर केले आहे.

त्याअर्थी या जाहीरनाम्याव्दारे असे सुचित करण्यात येते की, उपरोक्त बापूराव रामजी अरार्म वय ५१ रा. महादुला यांचा मृत्यु दिनांक ३०.१२.१९८६ ची नोंद ग्रामपंचायत महादूला तालुका रामटेक जिल्हा नागपूर येथे घेण्यास इतर कुणाचेही कोणतेही प्रकारचे आक्षेप अथवा उजर तक्रार असल्यास आपण दिनांक २७.१२.२०२४ पावेतो आपले आक्षेप अथवा उजर तक्रार लेखी स्वरुपात स्वतः उपस्थित राहून या न्यायालयात समक्ष सादर करावे. नियोजीत तारखेनंतर मिळालेल्या आक्षेपावर विचार करण्यात येणार नाही. याबाबत संबंधितांनी नोंद घ्यावी.

सदर जाहीरनामा आज दिनांक ०२.१२.२०२४ रोजी माझे सही व शिक्यानिशी प्रसिध्द करण्यात येत आहे.

स्थळ :– रामटेक
दिनांक : ०२.१२.२०२४

**(भोजराज बडवाईक)**
**कार्यकारी दंडाधिकारी, रामटेक**

**कोर्ट विद्यमान श्री भोजराज बडवाईक नायब तहसिलदार, रामटेक यांचे न्यायालय**
प्र.क्र. /एमआरसी–८१/२०२४
मौजा पटगोवरी ता. रामटेक
जिल्हा नागपूर

**: जाहीरनामा :**

ज्याअर्थी मारोती शंकर भोयर रा. पटगोवरी पो. नयाकुंड तह. रामटेक जि. नागपूर यांनी स्वतः नामे मारोती शंकर भोयर यांचा जन्म दिनांक १२.०६.१९६३ रोजी मौजा पटगोवरी ता. रामटेक येथे राहत्या घरी येथे झाला असुन जन्मची नोंद नगर परिषद रामटेक येथे केली नाही. त्याबाबत ग्रामपंचायत पटगोवरी यांनी दिनांक २७.०९.२०२४ रोजी नोंद नसल्याचे प्रमाणपत्र सादर केले आहे. त्यामुळे नामे मारोती शंकर भोयर यांचा जन्म दिनांक १२.०६.१९६३ बाबत ग्रामपंचायत पटगोवरी येथे नोंद घेणे बाबत आदेश पत्र मिळणे करीता अर्ज सादर केले आहे.

त्याअर्थी या जाहीरनाम्याव्दारे असे सुचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जात नमूद मारोती शंकर भोयर यांचा जन्म दिनांक १२.०६.१९६३ बाबत ग्रामपंचायत पटगोवरी येथे घेण्यास इतर कुणाचेही कोणतेही प्रकारचे आक्षेप अथवा उजर तक्रार असल्यास आपण दिनांक ०३.०१.२०२५ पावेतो आपले आक्षेप अथवा उजर तक्रार लेखी स्वरुपात स्वतः उपस्थित राहून या न्यायालयात समक्ष सादर करावे. नियोजीत तारखेनंतर मिळालेल्या आक्षेपावर विचार करण्यात येणार नाही. याबाबत संबंधितांनी नोंद घ्यावी.

सदर जाहीरनामा आज दिनांक १३.१२.२०२४ रोजी माझे सही व शिक्यानिशी प्रसिध्द करण्यात येत आहे.

स्थळ :– रामटेक
दिनांक :–१३.१२.२०२४

**(भोजराज बडवाईक)**
**नायब तहसिलदार, रामटेक**

**कोर्ट विद्यमान श्री भोजराज बडवाईक नायब तहसिलदार, रामटेक यांचे न्यायालय**
प्र.क्र. /एमआरसी–८१/२०२४
मौजा रामटेक ता. रामटेक
जिल्हा नागपूर

**: जाहीरनामा :**

ज्याअर्थी जुगलकिशोरसिंह निरंजनसिंह ठाकूर रा. शास्त्री वार्ड रामटेक ता. रामटेक जि. नागपूर यांनी स्वतः नामे जुगलकिशोरसिंह निरंजनसिंह ठाकूर यांचा जन्म दिनांक १३.१२.१९६७ रोजी मौजा शास्त्री वार्ड रामटेक ता. रामटेक येथे राहत्या घरी येथे झाला असुन जन्मची नोंद नगर परिषद रामटेक येथे केली नाही. त्याबाबत नगर परिषद रामटेक यांनी दिनांक २२.१०.२०२४ रोजी नोंद नसल्याचे प्रमाणपत्र सादर केले आहे. त्यामुळे नामे जुगलकिशोरसिंह निरंजनसिंह ठाकूर यांचा जन्म दिनांक १३.१२.१९६७ बाबत नगर परिषद रामटेक येथे नोंद घेणे बाबत आदेश पत्र मिळणे करीता अर्ज सादर केले आहे.

त्याअर्थी या जाहीरनाम्याव्दारे असे सुचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जात नमूद जुगलकिशोरसिंह निरंजनसिंह ठाकूर यांचा जन्म दिनांक १३.१२.१९६७ बाबत नगर परिषद रामटेक येथे घेण्यास इतर कुणाचेही कोणतेही प्रकारचे आक्षेप अथवा उजर तक्रार असल्यास आपण दिनांक ०९.०१.२०२५ पावेतो आपले आक्षेप अथवा उजर तक्रार लेखी स्वरुपात स्वतः उपस्थित राहून या न्यायालयात समक्ष सादर करावे. नियोजीत तारखेनंतर मिळालेल्या आक्षेपावर विचार करण्यात येणार नाही. याबाबत संबंधितांनी नोंद घ्यावी.

सदर जाहीरनामा आज दिनांक १९.१२.२०२४ रोजी माझे सही व शिक्यानिशी प्रसिध्द करण्यात येत आहे.

स्थळ :– रामटेक
दिनांक :–२९.१२.२०२४

**(भोजराज बडवाईक)**
**नायब तहसिलदार, रामटेक**

**कोर्ट विद्यमान कार्यकारी दंडाधिकारी, पारशिवनी यांचे न्यायालय पारशिवनी**
रा.मा.क्रं. /जन्म–मृत्यू नोंद/२०२४–२५
मौजा दहेगाव (जोशी), सा.क्र.९
ता. पारशिवनी, जि. नागपूर

**: जाहीरनामा :**

मौजा दहेगाव (जोशी) तह, पारशिवनी, जि. नागपूर येथील सर्व नागरीकांना सुचित करण्यात येते की, श्री अरविंद शंकर तांदुळकर, राह. माजरा मुकुंद हरिट पुणे, तह. जि.पुणे यांनी या कार्यालयास अर्ज सादर केलेला असून यांनी त्यांची स्वतःचा जन्म दिनांक १३.०४.१९६९ रोजी, मौजा–तहेगाव (जोशी), ग्रामपंचायत दहेगाव (जोशी), देथे जन्माची नोंद घेण्यात आलेली नाही. ग्रामपंचायत दहेगाव (जोशी) ता. पारशिवनी, जि. नागपूर येथे जन्माची नोंद होण्याकरीता आदेश मिळण्याबाबत अर्ज सादर केले आहे. तरी अर्जदार यांनी त्यांची स्वतःची जन्माची नोंद करण्याबाबत आदेश देण्याबाबत कोणाला आक्षेप अथवा उजर घ्यावयाचे असतील त्यांनी पंधरा दिवसा पर्यंत आपले आक्षेप अथवा उजर तहसिल कार्यालय, पारशिवनी येथे कार्यालयीन वेळेत तक्रार लेखी स्वरुपात स्वतः उपस्थित राहून या कार्यालयात समक्ष सादर कराये नियोजित तारखेनंतर मिळालेल्या आक्षेपावर विचार करण्यात येणार नाही, याबाबत संबंधितांनी नोंद ध्यावी.

सदर जाहीरनामा आज दिनांक २०.१२.२०२४ रोज माझे सही व शिक्यानिशी प्रलिम्त करण्यात येत आहे.

**कार्यकारी दंडाधिकारी**
**पारशिवनी**

# जिल्हा परिषदेची विद्यार्थी सर्वगुण संपन्न असतात : सभापती संजय डांगोरे

## तालुकास्तरीय क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचे बक्षीस वितरण संपन्न

■ महासागर प्रतिनिधी
काटोल , दि. २३ :

विद्यार्थी हा समाजाचा आरसा असल्यामुळे समाजाला प्रबोधनाच्या माध्यमातून नवदिशा देण्याचे काम जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक करीत असतात.जि.प. शिक्षक हे पाठ्यपुस्तकातील अनुभवासोबतच जीवन जगण्याची कला विद्यार्थ्यांना शिकवित असतात. जि.प.शाळेतील विद्यार्थ्यांचा क्रीडा, सांस्कृतिक व विविध उपक्रमातून बौद्धिक विकासासोबतच भावनिक,मानसिक, नैतिक व सामाजिक विकास होत असतो म्हणून जिल्हा परिषदेच्या शाळेत शिकणारे विद्यार्थी हे सर्वगुण संपन्न असतात, असे प्रतिपादन काटोल पंचायत समितीचे सभापती संजय डांगोरे यांनी तालुकास्तरीय क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव बक्षीस वितरण समारंभात येनवा येथे केले.



बक्षीस वितरण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सभापती संजय डांगोरे तर प्रमुख अतिथी म्हणून पं.स.सदस्या अनुराधाताई खराडे, पं.स. सदस्या चंदाताई देव्हारे, ग्रामपंचायत, येनवा सरपंच ललिताताई ठाकरे, गटशिक्षणाधिकारी प्रदीपकुमार जनबंधू, शिक्षण विस्तार अधिकारी जावेद इकबाल,प्राचार्य संदीप बोरकर, केंद्रप्रमुख रमेश गाढवे, केंद्रप्रमुख राजू धवड, केंद्रप्रमुख निळकंठ लोहकरे, केंद्रप्रमुख पांडुरंग भिंगारे, केंद्रप्रमुख महेश राकेश, केंद्रप्रमुख सुरेंद्र कोल्हे प्रामुख्याने उपस्थित होते.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कचारी सावंगा येथील चिमुकल्यांनी सादर केलेले 'वारकरी संप्रदायाची पंढरीची वारी' या नृत्याने प्रत्येक्षात येनवा गावात पंढरी अवतरली आणि सर्व प्रेक्षकांच्या डोळ्याचे पारणे फेडले. या नृत्यासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका कल्पना मुसळे, शिक्षिका सोनाली चव्हाण व उपक्रमशील शिक्षक राजू बगवे यांनी विशेष परिश्रम घेतले. तालुकास्तरीय क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेत क्रीडा चॅम्पियनशिप जि.प. उच्च प्राथमिक शाळा, पुसागोंदी' शाळा तर सांस्कृतिक चॅम्पियनशिप ' जि.प. उच्च प्राथमिक शाळा, दुधाळा ' यांना प्राप्त झाली.

कबड्डी स्पर्धेत - मेंडकी, कोंढासावळी, दुधाळा सोनोली, खो खो स्पर्धेत - सोनखांब ,वाघोडा खुटांबा, ईसापुर खुर्द , लंगडी स्पर्धेत - पुसागोंदी व गोंडीमोहगाव, रिले रेस स्पर्धेत - पुसागोंदी शाळा अव्वल ठरलेली आहे. तसेच सांस्कृतिक स्पधेर्तील समूह गीतगायन स्पर्धेत - दुधाळा , समुहनृत्य स्पर्धा कनिष्ठ गट - कचारी सावंगा व समूहनृत्य स्पर्धा वरिष्ठ गट -ईसापुर खुर्द शाळेने विजेतेपद पटकाविले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिक्षण विस्तार अधिकारी जावेद इकबाल, संचालन निलेश पोपटकर व योगेश चरडे तर आभार प्रदर्शन केंद्रप्रमुख राजू धवड यांनी केले.

# महाकाली नगरात गाडगेबाबा पुण्यतिथीनिमित्त जनजागृती

■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. २३ :

नगर पंचायत बेसा पिपळा परिसरातील महाकाली नगर येथे संत गाडगे बाबा यांची पुण्यतिथी मोठ्या उत्साहात व भक्तिभावाने साजरी करण्यात आली. स्वच्छतेचे महत्त्व अधोरेखित करून जनजागृती मोहीम राबविण्यात आली. नगर पंचायत बेसा पिपलाचे मुख्याधिकारी भारत नंदनवार, स्वच्छता विभाग प्रमुख पूजा जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



या कार्यक्रमात नगर पंचायत बेसा पिपलाचे अधिकारी, स्थानिक रहिवासी व लहान मुलांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. टीम गोदरेज, सहयोगी संस्था फीडबॅक फाऊंडेशन चॅरिटेबल ट्रस्ट आणि सक्षम मॅनेजमेंट सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड यांच्या सहकार्याने हा कार्यक्रम यशस्वी झाला. उपस्थितांना स्वच्छतेची शपथ देण्यात आली व समाजात स्वच्छतेचा संदेश देण्याचे आवाहन करण्यात आले.

कार्यक्रमादरम्यान स्थानिक रहिवासी अशोक व कल्याणी तसेच नगर पंचायत प्रतिनिधी स्वच्छता निरीक्षक नितीन इंगळे यांनी संत बाबा गाडगे यांना आदरांजली वाहिली.

संत बाबा गाडगे यांचा आदर्श व स्वच्छतेसाठी त्यांनी दिलेल्या योगदानाचे स्मरण करून सभेची सुरुवात करण्यात आली. स्वच्छता रॅलीतून सहभागी स्वच्छतेचा व कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करण्याचा संदेश दिला. यावेळी उपस्थित सर्वांनी स्वच्छतेची शपथ घेतली. महाकाली नगर स्वच्छ व सुंदर करण्यासाठी विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

कार्यक्रमादरम्यान नगर पंचायतचे सचिन, सुभाष, बादलमंगेश, स्वप्नील, टीम फोडबॅक फाउंडेशनकडून आकाश, ज्योती आणि सक्षम व्यवस्थापन संघातील रोहित नागेश्वर, रितेश भोस्कर, अखिलेश खासदार, निखिल रगडे यांनी सक्रिय भूमिका बजावली. स्थानिक रहिवाशांनीही स्वच्छता कर्मचाऱ्यांचा आदर केला.

# सांस्कृतिक भवनाचे नाव परमात्मा एक व्यसन मुक्ति भवन झाले कसे?

## जुनी कामठी गावातील प्रकरण, मुद्यावरुन ग्रामसभा तापली

■ महासागर प्रतिनिधी
कन्हान, दि. २३ :

पारशिवनी तालुक्यातील जुनी कामठी ग्रामपंचायत अंतर्गत सांस्कृतिक भवनाचे नाव परमात्मा एक व्यसन मुक्ति भवन झाले कसे? या मुद्या वरुन वातावरण चांगलेच तापले आहे. या मुद्या वरुन ग्राम सभा आयोजित करण्यात आली त्यात गावकऱ्यांनी आपले मत मांडुन समाज भवन प्रत्येक समाजाच्या लोकांसाठी उपयोग आणावे अशी मागणी केल्याने सरपंच सविता इरपाते यांनी समाज भवन प्रत्येक समाजाच्या लोकांसाठी मिळवुन देईल असे आश्वासन दिले आहे.



माजी सरपंच आणि विद्यमान सदस्य राहुल ढोके यांच्या का ात ग्रामपंचायत प्रशासना ने सांस्कृतिक भवन या नावाने ठराव दिला होता . ठराव मंजुर झाल्याने प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजने अंतर्गत सांस्कृतिक भवन बांधण्यात आले. भवनाची जबाबदारी ग्रामपंचायत सरपंच सविता इरपाते आणि सचिव रजनी सदनवार यांचा कडे असतांना प्रशासनाने भवनाची चाबी काही ठराविक लोकां कडे का दिली असा प्रश्न गावकऱ्यांनी उभा केला आहे . सांस्कृतिक भवनावर काही लोकांनी ताबा केला असुन सांस्कृतिक भवन नाव कापुन परमात्मा एक व्यसन मुक्ति भवन असा नाव देण्यात आला आहे . नाव केव्हा बदलवला केव्हा नाही याची माहिती ग्रामपंचायत प्रशासना कडे नाही आहे. त्यामुळे ग्रामपंचायत सरपंच सविता इरपाते, सचिव रजनी सदनवार यांचा कार्यप्रणाली वर प्रश्न निर्माण झाले आहे.

ग्रामपंचायत कडुन प्रकरणाची दखल घेतली जात नाही आहे आशा वर्कर, आंगनवाडी सेविका आणि गावातील लोकांना सांस्कृतिक भवनाचा लाभ घेता येत नसल्याने नागरिकां मध्ये ग्रामपंचायत सरपंच सविता इरपाते, सचिव रजनी सदनवार आणि प्रशासना विरुद्ध तीव्र असंतोष निर्माण झाला असुन समाजा मध्ये जातीय तिढा निर्माण झालेला आहे. माजी सरपंच आणि विद्यमान सदस्य राहुल ढोके यांच्या नेतृतवात नागरिकांनी राज्यमंत्री आणि आमदार आशिष जयस्वाल व पारशिवनी पंचायत समिति बीडीओ गटविकास अधिकारी संतोष जाधव यांना निवेदन देऊन सदर प्रकरणा वर गांभिर्यपुर्वक लक्ष वेधुन निर्णय घेऊन तात्काळ शासकीय सांस्कृतिक भवन गावकऱ्यांसाठी खुले करुन द्यावे अशी मागणी केली आहे. अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा गावकऱ्यांनी दिला आहे.

या प्रसंगी जुनी कामठी ग्रामपंचायत सदस्य राहुल ढोके, भूषण इंगोले, ज्ञानेश्वर उके, चिंतामण शेंडे, राम जुनघरे, विठ्ठल उके, उकुंदराव देवगडे सह आदि नागरिक उपस्थित होते.

# विभागीय क्रिडा स्पर्धेत एस.एन.टी. महाविद्यालयाचे विद्यार्थी चमकले

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. २३ :

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत विभागीय उपसंचालक क्रीडा व युवक सेवा संचालनालय नागपूर, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय चंद्रपूर व चंद्रपूर जिल्हा आष्टेडू आखाडा असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने नागपूर विभागीय शालेय आष्टेडू आखाडा स्पर्धा दिनांक २० डिसेंबर २०२४ ला दिशा स्कूल ऑफ इनोव्हेटिव्ह लर्निंग बरोरा, जिल्हा चंद्रपूर येथे आयोजित करण्यात आली होती.





या स्पर्धेत श्री नरेंद्र तिडके कला व वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालय रामटेक मधील कु. नीलम मरसकोल्हे इयत्ता १२ वी (कला) व लोकेश घेबले इयत्ता ११ वी (कला) या दोन्ही विद्यार्थ्यांनी खेळाचे उत्कृष्ट प्रदर्शन करून विजय मिळवला. हे दोन्हीही विद्यार्थी पुढे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेकरिता पात्र झाले आहे.

खेळाडूंच्या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ शरद पोकळे, पर्यवेक्षक डॉ. महेंद्र लोधी, शारीरिक शिक्षक प्रा. किशोर धांडे तसेच महाविद्यालयातील इतर प्राध्यापक यांनी अभिनंदन केले.

कु नीलम व लोकेश यांनी आपल्या विजयाचे श्रेय शारीरिक शिक्षक प्रा. किशोर धांडे यांना दिले.

## निधन

### भाऊराव चांदुरकर



■ महासागर प्रतिनिधी
कळमेश्वर, दि. २३ :

येथील न.प. प्राथमिक शाळेचे माजी मुख्याध्यापक भाऊराव सदाशिवराव चांदुरकर (८२) यांचे अल्प आजाराने नागपूरच्या इस्पितळात आज रात्री ११.०० वाजता निधन झाले. त्यांचे पार्थिवावर सोमवारी दुपारी ३.०० वाजता कळमेश्वर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचे मागे २ मुले, १ मुलगी आणि मोठा आप्त परिवार आहे.

# संत गाडगेबाबा पुण्यतिथिनिमित्त रांगोळी स्पर्धा संपन्न

■ महासागर प्रतिनिधी
वानाडोंगरी, दि. २३ :

दिनांक 20-12-2024 रोजी राजीव नगर दुर्गा चौक वानाडोंगरी येथे नगर परिषद, फीडबॅक फाऊंडेशन चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त उपस्थितीत गाडगे बाबा यांच्या पुण्यतिथीनिमित्त रांगोळी स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत दुर्गा चौकातील अनोख्या महिला गटात (नीता पटले, सिमा पारधी, हेमलता पायगवार) संत गाडगे बाबा यांचे चिमुकले पार्थ पायगवार याने बाजी मारली. यावेळी समाजसुधारक संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. नगरपरिषद वानाडोंगरीचे मुख्याधिकारी भरत नंदनवार आणि नगर परिषदेचे सर्व कर्मचारी फिडबॅक फाउंडेशनचे ब्रिजेश टीम सदस्य साक्षी माहुरे फीडबॅक फाउंडेशन टीम कार्यक्रमास कॉम्रेड मनोहर मोदघरे व सारथी प्रवीण, लसुंटे परिसरातील सर्वश्रोते व निरीक्षक उपस्थित होते.




# हिंगणा नगर पंचायत कडून शहरात पथविक्रेता समितीची निवड

■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. २३ :

नगर पंचायत कडून शहरात पथविक्रेत्यांना एकत्र आणून लोकशाही पद्धतीने निवडणूक घेऊन पथविक्रेता समितीची स्थापन करण्यात आली. शासनाच्या निर्देशानुसार मुख्याधिकारी धनंजय सरनाईक यांनी शहरातील सर्व पथविक्रेत्यांना एकत्र आणले. त्यानंतर आज (२३) नगरपंचायत हिंगणा कार्यालयात पथविक्रेता समितीची निवडणुक घेण्यात आली.



निवडणुक निकाल जाहिर केल्यानंतर विजयी उमेदवार खुला गट महिला निर्मला हरणे, खुला गट सर्वसाधारण अनिल साखरकर, खुला गट सर्वसाधारण निरंजना ढवळे, अनुसूचित जाती सर्वसाधारण नितेश घाटोळे, अनुसूचित जमाती सर्वसाधारण सुनिल कुंमरे, अल्पसंख्यांक महिला राखीव अफसाना पठान, दिव्यांग सर्वसाधारण मंगेश खोसे यांचे मुख्याधिकारी व मुख्य निवडणूक निर्णय अधिकारी धनंजय सरनाईक यांनी प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देत अभिनंदन केले.

तसेच सर्व पथविक्रेत्यांनी नगर पंचायत प्रशासनाला सहकार्य करावे अशी अपेक्षा व्यक्त केली. सहायक निवडणूक निर्णय अधिकारी अमेय मेटांगळे, शहर अभियान व्यवस्थापक प्रदीप तांबे , नगर परिषद कर्मचारी व पथविक्रेते यावेळी उपस्थित होते.

# डॉ.मनीषा कायंदे यांच्या नेतृत्वात पूर्व विदर्भातील महिला पदाधिकाऱ्यांचा मेळावा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर , दि. २३ :

डिसेंबर रोजी शिवसेना मुख्यनेते, जनतेच्या मनातील लाडके उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या संकल्पनेतून, विदर्भ महिला संपर्कप्रमुख नामदार डॉ. मनीषाताई कायंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच पूर्व विदर्भ संघटक किरणभाऊ पांडव यांच्या मार्गदर्शनात, नागपूर जिल्हा प्रमुख मनीषा पापडकर यांच्या पुढाकाराने पूर्व विदर्भातील महिला पदाधिकाऱ्यांच्या सहकार्याने पूर्व विदभार्तील महिला जिल्हाप्रमुख यांचा संवाद मेळावा प्रेस क्लब, सिविल लाईन, नागपूर येथे हिवाळी अधिवेशनात काळात संपन्न झाला.



या कार्यक्रमामध्ये शिवसेना सचिव व प्रवक्त्या आणि विधानपरिषदेच्या मुख्य प्रतोद नामदार डॉ. मनीषाताई कायंदे यांनी उपस्थित महिला पदाधिकाऱ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. वंदनीय हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे, गुरुवर्य आनंद दिघेसाहेब यांना अभिप्रेत 80 % समाजकारण व 20% राजकारण यां तत्वानुसार काम करत विदर्भात शिवसेना महिला आघाडी बळकट करण्याकरता, तळागाळातील महिलांपर्यंत शिवसेने पर्यंत शासकीय लाभ पोचवण्याकरीता मार्गदर्शन केले.

आपल्या भागातील जास्तीत जास्त महिलांना सक्षम करा. एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री असताना लोकहितासाठी सुरु केलेल्या लेक लाडकी योजने सारख्या अभूतपूर्व संकल्पनेतून महाराष्ट्रातील 37 लाख महिलांना प्रत्यक्ष लाभ झाला. सदर योजनेद्वारा मिळालेल्या आर्थिक मदतीतून अनेक महिलांनी रोजगार सुद्धा सुरू केले. याच काळातील अन्नपूर्णा योजना, वयश्री योजना, तीर्थदर्शन योजना, जनतेला शासकीय कार्यालयात कागदपत्रासाठी माराव्या लागणाऱ्या येरझरा थांबाव्या याकरिता शासन आपल्या दारी कार्यक्रम प्रत्येक शहरात तालुक्यात राबविण्यात आले, राज्य शासनाने गो-मातेला राजमातेचा दर्जा देण्याचा निर्णय घेतला, महिलांना एसटी बस प्रवासात 50% सवलत दिली. अशा अनेक कल्याणकारी योजना कायम जनतेला समर्पित असलेल्या एकनाथजी शिंदे आपल्या अडीच वर्षांच्या कार्यकाळात राबवल्या आहेत.

कायंदे यांनी आपल्या भाषणात गाव तिथं शाखा व घर तिथे झेंडा या तत्वानुसार प्रत्येक शहरात, गावात, प्रभागात पक्ष बांधणी करत नवीन मतदार नोंदणी करावी, सर्वसामान्य जनतेच्या समस्या ऐकून त्या सोडवण्याचा प्रयत्न आपण या माध्यमातून करावा असे प्रतिपादन करत उपस्थित सर्व जिल्हाप्रमुख व महिला पदाधिकारी यांना संबोधित केले. या कार्यक्रमात डॉ. कायंदे यांच्या शुभहस्ते शुभांगीताई ठमेकर यांची वर्धा जिल्हाप्रमुख पदी नियुक्ती करण्यात आली. यावेळी पूर्व विदभार्तील महिला जिल्हाप्रमुखांनी आपापल्या क्षेत्रातील महिलांच्या समस्या मांडल्या. वर्धा येथील जिल्हाप्रमुख गणेशभाऊ इखार यांनी सुद्धा उपस्थित महिला पदाधिकाऱ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.

मनीषा कायंदे यांच्या हस्ते पूर्व नागपूर येथील अनेक महिलांचा शिवसेना पक्षप्रवेश घेण्यात आला. या कार्यक्रमाचे संचालन मालती अमृतकर यांनी केले.

कार्यक्रमाच्या मुख्य आयोजक व नागपूर जिल्हाप्रमुख मनीषा पापडकर यांनी प्रास्ताविक केले तर आभार प्रतिमा ठाकूर यांनी केले. या कार्यक्रमाला वर्धा येथील जिल्हाप्रमुख गणेशभाऊ इखार, अनिता जाधव, सविता तुरकर, माया शिवणकर, शारदा सोनकनवरे,शुभांगी ठमेकर, नेहा भोकरे, उपजिल्हा संघटिका मनिषा पराड, मंजुषा पानबुडे, गायत्री वैद्य, शहर प्रमुख पूनम चागडे, वाणी सदालावार, मायाताई मेश्राम, सुनिता गोवर्धन, कीर्ती सोमवंशी, रूपाली माकोडे, प्रतिमा वायफडे, शहर संघटिका नीलिमा शास्त्री, विभाग संघटिका उज्वला उंमरे, बबीता चालखोरे, वृषाली बाईवार, सुनीता चालखोरे, पुनम हरोडे, यांच्यासह अनेक महिला शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्त्या उपस्थित होत्या.

# गृहमंत्री अमित शहा यांनी राजीनामा द्यावा

## महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती कळमेश्वर तर्फे राष्ट्रपतींना निवेदन सादर

■ महासागर प्रतिनिधी
कळमेश्वर , दि. २३ :

येथे तहसीलदार अंतर्गत राष्ट्रपती यांना महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती कळमेश्वर तालुक्या तर्फे निवेदन देण्यात आले. महाराष्ट्रातील परभणी जिल्ह्याच्या ठिकानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा व भारतीय संविधानाची प्रतिकृती आहे. दिनांक 14 डिसेंबर 2024 रोजी जातीवादी मणूग्रसित लोकांनी षडयंत्र रचून एका जातीवादी प्रशांत पवार याला प्रोत्साहित करून संविधानाची प्रास्ताविक तोडण्यास भाग पाडले. त्यानंतर परभणी येथील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरी कार्यकर्त्यांनी व संविधान प्रेमींनी त्याला पकडून पोलिसांच्या स्वाधीन केले. तेव्हा त्याने पोलीस स्टेशनमध्ये कबूल केले की, संविधानाची प्रस्ताविका प्रतिकृती तोडण्याचे काम काही लोकांनी मला सांगितले. परंतु तो त्या लोकांचे नाव सांगू शकला नाही.



त्यामुळे परभणी येथील जनतेमध्ये आक्रोश निर्माण झाला व त्यांचे शांततेच्या मार्गाने आंदोलन करण्याचे ठरले. दुपारी 2.00 वाजेपर्यंत आंदोलन शांततेत पार पडले. सर्व काही ठीक असताना परभणी पोलिसांनी आंदोलनकर्त्यांची धरपकड करणे सुरू केले. ज्यामध्ये सोमनाथ सूर्यवंशी याला अटक करून पोलीस स्टेशनमध्ये बेदम मारहाण करण्यात आली. त्यामुळे, त्याचा पोलीस कस्टडीमध्ये मृत्यू झाला सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यूला जबाबदार असणाऱ्या संबंधित पोलिसावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून, त्यांना ताबडतोब कायमचे बडतर्फ करावे.

संसदेचे अधिवेशन चालू असताना संसदेत भाजपाचे वरिष्ठ नेते अमित शहा गृहमंत्री भारत सरकार यांनी बेजबाबदारपणे संविधानाचे शिल्पकार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर अपमानास्पद वक्तव्य करून अपमान केल्यामुळे त्यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचा अपमान हा भारतीय जनतेचा अपमान आहे संविधानाचा अपमान हा भारतातील सर्व नागरिकांचा अपमान आहे तो खपवून घेतल्या जाणार नाही अशी कार्यकर्त्यांमध्ये तीव्र भावना निर्माण झालेली आहे.

बीड जिल्ह्यातील मत्सा जोग येथील सरपंच संतोष देशमुख यांची जी क्रूरपणे हत्या करण्यात आली. त्याची सखोल चौकशी करून दोशींना त्वरित अटक करा, असे निवेदनात म्हटले आहे. हे निवेदन राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, प्रधानमंत्री, लोकसभा विरोधी पक्ष नेता, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, विधान परिषद विधानसभा विरोधी पक्षनेता तथा चंद्रशेखर आझाद, खासदार भीम आर्मी तथा ठाणेदार साहेब पोलीस स्टेशन कळमेश्वर यांना देण्यात आले.

याप्रसंगी निवेदन देतानी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्याध्यक्ष गायक अरुणभाऊ सहारे, महासचिव अरुण वाहने, डॉ. घनश्याम मकासरे, सरजु मंडपे, विजय ठाकरे, कार्यवाह गौतम जांभुळकर, दीपक मेश्राम, प्रसिद्धी प्रमुख युवराज मेश्राम, प्रसिद्धी प्रमुख नंदकिशोर पाटील, समितीचे सदस्य मुकुंद बागडे, फकीरचंद गोंडाने, रामदास कापसे, सुरेश वाहने, अनिल अडकिने, प्रभाकर शेंडे , राहुल गोंडाणे, कृष्णा शेंडे, प्रभू कराडे, सत्यवान मेश्राम, राजपाल बनसोड, के एस भालेकर, अशोक सूर्यवंशी, मनोज चिंचखेडे, कमल सोनटक्के आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# नागपूर रिअल इस्टेट सल्लागारांच्या समस्यांवर सकारात्मक पाऊल : उपमुख्यमंत्री अजित पवार

■ महासागर प्रतिनिधी

नागपूर, दि. २३ : भारतीय रिअल इस्टेट सल्लागार वेलफेअर युनियन, नागपूरच्या पदाधिकाऱ्यांनी नुकतीच महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री मा. अजितदादा पवार यांची भेट घेतली. या बैठकीत रिअल इस्टेट क्षेत्रात काम करणाऱ्या सर्व सल्लागारांच्या समस्या, फसवणूक, आणि महारेराशी संबंधित अडचणींवर सविस्तर चर्चा झाली.



बैठकीत रिअल इस्टेट सल्लागारांसाठी लागू करण्यात आलेल्या नियमांवरही चर्चा झाली. यात महारेरा परीक्षा, परीक्षा शुल्क, सहा महिन्यांचा अहवाल, (मनी लॉन्ड्रिंगशी संबंधित नियम), आणि इतर महत्त्वाचे मुद्दे समाविष्ट होते. सल्लागारांनी या प्रक्रियांना अधिक सुलभ आणि प्रभावी करण्याची मागणी केली.

सल्लागारांच्या समस्या ऐकल्यानंतर अजितदादा पवार यांनी या क्षेत्रातील अडचणींवर लवकरात लवकर तोडगा काढण्याचे आश्वासन दिले. त्यांनी सल्लागारांच्या मेहनतीचे योग्य मोबदला मिळवून देणे, फसवणुकीवर कडक नियंत्रण आणणे, आणि महारेराच्या प्रक्रियेमध्ये सुधारणा करण्यासाठी पुढील टप्प्यात चर्चा करण्याचे संकेत दिले.

युनियनच्या पदाधिकाऱ्यांनी उपमुख्यमंत्री मा. अजितदादा पवार यांच्यासमोर अनेक महत्त्वाचे मुद्दे मांडले. यात कमीशनबाबत स्पष्टता, फसवणूक थांबवण्यासाठी कठोर नियम, विमा योजना, आणि रिअल इस्टेट व्यवसायामध्ये पारदर्शकता निर्माण करण्यासाठी ठोस उपाययोजना यांचा समावेश होता.

मा. अजितदादा पवार यांनी सल्लागारांच्या समस्या गांभीयार्ने घेतल्या असून, लवकरच ठोस निर्णय घेऊन रिअल इस्टेट क्षेत्राला स्थैर्य देण्याचे आश्वासन दिले. त्यांनी सांगितले, "सरकार सल्लागारांच्या मागण्यांबाबत संवेदनशील असून त्यांना न्याय देण्यासाठी कटिबद्ध आहे."

या चर्चेत भारतीय रिअल इस्टेट सल्लागार वेलफेअर युनियनकडून राजवीर सिंह, डॉ.के.एम. सुरडकर, प्रदीप मनवर (राष्ट्रीय समन्वयक), प्रबोध देशपांडे (जिल्हा समन्वयक), संजय कृपान (उपाध्यक्ष), संजय धापोडकर (समन्वयक), संजय खोब्रागडे (उपाध्यक्ष), अनिल सोनकुसरे (कोषाध्यक्ष), आणि स्वप्नील खापेकर यांनी सक्रिय सहभाग घेतला. या बैठकीमुळे सल्लागारांमध्ये नव्या आशा निर्माण झाल्या आहेत. पुढील टप्प्यात महत्त्वाचे निर्णय होण्याची शक्यता आहे. सरकारचा सकारात्मक दृष्टिकोन आणि या दिशेने उचलले जाणारे पाऊल लवकरच रिअल इस्टेट क्षेत्रातील समस्यांवर तोडगा काढण्यासाठी उपयोगी ठरेल.

# युवकांचा शिवसेनेत प्रवेश

■ महासागर प्रतिनिधी

नागपूर, दि. २३ : राज्याचे विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून मध्य नागपुर आणि पूर्व नागपुर मधील अनेक युवकांनी मंत्री उदय सामंत, दादा भुसे यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेना नागपुर जिल्हाप्रमुख सुरज गोजे यांच्या नेतृत्वात, विभागप्रमुख आशिष नाकाडे यांच्या सहकायार्ने शिवसेनेत प्रवेश केला.



यावेळी चंद्रपुर शिवसेना जिल्हाप्रमुख बंडुभाऊ हजारे, जिल्हा उपप्रमुख गणेश डोईफोडे, शहरप्रमुख धिरज फंदी, युवासेना जिल्हाप्रमुख निलेश तिघरे, युवासेना शहरप्रमुख सचिन यादव, सलमान खान, शिवसेना शहर उपप्रमुख अल्पेश शिवनकर, विभागप्रमुख धिरज काटे, सागर मौंदेकर, हरिष पाठराबे, रितेश सातोके, साहील जैन, निलेश सतीबावने, अक्षय मोहाडीकर, सुशिल खडसे उपस्थित होते. हर्षद निनावे आणि सहकाऱ्यांनी शिवसेनेत प्रवेश घेतला.

## १० महिन्यांपासून फरार गँगस्टर जेरबंद

**नागपूर** : खून आणि अंमली पदार्थांची तस्करी प्रकरणात गत 10 महिन्यांपासून फरार गँगस्टर अखेर पोलिसांच्या हाती लागला. पाचपावली पोलिसांनी गोपनिय माहितीच्या आधारावर त्याला एका मल्टीप्लेक्समधून पुष्पा 2 हा चित्रपट पाहताना अटक केली. विशाल मेश्राम असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. विशाल हा चर्चित गुन्हेगार असून त्याच्यावर 2 खून, अंमली पदार्थांची तस्करी, पोलिसांवर हल्ला असे 27 गंभीर गुन्हे दाखल आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, गत 10 महिन्यांपासून पोलिस खून आणि ड्रग प्रकरणात विशालचा शोध घेत होते. मात्र तो सतत पोलिसांना गुंगारा देत होता. दरम्यान पोलिसांना माहिती मिळाली की, विशाल सिने अभिनेता अल्लू अर्जुनचा प्रशंसक आहे. अल्लूचा पुष्पा हा चित्रपट त्याला खूप आवडतो. हा चित्रपट पाहण्यासाठी तो नक्की चित्रपटगृहात जाईल. या माहितीवरून पोलिसांनी सापळा रचला. पोलिस सतत त्याच्या मागावर होते. त्याच्यावर सायबर नजर ठेवली जात होती. एसयूव्हीच्या माध्यमातून त्याच्या हालचालींवर लक्ष ठेवले जात होते. गुरूवारी पोलिसांनी त्याचा पाठलाग केला. पुष्पा 2 चित्रपट पाहण्यासाठी तो चित्रपटगृहात गेला होता.

# एकनाथ शिंदेंना मुख्यमंत्री करा

## शिवसैनिकांकडून दुग्धाभिषेक आणि महाआरती



■ महासागर प्रतिनिधी,

नागपूर, दि. २३ : महाराष्ट्र राज्याची विधानसभा निवडणूक महायुतीमधील शिवसेना-भाजप-राष्ट्रवादी या पक्षांनी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात लढवली आणि घवघवीत यश मिळवले. या निवडणुकीत भाजपाला अधिक जागा मिळाल्याने मुख्यमंत्री पद भाजपाच्या वाट्याला आले. तथापि, एकनाथ शिंदे यांच्या मुख्यमंत्री पदाच्या कार्यकाळात महाराष्ट्रात झपाट्याने विकास झाला असून, मुख्यमंत्री पदाची जबाबदारी पुन्हा त्यांच्याकडेच देण्यात यावी, यासाठी म्हणून नागपूर येथील जागृतेश्वर मंदीरात शिवसेना नागपूर जिल्हाप्रमुख सुरज गोजे यांच्या नेतृत्वात शिवसैनिक तथा पदाधिकाऱ्यांनी भगवान भोलेनाथ यांच्या शिवलिंगाला दुग्धाभिषेक करुन महाआरती केली. यावेळी अमित कातुरे, नरेश मोहाडीकर, सचिन यादव, सलमान खान, अल्पेश शिवणकर, रुपाली बोकडे, शिल्पाताई थोटे, जयश्री खापेकर, कोमल पौनिकर, सागर मौदेकर, देवेंद्र माहुरकर, आषिश नाकाडे, सुशिल खडसे, जगदीश मंडलेकर, उत्तम रंभाड, अजय डहरवाल, अनुप साधनकर, रितेश पात्रीकर, विकास मोरघडे, हरिष पाठराबे, रितेश सातोके, दिलीप मतेलकर, राकेश डायरे, सौरभ हरडे, प्रमोद पाटील, निलेश निनावे, तेजस गोजे, हर्ष बोकडे, पार्थ गोजे, लाली शर्मा, लक्ष्मीकांत वाकोडीकर, शवसेना पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते.

# लगेज ट्रॉलीत लपवून गांजाची तस्करी

## आंतरराज्यीय टोळीचा भंडाफोड, ३ महिलांसह ७ आरोपी अटकेत

■ महासागर प्रतिनिधी,

नागपूर, दि. २३ : लगेज ट्रॉलीत लपवून गांजाची तस्करी करणाऱ्या आंतरराज्यीय टोळीचा गुन्हे शाखेच्या अंमली पदार्थविरोधी पथकाने भंडाफोड केला. 3 महिलांसह 7 आरोपींना अटक करीत त्यांच्याकडून 25 किलो गांजासह 5 लाख 63 हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. जसविरसिंग पप्पूसिंग (28), महेशकुमार महेंद्रसिंग सोबरवाल (36), अनूपम राममोहन सिंग (33), भारत मिठ्ठू (28) चौघेही रा. राजस्थान, शबाना उर्फ मोना मकसूद लोधी (25), नेहा विजय सिंग (29) आणि बबिता अशोक ठाकूर (28) तिन्ही रा. छत्तीसगड अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. त्यांचा पंडतजी उर्फ लड्डू (रा. ओरिस) नावाचा साथीदार फरार असून पोलिस त्याचा शोध घेत आहेत.




रविवारी दुपारी गन्हे शाखेचे पथक गस्तीवर होते. या दरम्यान रेल्वेने मोठ्या प्रमाणात गांजा तस्करीद्वारे नागपुरात आणला जात असल्याची माहिती पथकाला मिळाली. या माहितीच्या आधारावर पोलिसांनी मध्यवर्ती रेल्वे स्थानकाच्या पश्चिमेकडील प्रवेशद्वारावर आरोपींना पकडण्यासाठी सापळा रचला. या दरम्यान वरील आरोपी संशयास्पदरित्या ट्रॉली बॅग घेऊन जाताना दिसले. पोलिसांनी त्यांना थांबवून ट्रॉली बॅगची झडती घेतली असता त्यात पोत्यांमध्ये गांजा आढळला. पोलिसांनी सर्व आरोपींना ताब्यात घेत त्यांच्याकडून 25 किलो गांजा, 6 मोबाईल फोन आणि ट्रॉली बॅगसह एकूण 5 लाख 63 हजार रुपयांचा माल जप्त केला. आरोपींविरुद्ध सीताबर्डी ठाण्यात एनडीपीएस ॲक्ट अन्वये गुन्हा नोंदवून त्यांना अटक केली.

सखोल चौकशीत आरोपींनी पंडितजी उर्फ लड्डूच्या मदतीने माल नागपुरात आणल्याची माहिती दिली. पोलिसांनी लड्डूविरुद्धही गुन्हा नोंदवून त्याचा शोध सुरू केला आहे. ही कारवाई गुन्हे शाखा अंमली पदार्थ विरोधी पथकाचे पोनि गजानन गुल्हाने, सपोनि मनोज घुरडे, पोहवा विजय यादव, मनोज नेवारे, पवन गजभिये, शैलेष डोबोले, विवेक अडाऊ, नापोशि अरविंद गेडेकर, गणेश जोगेकर, पोशि सुभाष गजभिये, रोहित काळे, सहदेव चिखले, अमन राऊत व अनूप यादव यांनी केली.

# डीके फॅन्सतर्फे नवनिर्वाचित आमदारांचा सत्कार



■ महासागर प्रतिनिधी,

नागपूर, दि. २३ : धनोजे कुणबी समाजातील स्थापित उद्योजकांचा अराजकीय समुह असलेल्या डीके फॅन्सच्या वतीने आमदार सुधाकर अडबले, आमदार संजय देरकर आणि आमदार देवराव भोंगळे या नवनिर्वाचित आमदारांचा सत्कार नुकताच करण्यात आला.

हॉटेल सेंटर पॉईंट येथे आयोजित या कार्यक्रमाला धनोजे कुणबी समाजातील अनेक मान्यवरांनी आपली उपस्थिती नोंदविली. या कार्यक्रमाचे संचलन गायत्री ताजने यांनी केले.

डॉ.. अभय दातारकर, प्रमोद कोरडे, सतीश आवारी, गजेंद्र आसुटकर, ॲड. नितीन कोंगरे, डॉ. आकाश बलकी, डॉ. आशिष बदखल, प्रफुल्ल वाहदुले आदी मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सुरेश आसुटकर, कैलाश आडकीने, ऊमेश बदकी, मिलिंद बदकी, दिलीप दोडके, कैलाश डाखळे, अनिल गोवारदिपे, प्रशांत घोडमारे, विजय काळे,अनिकेत खिरकेकर, दिलिप माथनकर, विवेक मोवाडे - जीवतोडे, देवेंद्र मत्ते, राहुल रोडे, धनंजय ताजने, सुरज ताजने, निलेश ताजने, अजय ठेंगने आदींनी अथक परिश्रम घेतले.

# लॉनमधून दागिन्यांची बॅग चोरी

**नागपूर** : लॉनमध्ये लग्न समारंभा दरम्यान एका महिलेची सोन्याचे दागिने व रोकड असलेली बॅग अज्ञात आरोपीने चोरून नेली. बॅगमध्ये एकूण 1 लाख 52 हजार रुपयांचा माल होता. ही घटना लकडगंज पोलिस ठाण्यांतर्गत घडली. या प्रकरणी पोलिसांनी लक्ष्मण भगवान फड (63) रा. इंदोर, मध्यप्रदेशच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. लक्ष्मण यांच्या नातेवाईकाचे लग्न वर्धमाननगरातील सातवचन लॉन येथे आयोजित करण्यात आले होते. शुक्रवारी सकाळी ते कुटुंबासह लग्नात सामील होण्यासाठी लॉनमध्ये आले. लग्नासाठी तयार होत असताना लक्ष्मण यांच्या मुलीने तिचे सोन्याचे दागिने व रोख 5 हजार रुपये एका बॅगमध्ये ठेवले आणि पार्लरच्या कामात व्यस्त झाली. या दरम्यान अज्ञात आरोपीने तिच्या खोलीत प्रवेश केला आणि दागिन्यांची बॅग चोरून नेली. तयारी झाल्यावर मुलीने दागिने घालण्यासाठी बॅग बघितली असता ती मिळून आली नाही.

# दोन अंकी मराठी "फर्टिलाइझर" नाटकाचे सादरीकरण

■ महासागर प्रतिनिधी

नागपूर, दि. २३ : महाराष्ट्र कामगार कल्याण मुंबई यांच्या दोन अंकी स्पर्धेत दिनांक २१ डिसेंबर २०२४ रोजी महाराष्ट्र कामगार कल्याण केंद्र रघुजी नगर नागपूर येथे श्री पिराजी बहुउद्देशीय संस्था नागपूर तसेच सहाय्यक उतुंग महिला भजन मंडळ नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र कामगार कल्याण उमरेड यांच्या तर्फे दोन अंकी मराठी नाटक "फर्टिलाइझर" नितीन शेंगावकर लिखित आणि किशोर वसंतराव येळणे दिग्दर्शित नाटक सादर झालाय. या नाटकाची निर्मिती आणि वेशभूषा, रंगभूषा निशिगंधा राऊत यांनी केली होती.





तसेच प्रकाश योजना श्री सपन राऊत यांनी तर संगीत सुरज वैद्य यांनी केली यात कलाकार रुपेश गोंगाल, नयना उमाळे, आकाश निकोसे, आणि जेष्ठ कलाकार मिलिंद वरघणे यांनी अतिशय उत्कृष्टरित्या त्यांच्या पात्रांना न्याय देत नाटकाला उंच झेप दिली यात फर्टि आणि ॲग्री एकत्र आलेत. तर त्याचे फायदे आणि तोटा आणि सरकार मुले शेतकऱ्यांची झालेली गुसमठ हेच या नाटकात लेखकाने अतिशय उत्कृष्टरित्या मांडलेली आहे. प्रेक्षकांनी सुद्धा योग्य तो प्रतिसाद या नाटकाला दिलेला आहे. पुन्हा या नाटकाचे प्रयोग बघण्याकरिता अशी प्रेक्षकांनी इच्छा व्यक्त केली आहे.

# मंदिर-संस्कृतीच्या रक्षणार्थ १००० हजारांहून अधिक मंदिर प्रतिनिधी एकवटणार

■ महासागर प्रतिनिधी

नागपूर, दि. २३ : आपल्या राजे-महाराजांनी मंदिरांची निर्मिती केली. छत्रपती शिवाजी महाराज, राजमाता अहिल्याबाई होळकर यांनी मंदिरांचे संरक्षण केले, तसेच आक्रमकांनी उद्धस्त केलेल्या मंदिरांचे जीर्णोद्धार केले. आज मात्र भारताने सेक्युलर वादी राज्यव्यवस्था स्वीकारल्यामुळे केवळ मंदिरांचे सरकारीकरण आणि त्या मंदिरांचा भ्रष्टाचार, पैसे घेऊन व्ही.आय.पी. दर्शन, मंदिरांची भूमी बळकावणे, वक्फ बोर्डचे मंदिरांच्या भूमीवर अतिक्रमण चालू आहे. अशा वेळी मंदिर संस्कृतीचे रक्षण करणे हे हिंदु समाजाचे दायित्व आहे.




एकूणच मंदिरांच्या समस्यांचे निवारण करणे, मंदिरात येणार्या भाविकांसाठी सुविधा उपलब्ध करून देणे, दर्शनरांगांचे सुनियोजन करणे, तसेच मंदिर परंपरांचे रक्षण करणे यांसाठी मंदिरांचे विश्वस्त, पुजारी, भक्त आदींचे संघटन आवश्यक आहे.

त्यासाठी महाराष्ट्र मंदिर महासंघ, मुंबई येथील जिवदानी देवी संस्था, श्री ज्योतिर्लिंग भीमाशंकर देवस्थान, श्री साई पालखी निवारा आणि हिंदु जनजागृती समिती यांच्या संयुक्त विद्यमाने 24 आणि 25 डिसेंबर 2024 या दिवशी श्री साई पालखी निवारा, नगर-मनमाड रोड, निमगांव, शिर्डी येथे तृतीय महाराष्ट्र मंदिर न्यास परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

या परिषदेला संपूर्ण महाराष्ट्रभरातून 1,000 हून अधिक निमंत्रित मंदिराचे विश्वस्त, प्रतिनिधी, पुरोहित, मंदिरांच्या रक्षणासाठी लढा देणारे अधिवक्ते, अभ्यासक आदी सहभागी होणार आहेत, अशी माहिती मंदिर महासंघाचे राष्ट्रीय संघटक सुनील घनवट यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या पत्रकार परिषदेला मालेगाव येथील वैजनाथ महादेव देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष निवृत्त सेना अधिकारी मेजर किसन गांगुर्डे, नाशिक गोरेराम मंदिराचे मालक दिनेश मुठे आणि हिंदु जनजागृती समितीचे समन्वयक प्रदीप देशमुख उपस्थित होते.

यावेळी सुनील घनवट पुढे म्हणाले, महाराष्ट्र मंदिर महासंघाच्या माध्यमातून राज्यात 800 हून अधिक मंदिरांमध्ये वस्त्रसंहिता लागू करण्यात आली आहे, तर 15 हजारांहून अधिक मंदिरांचे देशभरात संघटन झाले आहे. गोरेराम मंदिराचे मालक दिनेश मुठे म्हणाले.

या परिषदेला हिंदु फ्रंट फॉर जस्टिसचे प्रवक्ते आणि सर्वोच्च न्यायालयाचे अधिवक्ता विष्णु जैन, स्वातंत्र्यवीर राष्ट्रीय स्मारकाचे कार्याध्यक्ष रणजीत सावरकर, जय महाराष्ट्र या मराठी वृत्तवाहिनीचे संपादक प्रसाद काथे, जैन मंदिराचे गिरीश शहा, मंदिर क्षेत्रात कार्यरत डॉ. अमित थढाणी, मंदिर क्षेत्रात कार्यरत लेखक-अभ्यास संदीप सिंह, बाणगंगा ट्रस्टचे ऋत्विक औरंगाबादकर यांसह अष्टविनायक मंदिरांचे विश्वस्त, महाराष्ट्रातील जोतिर्लिंग देवस्थानांचे विश्वस्त, संत पिठांचे प्रतिनिधी, अन्य मंदिरांचे विश्वस्त, हिंदु जनजागृती समितीचे राष्ट्रीय प्रवक्ते रमेश शिंदे आदी मान्यवर सहभागी होणार आहेत.

# रामदासपेठेत श्रीमद पावन प्रज्ञा पुराण कथा

## २८ डिसेंबर ते १ जानेवारी पर्यत २४ कुंडीय गायत्री महायज्ञ

■ महासागर प्रतिनिधी

नागपूर, दि. २३ : रामदासपेठेतील मारुती देवस्थान ट्रस्ट दरवर्षी निरनिराळे उपक्रम आयोजित करते. त्यात यावर्षी मार्गशीर्ष मासानिमित्त २८ डिसेंबर २०२४ ते १ जानेवारी २०२५ दरम्यान लेंड्रा पार्क मैदान रामदासपेठ येथे स्थापित केलेल्या गायत्री तीर्थस्थळावर श्रीमद पावन प्रज्ञा पुराण कथा व भव्य २४ कुंडीय गायत्री महायज्ञ आयोजित करण्यात आला आहे.

या यज्ञाचे आयोजक अशोक पत्की, विनय दाणी व सीए दीपक हेडा राखी मुदडा , नरेंद्र आसरकर आनंद खडेलवार ,अशोक गांधी आहेत. या आयोजनात अखिल विश्व गायत्री परिवारचे विशेष सहकार्य लाभणार आहे.

या महायज्ञाचा शुभारंभ २८ डिसेंबर रोजी दुपारी ३ वा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार होणार आहे. याप्रसंगी सोलर ग्रुपचे संचालक सत्यनारायण नुवाल व कॉन्फिडन्स ग्रुपचे संचालक नितीन खारा प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहतील.

यात शुभारंभाच्या दिवशी २८ डिसेंबर रोजी सकाळी ९ ते १ वा. दरम्यान भव्य शोभायात्रा काढण्यात येणार ही शोभायात्रा काचीपुरा चौक, जुना रामदासपेठ, फार्मलॅण्ड मार्गे परत कथास्थळी पोहोचेल. यात २५१ मंगलकलशधारी भगिनी, गायत्री मातेचा चित्ररथ, बॅण्डपथक, आहे.

उद्घाटनानंतर २८ रोजी दुपारी ४ ते ७ आंतरराष्ट्रीय कथावाचक शांतिकुंज वरिष्ठ प्रतिनिधी पं. श्यामबिहारी दुबे यांची प्रज्ञा पुराण कथा, २९ रोजी सकाळी ८ वा. २४ कुंडीय यज्ञाला प्रारंभ होईल, दुपारी ४ वा. देवपूजन प्रज्ञा पुराण, ३० रोजी सकाळी ८ वा. संस्कार व यज्ञ, सायं. ४ प्रज्ञा पुराण, ३१ रोजी सकाळी ८ वा. संस्कार व यज्ञ, ४ वा. प्रज्ञा पुराण, रात्री ८ वा. १००८ दिव्यांचा विराट दीप महायज्ञ, १ जानेवारी रोजी सकाळी ८ वा. २४ कुंडीय महायज्ञ व पूणार्हूती तसेच दुपारी १ वा. पासून महाप्रसाद वितरण होणार आहे.

मानव कल्याणार्थ प्रज्ञा पुराण दैनंदिन व्यस्त जीवनात येणाऱ्या समस्यांचे समाधान आणि मानव कल्याणार्थ मारुती देवस्थान ट्रस्टतर्फे हे भव्य आयोजन करण्यात येत आहे. यात यज्ञाच्या प्रारंभ दिनी म्हणजे २८ डिसेंबरपर्यंत 'प्रथम या प्रथम घ्या' या तत्वावर आयोजकांशी संपर्क साधून सहभागी होता येईल. यासाठी अशोक पत्की यांच्याशी ९३७२३००६६८, तसेच विनय दाणी यांच्याशी ८६०५०१०१४० या क्रमांकावर संपर्क साधावा.

## रेल्वेच्या धडकेत मृत्यू

**नागपूर** : वर्धा-नागपूर डाऊन लाईनवर एका अनोळखी व्यक्ती कटलेला अवस्थेत आढळला. घटनेची माहिती मिळताच हिंगणा पोलिस घटनास्थळी पोहोचले. मृतदेह ताब्यात घेऊन अकस्मात मृत्यूची नोंद केली. शुक्रवारी रात्री 8.30 वाजताच्या सुमारास ट्रॅकमन सुभाष नाहारे यांना वर्धा-नागपूर डाऊन लाईनवर पोल क्र. 819/28 जवळील रूळावर एक व्यक्ती रेल्वेने कटलेल्या अवस्थेत आढळला. त्यांनी तत्काळ घटनेची माहिती पोलिसांना दिली. हिंगणा पोलिस घटनास्थळी पोहोचले. मृताजवळ ओळख पटवणारे कोणतेही कागदपत्र नसल्याने त्याची ओळख पटू शकली नाही. त्याचे वय अंदाजे 35 ते 40 वर्षे असल्याचे सांगण्यात आले. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह ताब्यात घेतला.